सत्यमेव जयते

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

# (२०२४-२०२५)

# (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

गडचिरोली जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालय, मुख्य वनसंरक्षक कार्यालय, गडचिरोली, जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती, पोलीस अधिक्षक (ग्रामीण) कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कार्यालय, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोली, अहेरी व भामरागड या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणाऱ्या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबतचा

# पहिला अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक  २४ मार्च २०२६ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई / नागपूर
मार्च, २०२६

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## (२०२४-२०२५)

## (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

**गडचिरोली जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालय, मुख्य वनसंरक्षक कार्यालय, गडचिरोली, जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती, पोलीस अधिक्षक (ग्रामीण) कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कार्यालय, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोली, अहेरी व भामरागड या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणाऱ्या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबतचा**

## पहिला अहवाल

एचबी १५७९–१

## अनुसुचित जमाती कल्याण समिती
## (२०२४ - २०२५)

**समिती प्रमुखः-**

(१) श्री. दौलत दरोडा, वि.स.स

सदस्यः

(२) श्री. हरिश्चंद्र भोये, वि.स.स

(३) श्री. मिलिंद नरोटे, वि.स.स.

(४) श्री. केवलराम काळे, वि.स.स.

(५) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.

(६) श्री. राजेश पाडवी, वि.स.स.

(७) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.

(८) श्रीमती मंजुळा गावित , वि.स.स.

(९) श्री. हिरामण खोसकर, वि.स.स.

(१०) श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स.

(११) श्री. रामदास मसराम, वि.स.स.

(१२) श्रीमती उमा खापरे, वि.प.स.

(१३) श्री. इद्रिस नायकवडी, वि.प.स.

(१४) श्री. राजेश राठोड, वि.प.स.

(१५) श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.

(१६) श्री. विनोद निकोले, वि.स.स. (निमंत्रित सदस्य)

### महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. शिवदर्शन साठ्ये, सचिव ४

(२) श्री. राजेश तारवी, सह सचिव (समिती) तथा वि. का. अ.

(३) श्री. दामोदर गायकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. मनोज येसनसुरे, कक्ष अधिकारी

## अनुसुचित जमाती कल्याण समिती

## (२०२० - २०२१)

**समिती प्रमुखः-**

(१) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

सदस्यः

(२) श्री. श्रीनिवास वनगा, वि.स.स.

(३) श्री. महेंद्र दळवी, वि.स.स.

(४) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(५) श्री. शिरीष चौधरी, वि.स.स.

(६) श्री. सहसराम कोरोटे, वि.स.स.

(७) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

(८) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.

(९) श्री. राजेश पाडवी, वि.स.स.

(१०) श्री. भिमराव केराम, वि.स.स.

(११) श्री. राजकुमार पटेल, वि.स.स.

(१२) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

(१३) श्रीं. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

(१४) श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.

(१५) श्री. किरण सरनाईक, वि.प.स.

*(१६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स. (विशेष निमंत्रित सदस्य)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(३) श्री. मोहन काकड, अवर सचिव

(४) श्री. मनोज येसनसुरे, कक्ष अधिकारी

* मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी सन २०२०-२०२१ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या अनुसूचित जमाती कल्याण समितीवर "विशेष निमंत्रित सदस्य" म्हणून श्री. बाळाराम पाटील, वि.प.स. यांची दिनांक ११ फेब्रुवारी, २०२१ रोजी नामनियुक्ती केलेली आहे.

## अनुसुचित जमाती कल्याण समिति
## (२०१७-२०१८)

**समिती प्रमुखः-**

(१) प्रा.डॉ. अशोक उईके, वि.स.स.

सदस्यः

**(२) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(४) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(५) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.

(६) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

(७) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.

(८) श्री. अमित घोडा, वि.स.स

(९) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

*(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(१२) श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स

(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(१४) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

(१५) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

**टीप :-**

*(१) मा.अध्यक्षांनी श्री.पांडुरंग बरोरा, वि.स.स. यांची दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी रिक्त असलेल्या जागेवर समिती सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.

** (२) मा.अध्यक्ष यांनी, श्री. डॉ. देवराव होळी, वि.स.स. यांच्याऐवजी श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स. यांची दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक<br>(१) | विषय<br>(२) | | पृष्ठ क्रमांक<br>(३) |
|---|---|---|---|
| | **प्रस्तावना** | | (सहा) |
| (१) | जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली | ... | १ |
| (२) | मुख्य वनसंरक्षक कार्यालय, गडचिरोली | ... | १२ |
| (३) | गडचिरोली जिल्ह्यातील नगरपालिका / नगरपंचायत / नगरपरिषद | ... | २० |
| (४) | पोलीस अधिक्षक (ग्रामीण) कार्यालय, गडचिरोली | ... | २५ |
| (५) | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कार्यालय, गडचिरोली | ... | ३५ |
| (६) | जिल्हा परिषद, गडचिरोली | ... | ४२ |
| (७) | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोली, अहेरी व भामरागड | ... | ८७ |
| (८) | समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | ... | १०१ |

## प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या कालावधीतील अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २० ते २२ एप्रिल, २०१८ या कालावधीत गडचिरोली जिल्ह्यास भेट देऊन बैठका घेतल्या होत्या. उक्त बैठकींत गडचिरोली येथील जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालय, जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायती, पोलीस अधिक्षक (ग्रामीण) कार्यालय, गडचिरोली, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत कार्यालय, गडचिरोली, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली, अहेरी व भामरागड या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी वर्गाची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच शासकीय व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातंर्गत येणाऱ्या शासकीय / अनुदानित आदिवासी आश्रमशाळांना भेटी देऊन पाहणी केली. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्दयांच्या अनुषंगाने समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी उक्त आस्थापनासंदर्भात संबंधित मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचार विनिमय करुन त्यासंदर्भात नोंदविलेले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

मंत्रालयीन विभागीय सचिवांनी तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने दिनांक १६ मार्च, २०२६ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

विधान भवनः<br>
मुंबई<br>
दिनांकः १६ मार्च, २०२६

**दौलत दरोडा,**<br>
समिती प्रमुख,<br>
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

# अहवाल

## जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २० ते २२ एप्रिल, २०१८ या कालावधीत गडचिरोली जिल्ह्याचा अभ्यास दौरा आयोजित केला होता. सदर दौऱ्यात समितीने दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देऊन बैठक घेतली होती. सदरहू बैठकीत समितीने अनुसूचित जमाती प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली.

### जिल्हाधिकारी कार्यालयातील भरती,बढती, आरक्षण व अनुशेष :-

सदर बैठकीत समितीने अनुसूचित जमातीसाठी असलेल्या आरक्षणानुसार सरळसेवा भरतीची व पदोन्नतीची किती पदे रिक्त आहेत? तसेच लिपिक- टंकलेखक या प्रवर्गाची २ पदे केव्हापासून रिक्त आहेत व सदर पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत. अशी विचारणा केली असता जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की, वरिष्ठ लिपिकाची दोन पदे रिक्त आहेत परंतू सदर पद कार्यरत नसल्यामुळे आणि त्या पदावरील कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्यामुळे सरळसेवेची दोन पदे रिक्त आहेत. सदर पदे सन २००६ पासून रिक्त आहेत समितीने विभागाचा आकृतीबंध कधी अदयावत करण्यात आला व तो शासनाच्या नियमावलीनुसार किती वर्षांनी अद्ययावत करणे आवश्यक आहे असे विचारले असता जिल्हाधिकाऱ्यांनी समितीला सांगितले की, विभागाचा आकृतीबंध हा सन २००६ ला अद्ययावत करण्यात आलेला असून तो दर तीन वर्षानी अद्ययावत करणे आवश्यक आहे. गडचिरोली जिल्ह्याचा आकृतीबंध अद्ययावत नसल्याने समितीने नाराजी व्यक्त केली व सूचित केले की, गडचिरोली जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखण्यात येत असून जिल्ह्याचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला असता तर अनुसूचित जमातीची भरती आरक्षणानुसार झाली असती यासंदर्भात जिल्हा प्रशासन जबाबदार असल्याचे समितीने आपले मत व्यक्त केले

अनुसूचित जमातीसाठी असलेल्या आरक्षणानुसार सरळ सेवा भरतीची व पदोन्नतीची किती पदे केव्हापासून रिक्त आहेत. तलाठी संवर्गातील १६ पदे पेसा अंतर्गत रिक्त आहेत व शासन निर्णयाप्रमाणे ५० टक्के रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार अद्यापपर्यंत पदे न भरण्याची कारणे काय आहेत. व शिपाई संवर्गातील ६ पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणते निदेश दिले आहे अशी समितीने पृच्छा केली असता जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, अव्वल कारकून संवर्गातील मंजूर पदे १५० असून अनुसूचित जमातीसाठी मंजूर पदे ११ असून ही सर्व पदे भरण्यात आलेली आहेत. तसेच मंडळ अधिकारी या संवर्गातील मंजूर पदे ४० असून अनुसूचित

जमातीसाठी ३ मंजूर पदे असून ही सर्व पदे भरण्यात आली आहेत. लिपिक टंकलेखक या संवर्गातील मंजूर पदे ८३ असून अनुसूचित जमातीसाठी मंजूर पदे ६ असून त्यापैकी ५ पदे भरण्यात आलेली आहेत. दिनांक १८ जुलै, २०१७ रोजी एका लिपिकास अव्वल कारकून संवर्गात पदोन्नती दिल्यामुळे सदरचे पद रिक्त झाले आहे.

गडचिरोली जिल्ह्यात ६ उप विभागांतर्गत तलाठी संवर्गाची एकूण २३७ मंजूर पदांपैकी २२१ पदे कार्यरत असून १६ पदे रिक्त आहेत. वित्त विभागाच्या दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रिक्त पदाच्या ५० टक्के प्रमाणे ८ पदे भरण्यास मुभा आहे. परंतु, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडून कार्यक्रम उपलब्ध न झाल्यामुळे भरती प्रक्रिया करण्यात आलेली नाही. मागच्या वर्षी भरती झालेली नाही. तलाठी संवर्गात २३७ मंजूर पदे असून अनुसूचित क्षेत्रांतर्गत १७५ पदे व बिगर अनुसूचित क्षेत्रांतर्गत ६२ पदे अशी विभागणी करण्यात आली आहे. सद्यस्थितीत पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. एकूण २२१ कार्यरत पदांपैकी २०७ पदे ही पेसा अधिसूचना दिनांक ९ जुन २०१४ ची अंमलबजावणी होण्यापूर्वीच सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५ ऑक्टोबर, २००२ मध्ये नमूद केलेल्या सरळसेवा भरतीच्या आरक्षणानुसार भरलेली असल्याने मंजूर, भरलेली व रिक्त पदांमध्ये तफावत दिसून येते.

शिपाई संवर्गातील मंजूर पदे १२५ असून अनुसूचित जमातीसाठी मंजूर पदे ३० असून भरलेली पदे २४ असून ६ पदे रिक्त आहेत. वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १४ जानेवारी २०१६ अन्वये गट-ड संवर्गातील मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे निरसित करण्याचे निदेश असल्यामुळे रिक्त असलेली ६ पदे भरण्यात आलेली नाहीत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या वर्ग-३ व वर्ग-४ मधील किती अधिकारी/कर्मचारी यांची जात वैधता प्रमाणपत्र ही जात पडताळणी समितीकडून तपासण्यात आली आहेत. ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी जातपडताळणी प्रमाणपत्र सादर केले आहे त्यांची माहिति समितीला सादर करावी, असे समितीने निर्देश दिले असता जिल्हाधिकाऱ्यांनी आश्वासित केले की, याबाबतची तपशीलवार माहिती सादर करण्यात येईल.

**जिल्हा सामान्य रुग्णालय**

जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्ह्यातील इतर रुग्णालयातील वर्ग-१ व वर्ग-२ चे वैद्यकीय अधिकारी तसेच वर्ग ३ व ४ ची एकूण मंजूर पदे किती आहेत व प्रत्यक्षात किती पदे कार्यरत आहेत? त्यापैकी अनुसूचित जमाती संवर्गातील किती पदे रिक्त आहेत व किती पदे भरण्यात आलेली आहेत अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, सन २०१५ ला बिंदुनामावली अद्ययावत करण्यात आलेली आहे. त्याबाबत राज्य शासनाला

माहिती पाठविण्यात आलेली आहे. वर्ग-३ ची पदे भरण्याचे अधिकार व मान्यता उप संचालक, नागपूर यांना आहेत. वर्ग १ आणि वर्ग २ ची पदे भरण्याचे अधिकार मंत्रालय स्तरावर आहेत. त्याचप्रमाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाकडे वर्ग ४ ची पदे भरण्याचे अधिकार आहे. सन २०१५ ला सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, नागपूर यांच्याकडून बिंदुनामावली मान्य करण्यात आली होती. त्यानुसार राज्य शासनाला रिक्त पदे भरण्यासाठी परवानगी मागण्यात आली होती. सदर मान्यतेमध्ये २० पदे भरण्याची मान्यता मिळालेली होती. त्यानुसार सन २०१६ ला वर्ग-४ च्या पदांची जाहिरात देण्यात आली होती. त्या पदांची लेखी परीक्षा झालेली आहे. त्यामध्ये अनुसूचित जमातीची पाच पदे सरळसेवेने भरण्यात आलेली आहेत. दिनांक २१ जानेवारी, २०१७ ला भरती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. सदर माहिती मागासवर्ग कक्षाला पाठविण्यात आलेली आहे.

मागासवर्ग कक्षातील अधिकारी यांनी स्पष्ट केले की, अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. विभागाकडे बिंदुनामावली प्रमाणित करण्यासाठी आल्यानंतर बिंदुनामावली त्वरीत तपासून देण्यात येत असते.

वर्ग ४ ची अनुसूचित जमातीची २० पदे किती कालावधीपासून रिक्त आहेत व सदर पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत ? असे समितीने विचारणा केली असता, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, सन २०१५ पासून सदर पदे रिक्त आहेत. सदरहू पदांची मंजूरी राज्य शासनाकडून घेण्यात येत असते. ज्यावेळी पदे भरण्यासाठी प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आला त्यावेळी २५ पदांपैकी केवळ २० पदे भरण्याची मंजुरी मिळाली होती. सदर पदांसाठी महा-ऑनलाईन या संकेतस्थळावरुन अर्ज मागविण्यात आले होते. सदर पदांसाठी लेखी परीक्षा वरिष्ठ स्तरावरुन घेण्यात येत असते. सदर पदांसाठी भरती प्रक्रिया झालेली आहे. भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मागासवर्ग कक्षाकडे बिंदूनामावली अद्ययावत करण्यासाठी पाठविण्यात आली होती.

यावर समितीने, उर्वरित पाच पदे कधीपर्यंत भरण्यात येणार आहेत तसेच विभागाची बिंदूनामावली सन २०१५ ला तपासून घेण्यात आली होती. परंतु सन २०१६ ला नवीन भरती करण्यात आली होती. अशी विचारणा केली असता शासनाने मंजुरी दिल्यानंतर वरिष्ठ स्तरावरुन माहिती संकलीत करुन पदे भरण्यात येत असतात. सन २०१६ ला जाहिरात देऊन लेखी परीक्षा घेण्यात आली होती. दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ ला त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. त्यानंतर त्यांना डी.डी.ओ. कार्यालयातून नियुक्तीचे आदेश देण्यात आले होते. जेवढया पदांची मंजुरी प्राप्त झाली होती, तेवढया पदांची जाहिरात काढण्यात येऊन ती पदे भरण्यात आली आहेत, असा जिल्हा शल्य चिकित्सक यांनी खुलासा केला. जिल्ह्यामध्ये किती उप जिल्हा रुग्णालये आहेत, अहेरी आणि एटापल्ली या ठिकाणी असलेल्या रुग्णालयांमध्ये

शस्त्रक्रिया करण्यात येत असते काय ? असा प्रश्न समितीने विचारला असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, गडचिरोली जिल्ह्यामध्ये तीन उप जिल्हा रुग्णालय, नऊ ग्रामीण रुग्णालय आणि एक जिल्हा रुग्णालय आहे. अहेरी येथे स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ आहेत. परंतु भुलतज्ज्ञ उपलब्ध नाहीत. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली डॉक्टरांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये अहेरीसाठी पाच वैदयकिय अधिकारी मिळालेले असून त्यांची प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी एम.डी.आर.एच.एम.कडे पाठविण्यात आलेले आहे.

सदरहू ठिकाणी शल्यविशारद उपलब्ध आहेत काय? त्या ठिकाणी शस्त्रक्रिया करण्यात येतात काय अशी समितीने विचारणा केली असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, भुलतज्ज्ञासाठी विशेषबाब म्हणून मध्यप्रदेशातील बिजापूरप्रमाणे अडीच लाख रुपये महिना याप्रमाणे पॅकेज देण्याची तरतूद केली आहे. त्या ठिकाणी भुलतज्ज्ञनसल्यामुळे सर्जरी करण्यात येत नाही. परंतु त्या ठिकाणी ओ.पी.डी. सुरु असते. भुलतज्ज्ञ मिळण्यासाठी विभागाने प्रयत्न केलेले आहेत. भुलतज्ज्ञ मिळण्यासाठी विभागाने कोणत्या प्रकारचे प्रयत्न केले आहेत, त्याची माहिती समितीला द्यावी.

जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, जिल्हाधिकारी स्तरावरुन पाच ते सहा वैदयकिय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.त्यांची निवड झाल्यानंतर त्यांच्या प्रशासकीय मान्यतेसाठी शासन स्तरावर पाठविण्यात आले आहे. त्यांना मंजुरी मिळाल्यानंतर नियुक्त करुन घेण्यात येईल. त्याचप्रमाणे बालरोगतज्ज्ञ आणि स्त्रीरोगतज्ज्ञ यासाठी एका डॉक्टर कुटुंबाने या ठिकाणी काम करण्यास सहमती दर्शविलेली आहे. त्यांचीही मंजुरी मिळण्यासाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर त्यांना ताबडतोब नियुक्त केले जाईल. अहेरी आणि भामरागड यासारख्या दूर्गम भागामध्ये काम करण्यासाठी सहसा काही डॉक्टर तयार होत नाही. तरी देखील आता पाच ते सहा वैदयकिय अधिकारी मिळालेले आहेत.

समितीने, अहेरी येथील सी.टी. स्कॅन मशिन सुरु आहे काय अशी विचारणा केली असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, मागील वर्षापासून सी.टी. स्कॅन मशिन बंद होते. सदरहू सी.टी. स्कॅन मशिनला दहा वर्षे होत आहे. त्यामुळे आता नवीन सी.टी. स्कॅनसाठी कंपनीचा कर्मचारी येऊन जागा पाहणी करुन गेलेले आहेत.

राज्य शासनाकडून सी.टी.स्कॅन मशिनच्या मान्यतेसाठी किती कालावधी लागणार आहे असे समितीने विचारले असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, एम.आर. मशिन आणि सी.टी. स्कॅन राज्य शासनाकडून मिळणार आहे.

उप जिल्हा रुग्णालयाबाबत माहिती देण्यात यावी असा समितीने प्रश्न केला असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, उप जिल्हा रुग्णालयामध्ये सी.टी. स्कॅन मशिनसाठी रेडिओलॉजिस्टची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे अहेरी, आरमोळी आणि कुरखेडा या ठिकाणी गरोदर स्त्रियांसाठी सोनोग्राफीची व्यवस्था ठेवण्यात आलेली आहे. निवासी डॉक्टरांची एकूण संख्या ९ आहे.

समितीने, जिल्हा सामान्य रुग्णालयास आदिवासी विकास विभागाकडून किती निधी मिळालेला आहे आणि त्यामधून कोणती उपकरणे खरेदी करण्यात आली आहेत ? याची माहिती समितीला देण्यास सांगितले असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, सन २०१७-१८ ला ग्रामीण रुग्णांना आहार पुरविण्यासाठी ८८ लक्ष रुपयांचा निधी मिळालेला होता. सदर निधी ९ ग्रामीण रुग्णालय आणि ३ उप जिल्हा रुग्णालयातील रुग्णांच्या आहारासाठी खर्च करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे रुग्णालयांच्या दुरुस्ती आणि बांधकामासाठी एक कोटी ५० लक्ष रुपयांचा निधी मिळालेला होता. त्यामधून एटापल्ली, भामरागड, अहेरी आणि आरमोळी येथे किरकोळ स्वरुपाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे दुरुस्तीसाठी ५० लाख रुपयांचा निधी मिळाला होता. अहेरी येथे ब्लड बँक घेण्यात आलेली असून त्या ठिकाणी संरक्षण भिंत बांधण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी विद्युतीकरणाचे नवीन फेज घेण्यात आलेले आहे.

रुग्णालयात करण्यात आलेल्या सर्व खर्चाची कागदपत्रे समितीला सादर करण्यात यावी, असे समितीने सांगितले असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी होकार दर्शविला व ग्रामीण रुग्णालये आणि उप जिल्हा रुग्णालयासाठी काही उपकरणे खरेदी करण्यात आलेली आहेत. त्याबाबतची यादी समितीला सादर करण्यात येईल असे स्पष्ट केले.

राज्य शासनाने पुरविलेल्या औषधांव्यतिरिक्त जिल्हास्तरावरुन विभागाने औषधी खरेदी केली आहेत काय अशी समितीने विचारणा केली असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, राज्य शासनाकडून मागील चार वर्षापासून औषधांचा पुरवठा झालेला नाही. यावर समितीन, जर राज्य शासनाकडून औषधांचा पुरवठा झाला नसेल तर जिल्हा पातळीवरुन औषधांची खरेदी करण्यात येते काय असा प्रश्न विचारला असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, शासनाच्या नियमानुसार समिती स्थापन करण्यात आली आहे.

समितीमार्फत औषधी खरेदी करुन आदिवासी भागातील दवाखान्यामध्ये पुरवठा करण्यात येतो काय ? शल्यविशारद व भूलतज्ज्ञ नसल्यामुळे शस्त्रक्रिया होत नाहीत त्यामुळे औषधांचा उपयोग कशासाठी केला जातो. अशी समितीने विचारणा केली असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, मलेरिया, डेंगू व इतर आजार होत असतात, यासाठी शासनाची सहा सदस्यांची समिती आहे त्या समितीमध्ये शल्य चिकित्सक प्रशासकीय अधिकारी, ट्रेझरी अधिकारी, गृह उद्योग

रोजगार अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी यांची समिती असते. तीन वर्षात किती औषधी खरेदी करण्यात आली. अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, तीन वर्षाची माहिती अशी आहे की, आदिवासी उपयोजना अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये औषधी खरेदी करण्यासाठी १ कोटी ८२ लक्ष रुपये मिळाले होते. त्यामध्ये कॅम्प घेण्यात आले, ओपीडी व आयपीडी रूग्ण होते, या रुग्णांना औषधे देण्यात आली आहेत.

समितीने, मुदत संपलेली औषधे रुग्णालयाकडे असते काय असे विचारले असता, यासंदर्भात एक सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे, त्यामध्ये औषधांची नोंद केल्यामुळे कोणत्या औषधाची एक्सपायरी डेट काय आहे ते तातडीने लक्षात येते. स्नेक बाईट उपलब्ध आहेत. गडचिरोली येथून औषधाचा पुरवठा करण्यात येतो, असे जिल्हा जिल्हा शल्य चिकित्सक यांनी स्पष्ट केले.

एटापल्ली व अहेरी येथील रुग्णालयांची परिस्थिती अतिशय वाईट आहे, तेथे कोणतीही औषधी मिळत नाही, शल्यविशारद व भूलतज्ज्ञ तेथे नाहीत. रुग्णालयातील डायलेसिस विभाग बंद झालेला आहे. डायलेसिसचे पेशंट थांबवून ठेवणे योग्य नाही. अशी समितीने विचारणा केली असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, दोन वर्षापासून शल्यविशारद व भूलतज्ज्ञ नाहीत. दरमहा २०० रुग्णांचे डायलेसिस करण्यात येते. काल दिल्ली येथून रुग्णालयाला पुरस्कार मिळाले आहे, मॅनपॉवर कमी असून चांगले काम करण्यात आले आहे.

वर्ग-३ मधील श्री.डी. एम.काटोले यांचे प्रकरण जात पडताळणी समितीकडे किती दिवसापासून प्रलंबित आहे. असे समितीने विचारणा केली असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, सदर कर्मचारी वर्ग-३ चे आहेत, जात पडताळणी समितीकडून पत्र आलेले आहे. श्री.डी.एम. काटोले यांच्या जात पडताळणीसंदर्भात अमरावती जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने सन २०१४ मध्ये पत्र दिले आहे. सदर कर्मचारी हलबा समाजाचे आहेत. सदर जमातीचे प्रमाणपत्र वैध आहे की, अवैध आहे ते सत्वर कळविण्यात येईल. असे समितीतर्फे लेखी कळविण्यात आले आहे. सदर कर्मचाऱ्यांची नियुक्ती दिनांक २८ जानेवारी, २००० मध्ये झाली आहे.

वर्ग-४ मधील सरळसेवेची पदे सन २०१५-१६ मध्ये भरण्यात आली आहेत काय ? किती पदे रिक्त आहेत व किती पदे भरण्यात आली आहेत अशी समितीने विचारणा केली असता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, वर्ग-३ ची एकूण ४४३ पदे मंजूर आहेत, त्यापैकी २७६ पदे भरली आहेत. १६७ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ मध्ये एकूण २५८ पदे मंजूर आहेत, त्यापैकी १७१ पदे भरली आहेत व ८७ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ ची पदे भरण्यास मंजुरी मिळत नसल्यामुळे ती रिक्त आहेत. वर्ग-४ च्या पदांची कामे आऊटसोर्सिंगद्वारे करण्यात येत आहेत, त्यामुळे भरती करण्यास मान्यता मिळत नाही.

आरोग्याच्या संदर्भात जिल्ह्यातील परिस्थिती अतिशय वाईट आहे, आरोग्याच्या बाबतीत शल्य चिकित्सक यांचे दुर्लक्ष झालेले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयात सर्वांना वेळेत उपचार मिळत नाहीत. आरोग्यांच्या बाबतीत लोकांना दुसऱ्या ठिकाणी जावे लागते. राज्य शासनाकडून जेथे डॉक्टर नाहीत त्या जागा भरण्यात येत आहेत. यासंदर्भात समितीने अगोदरच शिफारस केली आहे. दुर्गम भागात विशेष बाब म्हणून भरती करण्याबाबत शासनाकडून सकारात्मकता दर्शविण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्ह्यातून शासनाकडे पाठपुरावा झाला पाहिजे. जिल्हा आरोग्य अधिकारी व शल्य चिकित्सक यांची समिती तयार करुन काही खाजगी डॉक्टरांच्या सेवा घेण्याची आवश्यकता आहे. या जिल्ह्याला विशेष अधिकार देण्यात आले आहेत. आरोग्याच्या बाबतीत अतिशय दक्ष राहणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्याला प्राधान्य देऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी असे समितीने मत व्यक्त केले.

यावर जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे शासन स्तरावरुन भरण्यात येतात. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती आहे. पदे भरण्याबाबत १५ दिवसात मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

एटापल्ली व भामरागड हे भाग अतिशय दुर्गम आहेत, त्या भागात डॉक्टर उपलब्ध नसणे योग्य नाही. रुग्णाला त्रास कमी झाला पाहिजे. त्यामुळे या दुर्गम भागात विशेष बाब म्हणून डॉक्टर उपलब्ध करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी असे समितीने निदेश दिले. याबाबत एटापल्ली व भामरागडच्या संदर्भात विचार करीत आहोत असे जिल्हाधिकारी यांनी समितीस सांगितले.

अहेरी येथे भूलतज्ज्ञ नाहीत, त्यामुळे तेथे शस्त्रक्रिया करण्यात अडचणी निर्माण होतात. याबाबत उपाययोजना करावी असे समितीने निर्देश दिले असता जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, यासंदर्भात काल माहिती घेतली आहे, अहेरी येथे भूलतज्ज्ञ नाही, वैद्यकीय अधिकारी व बालरोग तज्ज्ञ याबाबत प्रस्ताव सादर केले आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकारी व इतर सोई सुविधांबाबत मुख्यमंत्री महोदयांसोबत चर्चा झाली आहे. त्यामुळे यासंदर्भातील कार्यवाही तातडीने करण्यात येत आहे.

यावर समितीने योग्य ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीला सादर करावा. त्याचप्रमाणे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी देखील त्यांचा अहवाल समितीला सादर करावा असे निर्देश दिले. समितीस याबाबतचा अहवाल सादर करण्यात येईल असे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आश्वासन दिले.

**जलसंपदा विभाग :-**

विभागाला मिळालेल्या निधीबाबत समितीला माहिती देण्यात यावी अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, विभागाचे सध्या येंगलखेडा लघू पाटबंधारे प्रकल्प आणि कोसरी लघू पाटबंधारे प्रकल्प, ता. आरमोरी या ठिकाणचे प्रकल्प सुरु आहेत.

सदरहू दोन्ही प्रकल्पाची संपूर्ण माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता येंगलखेडा लघू पाटबंधारे प्रकल्प, ता. कुरखेडा याची द्वितीय सुप्रमा किंमत २७४२.१७ कोटी रुपये असून त्याला दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाची सिंचन क्षमता ६९५ हेक्टर असून प्रकल्पीय पाणीसाठी २.२० द.ल.घ.मी आहे. मागील वर्षी या प्रकल्पासाठी सहा कोटी रुपयांचा निधी मिळालेला आहे असे कार्यकारी अभियंता यांनी माहिती दिली.

सदरहू ६९५ सिंचन क्षमतेमध्ये किती अनुसूचित जमातीची गावे आणि शेत जमिनी येत आहेत सदरहू प्रकल्पाची सिंचन क्षेत्र कधी सुरु होणार अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, संपूर्ण गावे याअंतर्गत येतील. माहे जून महिन्यापासून या प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र सुरु होणार आहे.

या सिंचनाचा उपयोग कोणत्या पिकासांठी प्रामुख्याने करावा, यासाठी कृषी विभाग आणि स्थानिक लोकांचे मेळावे घेऊन त्यांना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता, या प्रकल्पासाठी काही दिवसांपूर्वी भुसंपादनाची अडचण निर्माण झाली होती. परंतु आता कोणत्याही प्रकारची अडचण नाही असे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले.

कोसरी प्रकल्पाबद्दल समितीला माहिती देण्यात यावी असे समितीने निर्देश दिले असता, कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, सदरहू प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता ५२३.८९ लाख रुपयांची आहे. द्वितिय सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत ३८७० आहे. सदर प्रकल्पाचा पाणीसाठा २.४३ द.ल.घ.मी. आहे. सन २०१९ पर्यंत सदरहू प्रकल्प पूर्ण होईल.

ज्यावेळी प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले त्यावेळी जे अतिक्रमित होते, त्यांना त्याबाबत सूचना किंवा नोटीस देण्यात आलेली आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता, प्रकल्पाच्या जमिनीवर ज्यांनी अतिक्रमण केलेले होते, त्यांना विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने अनुदान दयावे असे म्हटले होते. असे कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले.

यावर समितीने उपलब्ध पाणीसाठा विहित वेळेमध्ये होणे अपेक्षित होते. जलसंपदा विभागाकडून सहा तलाव बनविण्यासाठी जी जागा निवडण्यात आली, त्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता

मिळालेली होती. अशा प्रकारची मान्यता मिळत असताना त्या ठिकाणी अतिक्रमित जागा आहे, याची माहिती विभागाने घेतलेली नव्हती. या संदर्भात कोणत्याही प्रकारची कारवाई विभागामार्फत करण्यात आलेली नाही. या प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता केव्हा मिळाली ? अशी विचारणा केली असता, कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, सन २००५ ला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरहू प्रकल्प तयार करीत असताना बाधीत झालेल्या लोकांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता, कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या लोकांचे पुनर्वसन आणि गावठाण तयार करण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी आता वीज जोडणी देण्याची कार्यवाही सुरु आहे.

शेतकऱ्यांच्या मोबदल्यासंदर्भात मागणी करण्यात आलेली आहे काय ? पुनर्वसित गावांसाठी किती नागरी सुविधा देण्यात आल्या आहेत अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, १८ नागरी सुविधा देण्यात येत आहे, तेथील काही कामे सुरु आहेत. पुनर्वसित गावांसाठी ज्या योजना राबविण्यात आल्या त्यांचा अहवाल समितीला सादर करावा असे समितीने निर्देश दिले. यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीला अहवाल सादर करण्यात येईल असे आश्वासन दिले.

**विभागीय सचिवाची साक्ष :-**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २० ते २२ एप्रिल, २०१८ रोजी गडचिरोली जिल्हयास भेट दिली होती. त्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष समितीने घेतली. सदर साक्षीच्यावेळी समितीने खालील बाबींवर चर्चा केली.

अनुसूचित जमातीची शिपाई संवर्गातील ६ पदे, तलाठी १६ पदे, तसेच लिपीक टंकलेखकाची २ पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली असल्यास त्याबाबत माहिती देण्यात यावी, असे समितीने निर्देश दिले असता उप जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार २५ टक्के पदे निरसीत करावयाची होती शिपाई संवर्गातील सहा पदे भरलेली नाहीत. सरळ सेवा भरतीकरीता शासनाची मंजूरी असणे गरजेचे आहे.

समितीने, ही पदे कधीपासून रिक्त आहेत अशी विचारणा केली असता उप जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, तलाठी संवर्गातील १६ रिक्त पदे होती. मागील वर्षी २८ पदे भरली आहेत. पेसा अंतर्गत सर्व पदे भरलेली आहेत.

सन २०१४ मध्ये पेसा अंतर्गत कायदा अस्तित्वात आला तेव्हा १३ पदे भरणे अपेक्षीत होते त्यानंतर सन २०१७ च्या कायद्याप्रमाणे १६ पदे भरावी लागतील अशी समितीने विचारणा केली असता, एकूण २८ पदे पेसा अंतर्गत भरली आहेत. दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजी तलाठयाची २८ रिक्त पदे भरलेली आहे असे उप जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

तलाठयाची पेसा अंतर्गत पदे भरल्याबद्दल गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयाचे समितीने अभिनंदन केले.

समितीने उपस्थित केलेल्या विविध मुद्दयावरील माहिती व अहवाल समितीला १० दिवसात पाठविण्यात यावा असे समितीने निर्देश दिले असता उप जिल्हाधिकारी यांनी त्यास सहमती दर्शविली.

**अभिप्राय व शिफारशी :-**

(१) जिल्हाधिकारी कार्यालयाचा आकृतीबंध सन २००६ पासून अद्यापपर्यंत शासनाकडून नव्याने मंजूर करण्यात आला नाही. त्यामुळे या दरम्यान जिल्ह्यातील झालेल्या भरतीमध्ये विशेषतः अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार मोठया प्रमाणात नोकरीच्या लाभापासून वंचित राहिला आहे. समितीने दौऱ्याच्या वेळेस दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी यासंदर्भात नाराजी व्यक्त करुन याबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत निर्देश दिले होते. तथापि, जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक ७ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये यासंदर्भातील माहिती विभागीय आयुक्त, नागपूर यांचे कार्यालयास सादर केली. तसेच विभागीय आयुक्त, नागपूर कार्यालयाने सदर माहिती दिनांक ७ जानेवारी, २०२२ रोजी महसूल व वन विभाग मंत्रालयास सादर केली आहे. यावरुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करावयाच्या कार्यवाही संदर्भात खूप विलंब झाल्याचे निदर्शनास येत आहे. **गडचिरोली जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा असून अतिसंवेदनशील नक्षलग्रस्त जिल्हा आहे. जिल्ह्यातील आदिवासी तरुणांना नक्षली चळवळीत सक्रीय होण्यापासून रोखण्यासाठी त्यांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने शासनाने गडचिरोली जिल्ह्याचा आकृतीबंध तातडीने नव्याने मंजूर करावा व त्याप्रमाणे भरती प्रक्रिया राबवावी व रिक्त पदे भरावीत. तसेच यासंदर्भात कार्यवाही करण्यास विलंब करणाऱ्या जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) गडचिरोली जिल्ह्यातील आरोग्याच्या संदर्भात परिस्थिती अतिशय गंभीर असल्याचे समितीला निदर्शनास आले. जिल्हा रुग्णालयात वर्ग- ३ ची एकूण ४४३ पैकी १६७ पदे रिक्त आहेत. अहेरी, एटापल्ली व भामरागड या अति दुर्गम भागातील रुग्णालयात वैदयकिय अधिकारी,

बालरोगतज्ञ, स्त्री रोगतज्ञ, भूलतज्ञ उपलब्ध नाहीत. याचा जिल्ह्यातील आरोग्य सेवेवर परिणाम झाला असून जिल्ह्यातील आदिवासी बहूल भागात आदिवासींना वेळेवर उपचार, आरोग्य सेवा व सुविधा मिळत नसल्याने त्यांचा प्रशासना विरोधात रोष वाढत आहे. गडचिरोली जिल्हा हा अतिसंवेदनशील, नक्षलग्रस्त जिल्हा असल्याने आरोग्याच्या बाबतीत अतिशय दक्ष राहणे आवश्यक आहे. **जिल्ह्यातील आरोग्याच्या परिस्थितीवर तात्काळ उपाययोजना करण्याकरिता शासनाने जिल्ह्यातील वैदयकिय अधिकारी, बालरोगतज्ञ, स्त्री रोगतज्ञ, भूलतज्ञ व आरोग्य विभागातील इतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरावीत. तसेच जिल्ह्यातील आरोग्य सेवा प्रभावीपणे पुरविण्याबाबत योग्य ती उपाययोजना करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## मुख्य वन संरक्षक कार्यालय, गडचिरोली

समितीने, गट “क” व गट “ड” मधील सरळसेवेची १९ पदे रिक्त आहेत तसेच वन रक्षक पदांची ३९५ पदे पेसा क्षेत्रांतर्गत अनुशेष शिल्लक आहे. सदर अनुशेष किती कालावधीपासून रिक्त आहे. सदर पदांच्या नियुक्ती केव्हा करण्यात येणार आहे ? सदर पदे किती कालावधीपर्यंत भरण्यात येतील ? सध्या गडचिरोली परिक्षेत्रात किती वन रक्षक कार्यरत आहेत ? व किती पदे भरणे आवश्यक आहेत अशी विचारणा केली असता, मुख्य वनसंरक्षक यांनी विदित केले की, ३९५ वन रक्षकांचा पेसा अंतर्गत अनुशेष आहे. उर्वरित १९ पदांमधील पाच पदे ही वनपालांची आहेत. त्यामध्ये वनपालांच्या पदाबाबतचे प्रकरण माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ आहेत. यावर समितीने वनपालांचे प्रकरण माननीय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असण्याचे कारण काय आहे अशी विचारणा केली असता, मुख्य वनसंरक्षक यांनी स्पष्ट केले की, वनपाल हे पदोन्नतीचे पद आहे. परंतु यामध्ये जे पदवीधर वनपाल असतील त्यांच्यासाठी स्वतंत्र परीक्षा घेण्यात येत असते. वनपाल या पदासाठी ५० टक्के पदे ही सरळसेवेने भरावयाची व उर्वरित ५० टक्के पदे ही पदोन्नतीने भरावयाची असतात. परंतु पेसा क्षेत्रांतर्गत ३९५ पदांचा अनुशेष शिल्लक आहे, अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य वनसंरक्षक यांनी विदित केले की, पेसाक्षेत्रामधील ९०५ पदांपैकी ६९७ पदे अनुसूचित जमातीची भरावयाची होती. परंतु सन २०१५ आणि २०१६ मध्ये १०७ पदांची भरती पेसा अंतर्गत करण्यात आलेली आहे. त्यानंतर ज्याप्रमाणे पदे रिक्त होतील, त्याप्रमाणे पदांची भरती करण्यात येईल.

यावर समितीने, पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत ? त्याचप्रमाणे पदोन्नती देण्याबाबत विभागाची प्रक्रिया काय आहे, याची माहिती समितीला देण्यात यावी. अशी विचारणा केली असता पदोन्नती देण्यासाठी मुख्य वन संरक्षकांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केलेली आहे. शासनाच्या धोरणानुसार पदोन्नती देण्यात येत असते. कर्मचाऱ्यांना पदोन्नती देत असताना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र, विभागीय चौकशी, त्यांची पदासाठीची पात्रता, त्या कर्मचाऱ्याचा कार्यकाळ या सर्व गोष्टींची तपासणी केली जाते. असे मुख्य वनसंरक्षक यांनी सांगितले.

अनुसूचित जमातीच्या जात पडताळणीसाठी प्रलंबित असलेल्या ०४ प्रकारणातील उमेदवारांची केव्हा व कोणत्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे ? सदर प्रकरणी जात पडताळणी समिती, गडचिरोलीकडे केव्हा पाठपुरावा करण्यात आलेला आहे व जात पडताळणी समितीकडे किती कालावधीमध्ये निर्णय घेण्यात येईल. अशी समितीने विचारणा केली असता मुख्य वनसंरक्षक यांनी स्पष्ट केले की, चार प्रकरणातील उमेदावारांना सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत सांगण्यात आलेले असून त्याची अद्यापर्यंत नियुक्ती करण्यात आलेली नाही.

यावर समितीने ज्यावेळी कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली त्यावेळी त्यांच्या नियुक्ती आदेशामध्ये, "सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे," अशा प्रकारचा उल्लेख करण्यात आला नाही काय असा प्रश्न विचारला असता, त्यांच्या नियुक्ती आदेशामध्ये तसा उल्लेख केला आहे. परंतु सदर कर्मचाऱ्यांना जात वैधताप्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्त करण्यात येणार नाही. असे मुख्य वनसंरक्षक यांनी स्पष्ट केले.

सन १९९५ पूर्वी आणि सन १९९५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा घोषवारा समितीला द्यावा असे समितीने सांगितले असता, मुख्य वनसंरक्षक यांनी विदित केले की, गट क मधील सन १९९५ पूर्वी नियुक्त झालेले दोन कर्मचारी आहेत आणि सन १९९५ नंतर नियुक्त झालेले ९ कर्मचारी आहेत. त्यापैकी चार प्रकरणांचा प्रस्ताव जात वैधता पडताळणी समितीकडे पाठविण्यात आलेला असून सहा प्रकारणे न्याय प्रविष्ठ आहेत.

सन १९९५ पूर्वी नियुक्त झालेले कर्मचारी, त्यानंतर सन १९९५ नंतर नियुक्त झालेले कर्मचारी व सन २०१३ नंतर नियुक्त झालेले कर्मचारी किती आहेत अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य वनसंरक्षक यांनी विदित केले की, सन १९९५ पूर्वीचे दोन कर्मचारी नियुक्त झालेले आहेत, सन १९९५ नंतरचे दोन कर्मचारी आणि सन २०१३ मध्ये चार कर्मचारी नियुक्त झालेले आहेत आणि सन २०१२ मध्ये दोन कर्मचारी नियुक्त झालेले आहेत. दिनांक ०१ जानेवारी, २०१३ आणि दिनांक ७ जानेवारी, २०१३ ला कर्मचारी नियुक्त झालेले आहेत. यावर समितीने दिनांक १८ मे, २०१३ व सन १९९५ नंतर किती कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाली व त्या कर्मचाऱ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली ? याची माहिती समितीला देण्यात यावी. असे समितीने सांगितले असता, मुख्य वनसंरक्षक यांनी स्पष्ट केले की, श्री. आलापुरे यांनी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जात वैधतेचा प्रस्ताव सन २०१३ ला सादर केलेला आहे. सन २०१२ मध्ये नियुक्त झालेले दोन कर्मचारी आहेत.

यावर समितीने, या अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला होता काय ? त्याचप्रमाणे त्यांना न्यायालयामध्ये प्रकरण दाखल करण्यासाठी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी वेळेवर कार्यवाही न केल्याने संधी मिळाली होती काय ? सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करावयास पाहिजे होते. परंतु ते विहित कालावधीमध्ये सादर न करता त्यांना वन विभागाने कोणत्याही प्रकारची नोटीस न दिल्यामुळे सदर कर्मचारी किंवा अधिकारी न्यायालयात गेले आहेत काय अशी विचारणा केली असता मुख्य वनसंरक्षक यांनी स्पष्ट केले की, यामध्ये एक प्रकरण हे सन २०१३ चे आहे. ज्यावेळी सरळसेवा भरती करण्यात येऊन कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्यात येतात, त्यावेळी त्यांच्या नियुक्ती आदेशामध्ये शासनाच्या निर्णयानुसार

सहा महिन्यामध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात यावी, अशा प्रकारचा उल्लेख करण्यात आलेला नव्हता काय ? जर अशा प्रकारचा उल्लेख करण्यात आला असेल तर त्या कर्मचाऱ्यांनी कोणत्या कारणास्तव न्यायालयात प्रकरण दाखल केले ? त्याचप्रमाणे जर सहा महिन्यामध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कर्मचाऱ्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल, अशा प्रकारचे पत्र कार्यालयाने दिले नाही काय अशी विचारणा समितीने केली असता मुख्य वनसंरक्षक यांनी विदित केले की, एका प्रकरणामध्ये एका कर्मचाऱ्यांची जात वैधता अवैध झाली होती. कर्मचाऱ्यांची जात वैधता अवैध झाल्यानंतर किती दिवसानंतर ते कर्मचारी न्यायालयात गेले ? जर एखादया कर्मचाऱ्याची जात वैधता जर अवैध झाली असेल तर कायद्यातील तरतूदीच्या कलम १० नुसार संबंधित विभाग प्रमुखांनी त्या कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई केली पाहिजे. त्याचप्रमाणे त्या कर्मचाऱ्याची स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली काय अशी समितीने विचारणा केली असता अशा प्रकारची कारवाई करण्यात आल्याचे दिसून येत नाही. असे मुख्य वनसंरक्षक यांनी स्पष्ट केले जर एखादया गैर आदिवासी कर्मचाऱ्याने खोटया जातीचा लाभ घेतला असेल तर त्यामुळे मूळ आदिवासी कर्मचाऱ्यावर अन्याय होत असतो. त्यामुळे अशा प्रकारच्या कर्मचाऱ्यांच्या विरुध्द विभागाने योग्य ती कारवाई केली पाहिजे. अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखांची होती. उपरोक्त प्रकारची कारवाई विभागाने न केल्यामुळे श्री. खारगे यांची चौकशी करण्यात यावी. असे समितीने निर्देश दिले.

मागील तीन वर्षात वन विभागासाठी योजना निहाय किती निधी प्राप्त झाला व त्याचा विनियोग कशाप्रकारे करण्यात आला ? तसेच, निधी अखर्चित झाला असल्यास त्यांची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य वनसंरक्षक यांनी विदित केले की, सन २०१५-१६ मध्ये विभागाला ३ कोटी ९० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. सन २०१६-१७ मध्ये ३ कोटी ९५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. त्याचप्रमाणे सन २०१७-१८ मध्ये २ कोटी १४ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. सदर निधी पूर्णपणे खर्च करण्यात आलेला आहे.

यावर समितीने, तीन वर्षाच्या कालावीधमध्ये जवळपास ११ कोटी रुपयांचा निधी वन विभागाला प्राप्त झालेला आहे. या सर्व निधीमधून कोणत्या प्रकारची कामे करण्यात आली, त्याची माहिती समितीला देण्यात यावी. अशी विचारणा केली असता मुख्य वनसंरक्षक यांनी विदित केले की, या निधीच्या माध्यमातून बांबू, निंब, आवळा, बेहडा या प्रकारची औषधी झाडे लावण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे वन विभागाच्या माध्यमातून इको-टुरिझम करण्यात आलेले. तसेच, आलापल्ली येथील वनवैभव वाढविण्यात आलेले आहे.

जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये विभागाला ९ कोटी ७६ लक्ष रुपये प्राप्त झाले आहेत. सदर निधी कोणकोणत्या कामांवर खर्च करण्यात आला. वन तळे उभारण्यासाठी किती निधी खर्च करण्यात आला. असा समितीने प्रश्न विचारला असता मुख्य वनसंरक्षक यांनी माहिती दिली की, सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये १६ वनतळे तयार केली आहेत. या दोन वर्षात ६८ लाख व १९ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे देसाईगंज येथे सन २०१७-१८ साठी ५३ लक्ष ४५ हजार रुपयांचा निधी प्राप्त होता. त्या वर्षात ६ वनतळे तयार करण्यात आले असून त्यासाठी ८ लक्ष ८५ हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत. तसेच आलापल्ली वन विभागात सन २०१५-१६ मध्ये ९ वनतळे व सन २०१६-१७ मध्ये ५ वनतळे तयार करण्यात आली आहेत.

लाभार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या गॅस वाटपामध्ये तफावत दिसून येत आहे. एका ठिकाणी २०० रुपये दिले जात आहेत तर दुसऱ्या विभागात २५०० रुपये दिले जात आहेत. बीपीएल गॅस धारकांना २०० रुपये मिळतात. वन विभागाच्या माध्यमातून २५०० रुपये गॅससाठी देण्यात येत आहेत. असा फरक कशामुळे दिसत आहे, दोन्ही ठिकाणचे बीपीलएलधारक सारखेच आहेत. अशी समितीने विचारणा केली असता मुख्य वनसंरक्षक यांनी स्पष्ट केले की, वन विभागामार्फत जी योजना राबविण्यात येते त्यामधून अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांना शासन निर्णयानुसार ९१०० रुपये देण्यात येतात. ४५०० रुपये गॅस कनेक्शनसाठी देण्यात येतात. १२ सिलेंडरसाठी २५०० रुपये देण्यात येतात. यामध्ये २५ टक्के रक्कम लाभार्थ्यांची असते व ७५ टक्के रक्कम शासनाकडून देण्यात येते.

वन विभागामार्फत लाभार्थ्यांना वनपट्टे देण्यात आले आहेत काय, लाभार्थ्यांची नावे ७/१२ वर दर्शविली आहे काय लाभार्थ्यांना किती जमिनीचे वाटप केले आहे. अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य वनसंरक्षक यांनी विदित केले की, वनपट्टे वाटपासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती आहे. ३५,३९४ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. त्यापैकी ३१,१७२ लोकांना वनपट्टे मंजूर करण्यात आले आहे. ३०,२६३ लोकांना वनपट्ट्यांचे वाटप केले आहे. एक एकर पासून चार एकरपर्यंत वनपट्ट्यांचे वाटप केले आहे. मागणी प्रमाणे जमिनीचे वाटप केले आहे.

जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, सद्यस्थितीत २० ते ३० दावे प्रलंबित आहेत. ३१ हजार दावे निकाली काढण्यात आले आहेत. सीसीएफ यांच्याकडून १३६५ दावे निकाली काढले आहेत. जिल्ह्यातील किती गावांमध्ये खोदतळे करण्यात आली आहेत. अशी विचारणा केली असता सन २०१७-१८ मध्ये १२२ गावांमध्ये जलसंधारणासाठी खोदतळे करण्यात आली आहेत. असे

जिल्हाधिकारी यांनी सांगितले. वन क्षेत्रात झाडे लागवडीची काय परिस्थिती आहे. अशी विचारणा समितीने केली असता मुख्य वनसंरक्षक  यांनी स्पष्ट केले की,  ५० लक्ष झाडांची लागवड पूर्ण करण्यात आली आहे.

समितीने वन विभागाची माहिती सादर करावी असे निदेश दिले असता मुख्य वन संरक्षक यांनी विदित केले की, लेखी माहिती सादर करण्यात आली आहे. गॅस वाटपासंदर्भातील माहिती सादर करण्यास सांगितली होती. मागील तीन वर्षात ३४,२५३ गॅस वाटप करण्यात आले आहेत.

सदर योजना ही मागच्या वर्षीची होती काय, पहिल्या वर्षी १० टाक्या द्यायच्या असे होते काय, अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य वन संरक्षक यांनी त्यास सहमती दर्शविली यावर समितीने पहिल्या वर्षी १२, दुसऱ्या वर्षी १०, तिसऱ्या वर्षी ८ टाक्या पुरवठा करायच्या असतात. यासाठी वन विभाग अनुदान देतो का? गॅस टाक्या वाटप झाल्यामुळे दरवर्षी अनुदान वितरण होते काय, अशी विचारणा केली असता मुख्य वन संरक्षक  यांनी सांगितले की, वन क्षेत्रामध्ये गॅस सिलेंडरचे वाटप होते.

जंगल तोड कमी झाली पाहिजे म्हणून गॅस सिलेंडर वाटप केले जाते. ते उद्दिष्ट पूर्ण करणे आवश्यक आहे.  १० गॅस सिलेंडर पैकी ५, ८ गॅस सिलेंडर पैकी ३ सिलेंडर देण्यात आले आहेत अशा स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत असे समितीने लक्षात आणून दिले असता मुख्य वन संरक्षकांनी विदित केले की, गॅस सिलेंडरसाठी ७५ टक्के अनुदान शासनाचे असते, तर २५ टक्के अनुदान लाभार्थीचे असते. यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समिती असून या समितीचे अध्यक्ष आणि सचिवांच्या परवानगीशिवाय पैसे काढता येत नाही.

यावर समितीने वर्षाला गॅसच्या १२ टाक्या देणे आवश्यक आहे. पण त्या मिळत नाहीत. गॅस टाक्या मिळत नाही अशा लोकांच्या तक्रारी आल्या आहेत. वन विभागातर्फे योजना राबविण्यात येत आहे. यासाठी आदिवासी विकास विभागाकडून निधी देण्यात येतो. संयुक्त वन व्यवस्थापन समिती असते त्यावर संबंधित विभागाचे अधिकारी सचिव म्हणून काम करीत असतात. त्यामुळे संबंधितांना गॅस टाक्या या पुरविल्याच पाहिजेत. असे असताना हा निधी जातो कुठे ? असा प्रश्न केला असता मुख्य वनसंरक्षक यांनी सांगितले की, हा पैसा समितीकडे जातो. एकूण १११ समित्या आहेत. शासनाच्या विविध योजनांचा निधी हा एकाच खात्यावर येतो.

कोणत्या गावांना किती गॅस टाक्या कोणत्या महिन्यामध्ये पुरविण्यात आल्या आहेत याची गावनिहाय माहिती सादर करावी. गॅस वापरासंबंधात विभागाने लोकांमध्ये जनजागृती केली पाहिजे. अशाने जंगलतोड कमी होईल. मात्र, ते उद्दिष्ट साध्य होताना दिसत नाही. याकडे अपर आदिवासी

आयुक्त यांनी लक्ष घालून आदिवासी लोकांना गॅस सिलेंडर कसे मिळेल हे पहावे असे समितीने निदेश दिले.

गॅस सिलेंडरचे वाटप करीत असल्यामुळे रॉकेलचा कोटा कमी झालेला आहे काय, असा प्रश्न समितीने विचारला असता पुरवठा अधिकारी यांनी सांगितले की, गॅस सिलेंडरचे वितरण करण्यात येत असल्यामुळे रॉकेलचा कोटा कमी करण्यात आलेला आहे.

**विभागीय सचिवाची साक्ष :-**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २० ते २२ एप्रिल, २०१८ रोजी गडचिरोली जिल्हयास भेट दिली होती. त्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदर साक्षीच्यावेळी समितीने, खालील बाबींवर चर्चा केली.

वनरक्षक पदांचा पेसा अंतर्गत ३९५ पदांचा तसेच वनपाल ५ पदांचा अनुशेष भरण्यात आला आहे काय? तसेच सर्वोच्च न्यायालयात वनपाल पदोन्नतीबाबतच्या प्रकरणांची सद्यःस्थितीबाबत समितीस अवगत करावे अशी समितीने विचारणा केली असता, प्रधान सचिव यांनी विदित केले की, गडचिरोली पेसा अंतर्गत वनरक्षकांची १८० पदे रिक्त आहेत. सन २०१६ मध्ये ६६ पदे व सन २०१७ मध्ये ६५ पदे भरण्यात आलेली आहेत. सन २०१९ मध्ये ६२ पदांसाठी पेसा अंतर्गत स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची पद भरती प्रक्रिया करण्यात आली होती. वनरक्षकांची पदे कसे भरावीत याबाबत सन २०१८ मध्ये वन विभागाने एक शासन निर्णय निर्गमित केला आहे. या शासन निर्णयानुसार सन २०१९ मधील भरती प्रक्रियेमध्ये फक्त दोन उमेदवार पात्र ठरलेले आहेत. त्यानंतर उमेदवारांना प्राप्त करुन घेण्यासाठी प्रकल्प अधिकारी यांच्यास्तरावर प्रशिक्षण देण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. समितीची परवानगी असेल तर वन विभागाचे मुख्य वन संरक्षक अधिक माहिती देतील.

मुख्य वन संरक्षक यांनी विदित केले की, सन २०१९ मध्ये वनरक्षकांसाठी घेण्यात आलेली लेखी परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली होती. त्यामध्ये १९२ उमेदवारांनी परिक्षा दिली होती. त्यापैकी पेसा क्षेत्रातील ५९ उमेदवारांनी परिक्षा दिली होती. या ५९ उमेदवारांपैकी फक्त २ उमेदवार पात्र झाले होते. सदर परीक्षा ऑनलाईन घेतल्यामुळे स्थानिक उमेदवार पात्र होऊ शकले नाहीत. उक्त भरती प्रक्रियेमध्ये ४५ टक्के पात्रता गुण ठेवण्यात आले होते. सदर टक्क्यांची अट कमी करुन ती ३० टक्क्यापर्यंत कमी केली आणि स्थानिक उमेदवांराना प्रशिक्षण दिले तर त्यांच्यामध्ये सुधारणा होऊन ते भरती प्रक्रियेमध्ये पात्र होऊ शकतात. याबाबतचा तशा प्रस्ताव तयार करुन तो जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केलेला आहे. त्याबाबतची प्रक्रिया देखील सुरु करण्यात आलेली

आहे. स्थानिक ६०० उमेदवारांची निवड करुन प्रकल्प अधिकारी यांच्यास्तरावर पूर्व परीक्षचे प्रशिक्षण देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की, अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्याची यावर्षी तरतूद केलेली आहे. ४५ टक्क्यांची अट असल्यामुळे फक्त दोन उमेदवार पात्र होऊ शकले. त्यामुळे ती अट ३० टक्के करण्यात यावी, असा प्रस्ताव सादर केलेला आहे. जर सदर अट ३० टक्के केली असती तर किती विद्यार्थी पात्र झाले असते असा समितीने प्रश्न विचारला असता, मुख्य वन संरक्षक यांनी सांगितले की, याबाबतची माहिती घेऊन समितीला सादर करण्यात येईल.

बार्टीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण दिले जाते. आज बार्टीचे संचालक आजच्या बैठकीसाठी उपस्थित आहेत. आपल्या माध्यमातून अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना कोणकोणत्या परीक्षांचे प्रशिक्षण दिले जाऊ शकते, याबाबत माहिती देण्यात यावी असे समितीने निर्देश दिले असता, अधिकारी यांनी विदित केले की, या विषयांसाठी ९ निविदा काढल्या आहेत. सर्व निविदांचे कार्यारंभ आदेश काढीत आहोत. या माध्यमातून बँकींग, रेल्वे, पोस्ट ऑफिस, टीईटी, नीट, यूपीएससी व एमपीएससी परीक्षांची तयारी करुन घेतली जाते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सदर प्रशिक्षण ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने सुरु ठेवण्यात आले आहे. ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी उमेदवारांना सँमसंगसारख्या ब्रॅन्डेड कंपनीचे टॅब देण्यात आलेले आहेत. तसेच त्यांना पुस्तकांचा संच देखील देण्यात आलेला आहे. या माध्यमातून या उमेदवारांना साधारणतः एक वर्षे प्रशिक्षण दिले जाते. कोरोनाची तिसरी लाट आली तरी प्रशिक्षणामध्ये खंड पडू नये यासाठी ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण देण्यात येणार आहे. बार्टीच्या सर्व मॉडेलचा अभ्यास केल्यानंतर अनुसूचित जमातीच्या उमेदवांराना देखील ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने प्रशिक्षण कसे देता येईल, याबाबत विचार करण्यात येईल.

समितीने वनहक्क / वनपट्टे वाटपाबाबत समितीला माहिती द्यावी असे निर्देश दिले असता प्रधान सचिव यांनी सांगितले की, एकूण ३१ हजार ६६९ दावे मंजूर करण्यात आलेले आहेत. तसेच ३५ हजार ६०० वैयक्तिक दावे व एकूण १३२७ सामुदायिक दावे आहेत.

सामुदायिक दाव्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे सदर दाव्यानुसार आदिवासी समाजातील लोकांना वन विभागाने जमीन द्यावी. विभागाने त्यांना लवकरात लवकर जमीन देण्याची कार्यवाही करावी तसेच वन विभागाकडे लाईट पोल, डीपी बाबत अडचणी असतील तर त्या लवकर सोडवाव्यात. ३.२ चे प्रलंबित प्रस्ताव मंजूर करण्यात यावेत. वन पट्टे, रस्ते,

लाईटचे प्रस्ताव प्रलंबित असल्यास ते मजूर करण्यात यावेत असे समितीने निर्देश दिले त्यास प्रधान सचिवांनी अनुमती दर्शविली.

**अभिप्राय व शिफारशी :-**

**वन विभाग :-**

(१) केंद्र शासनाची वन विभागामार्फत राबविण्यात येणारी 'उज्ज्वला गॅस' वाटप योजना प्रभावीपणे राबविण्यात येत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले या योजनेअंतर्गत पहिल्या वर्षी १२ दुसऱ्या वर्षी १० व तिसऱ्या वर्षी ८ गॅसच्या टाक्या पुरविण्याचे उद्दिष्ट आहे. या गॅस टाक्यांसाठी ७५ टक्के अनुदान शासनाचे असते तर २५ टक्के अनुदान लाभार्थ्याचे असते. परंतू लाभार्थ्यांना वर्षभरात ५-६ टाक्या पुरविण्यात येत असल्याच्या तक्रारी समितीस दौऱ्याच्यावेळी प्राप्त झाल्या होत्या. 'उज्ज्वला गॅस' योजनेच्या माध्यमातून ग्रामीण व दुर्गम भागातील माहिलांना स्वयंपाकाच्या इंधनासाठी रोजची काही किलोमीटरची पायपीट कमी करुन त्यांना स्वच्छ इंधन उपलब्ध करुन देणे तसेच या माध्यमातून वृक्ष तोड कमी करणे हे उद्दिष्ट होते. जर वन विभागाने ही योजना प्रभावीपणे राबवायची असेल तर लाभार्थ्यांना वेळेवर वर्षभरात गॅसच्या १२ टाक्या उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या योजनेतील उद्दिष्टयांनुसार वर्षभर वेळेवर गॅसच्या १२ टाक्या पुरवठा करण्याबाबत तात्काळ उपाययोजना करण्यात यावी. **तसेच लाभार्थ्यांना त्यांच्या वाड्या/वस्त्यांवर गॅसची टाकी पुरवण्याची व्यवस्था करण्यात यावी व वन व्यवस्थापन समितीकडून गॅस टाक्या वाटपाबाबत व त्याकरिता खर्च केलेल्या अनुदानाचा मासिक आढावा उप वनसंरक्षकांनी घ्यावा व ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी उपाययोजना करावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन माहिन्यात सादर करावी, अशी समिती शिफारस करित आहे.**

(२) गडचिरोली वन विभागात पेसा अंतर्गत वनसंरक्षकांची १८० पदे रिक्त आहेत. सन २०१९ मध्ये ६२ पदांसाठी पेसा अंतर्गत स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची पद भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर परिक्षा ऑनलाईन घेतल्यामुळे फक्त स्थानिक २ उमेदवार पात्र झाले. **यावर उपायोजना म्हणून स्थानिक उमेदवारांना या परिक्षेच्या अनुषंगाने प्रशिक्षण देऊन पुढील भरतीच्या वेळेस परिक्षा घेण्याच्या प्रक्रियेत आवश्यक बदल करून ऑनलाईन तसेच ऑफलाईन पद्धतीनेही भरतीची परिक्षा घेण्यात यावी जेणेकरुन जास्तीत जास्त स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवार पात्र ठरतील व पेसा अंतर्गत रिक्त जागा भरण्यात येतील. याबाबत तातडीने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

## गडचिरोली जिल्ह्यातील नगरपालिका / नगरपंचायत / नगरपरिषद

**गडचिरोली नगरपरिषद :-**

अनुसूचित जमातीची वर्ग-४ ची एकूण ५ पदे रिक्त आहेत. ती पदे का भरण्यात आली नाहीत. असे समितीने विचारणा केली असता मुख्याधिकारी यांनी विदित केले की, वर्ग-४ ची रिक्त पदे सरळसेवेची आहेत, आस्थापना खर्च जास्त झाल्यामुळे सदर पदे भरण्यात आली नाहीत. गडचिरोली नगरपरिषदेतील वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्याची जात वैधता प्रमाणपत्रे घेण्यात आली आहेत काय असे समितीने विचारले असता मुख्याधिकारी (गडचिरोली नगरपरिषद) यांनी सांगितले की, वर्ग-३ चे सन १९९५ पूर्वीचे चार कर्मचारी होते त्यांच्याकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे. वर्ग-४ च्या एकूण ९ कर्मचाऱ्यांपैकी ८ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. वर्ग-४ चे कर्मचारी श्री.मोंगसु नामदेव मडावी यांची नियुक्ती दिनांक ४ फेब्रुवारी, १९८७ ची असून त्यांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करावा म्हणून त्यांना दिनांक ५ ऑगस्ट, २०१७ व दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी पत्र दिले आहे. त्यांनी अद्याप प्रस्ताव सादर केलेला नाही. दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार कारवाई करण्यात येईल. याबाबत समितीने विचारणा केली की, या प्रकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने काही आदेश दिले आहेत काय ? त्यासंदर्भात मागासवर्ग कक्षातल्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, या प्रकरणात दिनांक ३० जुलै, २०१३ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे निदेश देऊन संबंधित विभागाने ३ महिन्यात कार्यवाही करावयाची आहे.

मागासवर्गीय कक्षाकडून तपासणी करताना नोंदवहीमध्ये कशा प्रकारे शेरे लिहिण्यात येतात अशी समितीने पृच्छा केली असता मागासवर्ग कक्षाच्या अधिकाऱ्यांनी विदित केले की, पद निहाय बिंदू नामावली तपासण्यात येते. त्यावेळी ज्या त्रुटी असतात किंवा काही बदल करण्याच्या लेखी सूचना देण्यात येतात. त्यानुसार विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

नगरपालिका गडचिरोलीचे अधिकारी याप्रकरणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. राज्य शासनाच्या नियमांची अंमलबजावणी केली जात नाही. वेळच्या वेळी बिंदू नामावली तपासणी करुन जात वैधता प्रमाणपत्र संबंधितांकडून घेणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर नियुक्तीनंतर ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त होत नसेल तर तो बिंदू रिक्त केला पाहिजे. मूळ आदिवासी बांधवावर अन्याय होता कामा नये. शासनाचे नियम व कायद्यानुसार कार्यवाही करण्याचा पाठपुरावा विभागाने केला पाहिजे. असे समितीने निदेश दिले. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी समितीला आश्वासित केले की, सदर प्रकरणाची कार्यवाही एक महिन्याचा कालावधीत करण्यात येईल.

गडचिरोली नगरपरिषदेमध्ये आदिवासी लोकसंख्या किती आहे. एकूण सदस्य संख्या किती आहे व अनुसूचित जमातीचे किती प्रभाग आहेत. अशी समितीने विचारणा केली असता मुख्याधिकारी यांनी विदित केले की, एकूण ५४,१५२ लोकसंख्या आहे त्यापैकी ८८३६ लोकसंख्या आदिवासी लोकांची आहे. एकूण २५ सदस्य संख्या असून ४ प्रभाग अनसुचित जमातीचे आहेत. यामध्ये दोन महिला व दोन पुरुष आहेत. खुल्या प्रवर्गात काही अनुसूचित जमातीचे उमेदवार निवडून आले आहेत.

अनुसूचित जमातीच्या प्रभागात कोणत्या योजना राबविण्यात आल्या आहेत. अशी समितीने विचारणा केली मुख्याधिकारी यांनी सांगितले की, अनुसूचित जमातीच्या प्रभागात प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यात आली आहे. दोन डीपीआर सुरु करण्यात आले आहेत, अनुसूचित जमातीच्या २२ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे आदिवासी प्रभागात नाली बांधकाम, स्लॅब कलवर्ट बांधकाम, पावसाळ्यात रस्त्यावर मुरुम टाकणे, पाणी पुरवठा पाईप लाईन टाकणे इत्यांदी कामे करण्यात आली आहेत.

नगरपालिकेचे एकूण उत्पन्न किती आहे व त्यातून व्यक्तिगत लाभाच्या कोणत्या योजना घेण्यात आल्या आहेत. अनुसूचित जमातीच्या लोकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कोणत्या योजना राबविण्यात आल्या आहेत. अशी समितीने विचारणा केली असता मुख्याधिकारी यांनी सांगितले की, बचत गटांना लाभ देण्यात आलेला आहे, या माध्यमातून २ लाख ८७ हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत.

नगरपरिषदेच्या एकूण उत्पन्नाच्या ५ टक्के निधी राखून ठेवण्यात येतो. सन २०१४-१५, सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये निधी खर्च न होण्याची काय कारणे आहेत. अनुसूचित जमातीच्या प्रभागात किती निधी व कोणती कामे केली याची सविस्तर माहिती समितीला आढावा बैठकीत सादर करावी. ज्या कर्मचारी/अधिकाऱ्यांना जातवैधता प्रमाणपत्र मिळाले आहे त्याची सत्य प्रत समितीच्या माहितीसाठी सादर करावी. तसेच किती जणांची जातपडताळणी होणे बाकी आहे व किती जणांची जातपडताळणी झाली आहे याची एकत्रित माहिती समितीला सादर करावी.

**नगर परिषद, देसाईगंज**

नगर परिषद, देसाईगंज वर्ग-४ मधील शिपाई हे एक पद किती कालावधीपासून रिक्त आहे व सदर पद किती कालावधीमध्ये भरण्यात येणार आहे असे समितीने विचारले असता मुख्याधिकारी, देसाईगंज यांनी सांगितले की, नगर परिषद, देसाईगंज वर्ग-३ मध्ये एकूण मंजूर पदे २२ असून अनुसूचित जमातीसाठी २ मंजूर पदे असून ती पदे भरलेली आहेत. वर्ग-४ मध्ये एकूण मंजूर पदे ३३ असून

अनुसूचित जमातीसाठी २ पदे मंजूर असून १ पद भरलेले आहे, तर १ पद रिक्त आहे. वर्ग-४ मधील फायरमनचे १ पद भरलेले आहे, तर शिपायाचे १ पद रिक्त आहे.

श्री. गारे, कनिष्ठ लिपिक यांच्या जात पडताळणी संदर्भात जात पडताळणी समितीने कोणता निर्णय घेतला आहे  अशी समितीने पृच्छा केली असता मुख्याधिकारी  यांनी विदित केले की, श्री. गारे, कनिष्ठ लिपिक यांची अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातून भरती झाली आहे. अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर न केल्यामुळे तत्कालीन अनुसूचित जमाती कल्याण समितीने त्यांना सेवेतून कमी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार श्री.गारे यांच्या विरूद्ध सेवा समाप्तीची कारवाई करण्यात आली होती. त्यास श्री.गारे यांनी उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडे अर्ज करून स्थगनादेश प्राप्त करून घेतला. सदर प्रकरणाची सुनावणी होऊन श्री.गारे यांनी ४ आठवड्यामध्ये जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी प्रकरण जात वैधता समितीकडे सादर करावे व १५ महिन्यात समितीने निर्णय घ्यावा असे अंतिम आदेश दिनांक १ सप्टेंबर, २०१५ रोजी देण्यात आले आहेत. त्यानुसार श्री.गारे यांनी जात वैधता प्रमाणपत्र समिती, गडचिरोली यांच्या कार्यालयात अर्ज सादर केला असून सदर प्रकरण प्रलंबित आहे. यासंदर्भात मागासवर्ग कक्षाच्या अधिकाऱ्यांनी स्प्ष्ट केले की, श्री. गारे यांच्यासंदर्भात दिनांक १३ एप्रिल, २०१८ रोजी निर्णय झालेला असून त्याची प्रत नगर परिषद, देसाईगंज कार्यालयाला पाठविलेली आहे.

जातवैधता प्रमाणपत्रासंबंधात दिनांक २३ मे २००१ रोजी कायदा करण्यात आला आहे. त्यात काय नमूद केले आहे असे समितीने विचारले असता मागासवर्ग कक्षाच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली की ज्या उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र बोगस आढळून येईल त्या उमेदवारास नियुक्ती प्राधिकाऱ्याने शासकीय सेवेतून कमी केले पाहिजे असे नमूद करण्यात आले आहे.

समितीने नगरपरिषदेस काय सूचना केल्या होत्या, अशी विचारणा केली असता मुख्याधिकारी यांनी विदित केले की, जात वैधता प्रमाणपत्राची यादी सादर करण्यास सांगितले होते. एक प्रकरण अवैध ठरले आहे. त्यासंबंधातील प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केला आहे. संबंधितांचा खुलासा मागवून अंतिम नोटीस दिलेली आहे. जात वेधता प्रमाणपत्राची यादी सादर केलेली आहे.

यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, वर्ग-३ मधील पदांसंबंधातील मुद्दा होता. दिनांक १३ एप्रिल २०१८ रोजी प्रत मिळालेली आहे. संबंधितांचे प्रमाणपत्र अवैध ठरले आहे. या प्रकरणी नोटीस दिलेली आहे. ७ दिवसांच्या आत संबंधितांचा खुलासा आला नाही तर कारवाई करण्यात येईल. मुख्याधिकाऱ्यांची पदे एम.पी.एस.सी.कडून भरली जातात. त्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता

प्रमाणपत्र सादर केले आहे किंवा कसे यासंबंधातील माहिती घेऊन ती समितीला सादर करण्यात यावी असे समितीने निर्देश दिले.

**कोरची नगर पंचायत :**

कोरची नगरपंचायतमध्ये एकूण मंजूर पदे किती आहेत व त्यापैकी किती पदे भरण्यात आली आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता जिल्हा प्रशासन अधिकारी यांनी विदित केले की, नगरपंचायतीसाठी पद भरती झालेली नाही. तथापि, वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये १८ मंजूर झालेली पदे आहेत. त्यामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील पद संख्या आलेली नाही. समावेशनाची प्रक्रिया सुरू झालेली आहे. गडचिरोली नगर पंचायतीमध्ये १५० कर्मचारी होते. त्यापैकी १५ जणांचे समावेशन झाले आहे. आता सर्व नगर परिषदांचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यासंदर्भात विभागीय आयुक्तांनी समिती घटित केलेली आहे. त्यांच्याकडे छाननीसाठी सर्व प्रस्ताव आलेले आहेत.

अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांच्या भरती, बदली, पदोन्नती आणि त्यांच्यासाठी शासनाकडून मिळणारा निधी या सर्वांचा आढावा घेण्यासाठी समिती गडचिरोली जिल्ह्यामध्ये आलेली असताना विभागाच्या अनेक अधिकाऱ्यांनी समितीला समाधानकारक उत्तरे दिलेली नाहीत. त्याच प्रमाणे डी.डी.ओ. यांच्याबद्दल येथील नागरिकांच्या अनेक तक्रारी समितीला प्राप्त झालेल्या आहेत. नगरपालिकेच्या अनेक अधिकाऱ्यांनी समितीला चुकीची माहिती देऊन समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे, यासंदर्भात समिती तीव्र नाराजी व्यक्त करत आहे.

**विभागीय सचिवाची साक्ष :-**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २० ते २२ एप्रिल, २०१८ रोजी गडचिरोली जिल्हयास भेट दिली होती. त्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदर साक्षीच्यावेळी समितीने, खालील बाबींवर चर्चा केली.

समितीने, गडचिरोली जिल्हयातील नगरपरिषद, नगरपंचायतींना भेट दिली होती. गडचिरोली नगरपरिषदेतील पदोन्नतीची दोन व सरळसेवेची दोन पदे भरण्यात आली आहेत काय, सदर पदे कधीपासून रिक्त आहेत. श्री.मोगसू मढावी यांनी सन १९८७ मध्ये सेवेत येऊनही त्यांनी अद्यापपर्यंत जातपडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशी समितीने विचारणा केली असता, उप सचिव यांनी विदित केले की, गडचिरोली येथे वर्ग ३ मध्ये अनुसूचित जमातीची दोन पदे रिक्त होती. एक पद पदोन्नतीचे व एक पद सरळसेवेचे होते.

समितीने या नगर परिषदेची स्थापना कधी झाली आहे असा प्रश्न विचारला असता उप सचिव यांनी विदित केले की, गडचिरोली नगरपरिषदेची स्थापना १९८४ मधील आहे. समितीने तेथे भेट दिली तेव्हा अनुसूचित जमातीच्या खालच्या केडरच्या लिपिकामध्ये कोणी उपलब्ध नव्हते. कारण तीन वर्षे सेवा निकष आहेत त्यामुळे ते पद भरता आले नाही असे उत्तर देण्यात आले होते. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे खुल्या प्रवर्गामधून पदोन्नती देण्यात येते. खुल्या प्रवर्गातील जेष्ठतेनुसार ते पद भरण्यात येत आहे, त्यामुळे ते पद आता भरता येणार नाही. समितीने भेट दिली तेव्हा श्री.मढावी यांची जात वैधता झाली नव्हती, आता त्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळाले आहे.

देसाईगंज नगरपरिषदेतील श्री.गारे कनिष्ठ लिपिक यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्राबाबत सद्यस्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता, उप सचिव यांनी सांगितले की, दौऱ्याच्या वेळी उच्च न्यायालयाचा निकाल समितीसमोर ठेवण्यात आला होता. जात प्रमाणपत्र हरवल्याचे श्री.गारे सांगत होते. त्यांनी नवीन जात प्रमाणपत्र काढले होते, उच्च न्यायालयाने सांगितले होते की, सहा महिन्याच्या आत पडताळणी समितीने निर्णय द्यावा. पडताळणी समितीने हे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले आहे, नगरपरिषदेने त्यांना सेवेतून काढण्याची नोटीस दिली, त्यांनी उच्च न्यायालयाकडून स्थगनादेश घेतला, त्यांना अधिसंख्य केले, ते सेवानिवृत्त झाले आहेत, तो बिंदू पुन्हा अनुसूचित जमातीला देण्यात आलेला आहे.

**अभिप्राय व शिफारशी :-**

**(१) गडचिरोली व देसाईगंज नगरपरिषद आणि कोरची नगरपंचायत कार्यालयातील अनुसूचित जमातीची सरळसेवेची रिक्त पदे तातडीने भरण्यात यावी, तसेच या कार्यालयातील सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१९ च्या शासन निर्णयानुसार ज्या अधिकारी/कर्मचारी यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्यामुळे त्यांच्या रिक्त जागांवर सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १४ डिसेंबर, २०२२ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीच्या उमेदवारामधून पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## पोलीस अधिक्षक, कार्यालय, गडचिरोली

पोलीस उप निरीक्षक आणि प्रमुख लिपिक यांची पदे पोलीस महासंचालक यांच्या स्तरावरुन भरल्या जातात. कनिष्ठ श्रेणी लिपिकाची ४२ पदे मंजूर असून ३२ पदे भरण्यात आलेली आहेत व १० पदे रिक्त आहेत. तसेच पोलीस उप निरीक्षक ९ पदे रिक्त असून पोलीस उप निरीक्षकांची पदे पोलीस महासंचालक कार्यालयाकडून भरण्यात येत असल्यामुळे त्यांची बिंदुनामावली त्यांच्या कार्यालयात ठेवण्यात येत असते अशी पोलीस अधिक्षक यांनी समितीस माहिती दिली. त्यावर समितीने पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस शिपाई यांची १६ पदे रिक्त राहण्याची काय कारणे आहेत. पोलीस शिपाई पदाची बिंदू नामावली मागच्या वर्षी प्रमाणित करण्यात आली आहे काय ? त्यानंतर जाहिरात देण्यात आली आहे काय अशी विचारणा केली असता पोलीस अधिक्षक यांनी विदित केले की, पोलीस शिपाई यांची १६ पदे रिक्त होती. सदरची रिक्त पदांची सन २०१८ च्या पोलीस भरतीमध्ये जाहिरात देण्यात आली होती. सदरहू भरती प्रक्रिया सुरु आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयात जी पदे रिक्त आहेत ती सर्व पदे या वर्षाच्या भरती प्रक्रियेतून भरण्यात येणार आहेत.

त्यासंदर्भात मागासवर्ग कक्षाच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस शिपाई पदाची बिंदू नामावली दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी प्रमाणित करण्यात आली आहे. तसेच हेड कॉन्स्टेबल यांची बिंदू नामावली प्रमाणित नाही, हवालदार व कनिष्ठ श्रेणी लिपिक यांची बिंदू नामावली दिनांक १ मे, २०१७ रोजी प्रमाणित करण्यात आली आहे. यासंदर्भात पोलीस अधिक्षक यांनी समितीस सांगितले की, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने आतापर्यंत ४ प्रकरणे अवैध जाहीर केली आहेत. त्यापैकी एका प्रकरणात कारवाई करण्यात आली आहे. त्यांना सेवेतून मुक्त करण्यात आले आहे. सदर व्यक्तीची नियुक्ती सन २०१२ मध्ये झाली असून त्यांना सन २०१८ मध्ये सेवेतून मुक्त करण्यात आले आहे. बाकीची चार प्रकरणे नियुक्ती प्राधिकृत असल्यामुळे कारवाई करण्यात आली नाही.

समितीने, श्रीमती प्रियंका नारनवरे यांचे प्रकरण जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे. सन २०१३ मध्ये त्यांची नियुक्ती झाली आहे. दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले आहे काय अशी समितीने पृच्छा केली असता पोलीस अधिक्षक यांनी विदित केले की, श्रीमती नारनवरे यांचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. अद्याप कार्यवाही झालेली नाही. सदर प्रकरण समितीकडे प्रलंबित आहे. त्याबाबत संबंधितांना शोकॉज नोटीस देण्यात आली आहे.

यासंदर्भात मागासवर्ग कक्षाच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, श्रीमती प्रियंका नारनवरे यांचे प्रकरण समितीकडे सन २०१७ मध्ये प्राप्त झाले आहे. समितीकडे २२०० प्रकरणे प्रलंबित आहेत. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार प्रकरणांची प्राथमिकता ठरविण्यात येते, त्यानुसार सहा महिन्यात प्रकरण निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून नियुक्ती झाल्यानंतर प्रस्ताव सादर करावा लागतो त्यानंतर कागदपत्रे अपलोड करावी लागतात ती समितीकडे सादर केल्यानंतर प्रत्यक्षात छाननी करण्यात येते.प्रत्यक्षात छाननी करताना त्यांना नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येते.

उपरोक्त प्रकरणी पोलीस अधिक्षक यांनी सांगितले की श्री. आशिष ढोके यांची नियुक्ती सन २०१२ मध्ये झाली आहे. यांचे प्रकरण अवैध आहे, त्याचप्रमाणे श्री.धुर्वे यांचे प्रकरण अवैध आहे यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. जी प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांना शोकॉज नोटीस देऊन एक महिन्यात कारवाई करण्यात येईल. ८ कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्रे बाकी आहेत. श्री. प्रकाश आनंदराव पेंदाम यांची नियुक्ती खुल्या प्रवर्गातून झाली होती. त्यांचे प्रकरण मावक कक्षाकडून खारीज करण्यात आले आहे.

समितीने, बिंदू नामावली केव्हा प्रमाणित करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता पोलीस अधिक्षक यांनी सांगितले की, सन २००६ नंतर सन २०१७ मध्ये बिंदू नामावली प्रमाणित करण्यात आली आहे. सन २००६ नंतर सन २०१७ मध्ये बिंदू नामावली प्रमाणित करण्यात आली. इतक्या उशिराने बिंदू नामावली प्रमाणित करण्याची काय कारणे आहेत. तसेच सहाय्यक आयुक्त मागासवर्ग कक्ष यांनी लेखी निर्देश दिले आहेत. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अनुसूचित जातीमधील ४, अनुसूचित जमातीमधील ४, विमुक्त जाती भटक्या जमातीमधील ६ व विशेष मागासप्रवर्गामधील १ अशा कर्मचाऱ्यांना या कार्यालयाने मागासवर्गीय कर्मचाऱ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसतांना पदोन्नती कशी काय दिली, याचा खुलासा नियुक्ती प्राधिकारी यांच्यामार्फत करावा. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. सदर प्रकरणांबाबत शासन परिपत्रक दिनांक १८ मे, २०१३ व दिनांक ३० जुलै, २०१३ अन्वये कार्यवाही करावी. त्यानंतर बिंदू नामावली तपासून देण्यात येईल. असा मागासवर्ग कक्षाने शेरा नमूद केला आहे. यासंदर्भात स्पष्टीकरण करण्यात यावे. याबाबत मागासवर्ग कक्षाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, ही प्रक्रिया नियुक्ती प्राधिकारी यांनी तीन महिन्यात पूर्ण करावी व त्यानंतर बिंदू नामावली तपासून घ्यावी. दिनांक १८ मे, २०१३ व दिनांक ३० जुलै, २०१३ च्या शासन निर्णयानुसार कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यासंदर्भात सहाय्यक आयुक्त मागासवर्ग कक्ष यांनी समितीस सांगितले की, पोलीस अधिक्षक कार्यालयाकडे पदे कमी असल्यामुळे विलंब लागत आहे. पोलीस निरीक्षकांची दोन पदे रिक्त आहेत. यासंदर्भात समितीने सूचना केली की, मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या निदेशानुसार

कारवाई करण्यात यावी. त्यांनी जी प्राथमिकता ठरवून दिली त्यानुसार कार्यवाही करावी. आदिवासी कर्मचाऱ्यांना तातडीने न्याय मिळणे आवश्यक आहे, जे अवैध आहेत त्यांचा बिंदू रिक्त करण्यात यावा.

आदिवासी महिला, मुली, पुरूष पोलिसांसमोर येण्यासाठी घाबरतात. आजही अनुसूचित जमातीच्या महिलांवर, मुलींवर अत्याचार होत आहेत. अशा अत्याचारित महिलांवरील अन्याय दूर करण्यासाठी पोलीस ठाण्यामध्ये सेल निर्माण करण्यात यावा. स्थानिक बोली भाषा अवगत असणाऱ्या महिला पोलीस अधिकारी या सेलमध्ये असणे आवश्यक आहे. त्यासाठी पोलीस मित्र या माध्यमातून प्रयत्न करण्यात यावेत. गडचिरोली जिल्ह्यात नक्षलग्रस्त भाग आहे. बेरोजगार तरूण आहेत. त्या युवकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काही प्रयत्न केले आहेत काय अशी समितीने विचारणा केली असता पोलीस अधिक्षक यांनी सामितीस सांगितले की, पॉस्को संबंधातील केसेस महिला अधिकारीच बघतात. त्या अतिशय चांगले काम करीत आहेत. पोलीस ठाण्यामध्ये तक्रार घेऊन येणाऱ्या अत्याचारित आदिवासी महिलांसाठी विशेष कक्ष स्थापन करण्यासंबंधात सूचना देण्यात येतील. महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजने अंतर्गत दुर्गम भागातील मुलांना निवडण्यात येते. त्यांना विधानमंडळ, मंत्रालय इत्यादी प्रमुख इमारती दाखविण्यात येतात. या मुलांनी मुंबई व राज्यातील अन्य शहरांना भेटी दिल्यानंतर त्यांच्या बोलण्यामध्ये फरक जाणवतो. त्यावेळी त्यांना नक्षलवादी चळवळीमध्ये जाऊ नका असे सांगण्यात येते. आर्मी, पॅरा मिलिटरी, पोलीस दलामध्ये भरती व्हावे, चांगले शिकावे अशा प्रकारचे मार्गदर्शन करण्यात येते. पोलिसांची प्रतिमा चांगली व्हावी म्हणून विविध कार्यक्रम हाती घेण्यात येतात. यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवित आहोत. सामुहिक विवाह सारखे देखील कार्यक्रम घेण्यात येतात. तसेच पोलीस दलामध्ये जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी कॅम्प आयोजित करण्यात येतात.

पोलीस अधिक्षक यांनी विदित केले की, पोलीस अधीक्षक कार्यालयातील ८ कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त नाहीत त्यांना एक महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची नोटीस दिली आहे. त्यासंदर्भातील अहवाल समितीला सादर करण्यात येईल. दुसरा मुद्दा असा होता की, अनुसूचित जमातींच्या लोकांच्या अत्याचारावरील प्रकरणाबाबत विशेष कक्ष स्थापन करावे यासंदर्भातील कार्यवाही १५ दिवसात करुन तसा अहवाल समितीला सादर करण्यात येईल.

समितीने ज्या सूचना दिलेल्या आहेत त्यांची अंमलबजावणी करुन १५ दिवसात समितीला अहवाल सादर करावा. समितीने भामरागड व अहेरी या ठिकाणी कामाची पाहणी केली या सर्व ठिकाणी पोलीस विभागाचे अतिशय चांगले काम समितीला आढळून आले आहे. त्यामुळे समिती पोलीस अधीक्षक व त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन करते.

गडचिरोली विभाग अतिशय संवेदनशील आहे, गडचिरोली भागातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना अतिशय सतर्क रहावे लागते. जीवावर उदार होऊन ते काम करीत आहेत. भामरागड येथे नियुक्ती दिल्यानंतर सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय सतर्क रहावे लागते. त्यांना तांत्रिक सोईसुविधा मिळणे अपेक्षित आहे. आदिवासी भागातील लोकांना चांगले जीवन जगता यावे त्यासाठी सहल आयोजित केली जात आहे. आदिवासी लोकांच्या जीवनात सुधारणा व्हावी त्यांना सर्व सोईसुविधा मिळाव्यात अशी समितीची अपेक्षा आहे. या भागातील लोक चुकीच्या मार्गाने जाऊ नये यासाठी जिल्हाधिकारी, अपर आदिवासी आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांनी सर्व योजनांचा आढावा घेऊन आदिवासी लोकांना जास्तीत जास्त लाभ मिळेल असे पहावे. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी सहली आयोजित करण्यात याव्यात. यासाठी निधी कमी पडू देता कामा नये. पोलीस दलाला ज्या ज्या अडचणी येतात त्या समितीला लेखी स्वरूपात द्याव्यात. त्याची पूर्तता करण्यासाठी समिति निश्चितच प्रयत्न करेल, पाठपुरावा करेल. विभागाला जास्तीत जास्त निधी कसा मिळेल यासाठी ही समिती प्रयत्नशील राहील असे समितीने मत व्यक्त केले.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २० ते २२ एप्रिल, २०१८ रोजी गडचिरोली जिल्हयास भेट दिली होती. त्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

जातपडताळणी समितीने अवैध ठरविलेल्या ४ प्रकरणांवर प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, अशी समितीने विचारणा केली असता अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांनी विदित केले की, नक्षलवादी हल्ले सुरु असल्यामुळे पोलीस अधीक्षक, गडचिरोली हे आजच्या बैठकीसाठी उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्यातर्फे निवासी पोलीस उप अधीक्षक उपस्थित आहेत.

निवासी पोलीस उप अधीक्षक, गडचिरोली यांनी विदित केले की, कनिष्ठ श्रेणीचे १० पदे रिक्त आहेत. बिंदूनामावली तयार करणे बाकी आहे.

बिंदूनामावली केव्हापासून अद्ययावत नाही, असा समितीने प्रश्न विचारला असता निवासी पोलीस उप अधिक्षक यांनी सांगितले की, सन २०१६ पासून बिंदूनामावली अद्ययावत करण्यात आलेली नाही.

समितीने बिंदूनामावली अद्ययावत का करण्यात आली नाही व ती केव्हा अद्ययावत करण्यात येणार आहे, अशी विचारणा केली असता पोलीस उप अधिक्षक यांनी सांगितले की, बिंदूनामावली

अद्ययावत करण्याबाबतचा प्रस्ताव माननीय पोलीस उप महानिरिक्षक (DIG) यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे.

सदर प्रस्ताव पोलीस उप महानिरिक्षक (DIG) कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे काय अशी समितीने विचारणा केली असता अपर मुख्य सचिव यांनी विदित केले की, गडचिरोली पोलीस अधीक्षक कार्यालयाने बिंदूनामावली अद्ययावत केलेली नाही. परंतु सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजी एक शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्या अनुषंगाने बिंदूनामावली विहित करण्यात येईल.

सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. परंतु पोलीस अधीक्षक, गडचिरोली या कार्यालयाने सन २०१६ पासून बिंदूनामावली अद्ययावत केलेली नाही असे समितीने लक्ष वेधले असता अपर मुख्य सचिव, यांनी विदित केले की, निवासी पोलीस उप अधीक्षक यांच्याकडून याबाबत माहिती घेतली असता त्यांनी सांगितले होते की, बिंदूनामावली अद्ययावत आहे. निवासी पोलीस उप अधिक्षक यांना सांगू इच्छितो की, जशी बिंदूनामावली निश्चित करण्यात आली होती, त्याप्रमाणे ती बिंदूनामावली अद्ययावत आहे की नाही, याबाबत समितीला माहिती देण्यात यावी. पोलीस उप अधिक्षक यांनी सांगितले की, जुनी बिंदूनामावली अद्ययावत आहे.

बिंदूनामावली नोंदवहीची शेवटची तपासणी केव्हा झालेली आहे असा समितीने प्रश्न विचारला असता अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, याबाबतचा आढावा घेतला तेव्हा त्यांनी अशी माहिती दिली होती की, विभागीय कार्यालयामार्फत बिंदूनामावली निश्चित करुन दिली जाते. म्हणजे ती अंतिम करुन दिली जाते. त्याप्रमाणे सन २०२० ची बिंदूनामावली अद्ययावत आहे. याबाबत स्वतः तपासणी करुन समितीला अचूक अहवाल सादर करतो.

सदर शासन निर्णय सन २०२१ मध्ये निर्गमित केलेला आहे. गडचिरोली येथील पोलीस अधीक्षक कार्यालयाने सन २०१६ पासून बिंदूनामावली अद्ययावत केलेली नाही अशी समितीने विचारणा केली असता सचिव (साप्रवि) यांनी सांगितले की, संबंधित विभागाने बिंदूनामावली अद्ययावत करुन घेणे आवश्यक आहे. विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये मागासवर्गीय कक्ष आहे. त्यामुळे त्यांच्याकडून बिंदूनामावली अद्ययावत करुन ती त्यात काही अडचणी असतील तर विभागाला कळविणे आवश्यक आहे.

निवासी पोलीस उप अधीक्षक यांना याबाबतची पूर्णपणे माहिती नसावी, त्यामुळे यासंदर्भातील सर्व माहितीची खात्री करुन समितीला अहवाल सादर करतो असे अपर मुख्य सचिव यांनी आश्वासन दिले.

सहाय्यक आयुक्त मागसवर्गीय कक्ष, नागपूर यांना देखील आजच्या बैठकीस उपस्थित राहण्याबाबत कळविले होते. परंतु ते आजच्या बैठकीसाठी उपस्थित असल्याचे दिसत नाही. सहाय्यक आयुक्त मागसवर्गीय कक्ष, नागपूर हे आजच्या बैठकीसाठी उपस्थित का राहू शकले नाहीत, याबाबत त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात यावा असे समितीने निर्देश दिले असता सचिव (साप्रवि) यांनी त्यास सहमती दर्शविली.

सर्वश्री विजय राजन्ना सल्लम, रामचंद्र राजन्ना सल्लम, जगदिश मारोती इंगळे, प्रकाश आनंदराव पेंदाम व आशिष ढोक यांचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आलेले आहे. यापैकी श्री.प्रकाश आनंदराव पेंदाम यांचे जात वैधता प्रमाणपत्र खारीज करण्यात आले आहे, असे नमूद केले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता निवासी पोलीस उप अधिक्षक यांनी सांगितले की, सर्वश्री विजय राजन्ना सल्लम, रामचंद्र राजन्ना सल्लम, जगदिश मारोती इंगळे व प्रकाश आनंदराव पेंदाम यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

समितीने सर्वश्री विजय राजन्ना सल्लम, रामचंद्र राजन्ना सल्लम, जगदिश मारोती इंगळे व प्रकाश आनंदराव पेंदाम यांचे जातवैधता प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आल्याचे नमूद केलेले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता निवासी पोलीस उप अधिक्षक यांनी सांगितले की, त्यांचे प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आलेले आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक कार्यालयाने त्यांची खुल्या प्रवर्गातून नियुक्ती केलेली आहे.

अपर मुख्य सचिव यांनी सांगितले की, निवासी पोलीस उप अधीक्षक यांनी काल अशी माहिती दिली आहे की, सर्वश्री विजय राजन्ना सल्लम, रामचंद्र राजन्ना सल्लम, जगदिश मारोती इंगळे व प्रकाश आनंदराव पेंदाम यांची खुल्या प्रवर्गात नियुक्ती केली आहे. परंतु याबाबतची पुन्हा खात्री करणे आवश्यक आहे.

समितीने याबाबतची पुन्हा खात्री करुन त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करावा. जे बिंदू रिक्त झाले आहेत, ते बिंदू तात्काळ भरण्यात यावेत, अशी समितीने सूचना केली असता त्यास अपर मुख्य सचिव यांनी सहमती दर्शविली.

श्रीमती प्रियांका नारनवरे यांचेकडून जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे काय असा प्रश्न समितीने विचारला असता निवासी पोलीस उप अधिक्षक यांनी सांगितले की, श्रीमती प्रियांका नारनवरे यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

श्रीमती प्रियांका नारनवरे यांचे प्रकरण जातपडताळणी समितीकडे प्रलंबित आहे. सन २०१३ मध्ये त्यांची नियुक्ती झाली आहे.  दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार ६ महिन्यांच्या

आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले आहे. तरी देखील त्यांनी ६ महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर केले नाही अशी समितीने विचारणा केली असता निवासी पोलीस उप अधिक्षक यांनी सांगितले की, त्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. श्रीमती प्रियांका नारनवरे यांनी दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ रोजी जातवैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी त्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. जवळपास त्यांनी ७ वर्षानंतर जातवैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. शासन निर्णयानुसार ६ महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. उक्त प्रकरणी ७ वर्षे विलंब होण्याची कारणे काय आहेत? सदर विलंबास कोण जबाबदार आहे अशी विचारणा समितीने केली असता अपर मुख्य सचिव यांनी विदित केले की, समितीने पोलीस अधीक्षक कार्यालयाला भेट दिल्यानंतरच त्यांनी जातवैधता प्रमाणपत्र घेण्याची कार्यवाही सुरु केली आहे.

समितीने माहे एप्रिल, २०१८ मध्ये दौरा केला होता. दौरा केल्यानंतर देखील जवळपास एक वर्षानंतर जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यात आले नाही. उक्त प्रकरणातील दोषींवर विभाग काय कारवाई करणार आहे? जातपडताळणी समितीचे अधिकारी उपस्थित आहेत काय? श्रीमती प्रियांका नारनवरे यांची जातवैधता प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव केव्हा सादर केला होता?

सह आयुक्त जात प्रमाणपत्र समिती गडचिरोली यांनी विदित केले की, श्रीमती प्रियांका नारनवरे यांनी दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३ मध्ये जातवैधता प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर केल्याचे दिसून येत आहे. तसेच दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ रोजी त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र वैध ठरविण्यात आलेले आहे. जर असे असेल तर जातवैधता प्रमाणपत्र देण्यास जात पडताळणी समितीने विलंब केलेला आहे असे समितीने मत व्यक्त केले.

उक्त प्रकरणी समिती स्तरावर विलंब झाल्याचे दिसून येत आहे असे अपर मुख्य सचिव यांनी सांगितले असता उक्त प्रकरणी समितीने कोणत्या विभागावर कारवाई करावी? कारवाई केल्याशिवाय विभागामध्ये सुधारणाच होणार नाही. जातवैधता प्रमाणपत्राबाबत माननीय न्यायालयामध्ये याचिका दाखल करुन त्यास स्थगिती घेतली जाते. त्यानंतर ८-९ वर्षे उक्त प्रकरणी कोणतीही कार्यवाही केली जात नाही अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी विदित केले की, अनेक वेळा असे होते की, एखादे प्रकरण समितीकडे सादर केल्यानंतर उक्त प्रकरणी सुनावणीसाठी पाचारण केले जाते, यावर समितीने, उक्त प्रकरणी सुनावणीसाठी पाचारण केले तरी एक, दोन किंवा तीन वर्षे विलंब होऊ शकतो. परंतु उक्त प्रकरणी ७ वर्षांचा विलंब झालेला आहे. कोणतेही प्रकरण समितीकडे सादर केल्यानंतर किती दिवसांमध्ये प्रकरण निकाली काढावे, याबाबतचा कालावधी निश्चित केला असेल उक्त प्रकरणी ७ वर्षांचा विलंब का झालेला आहे? अशी विचारणा केली

असता, सह आयुक्त जात प्रमाणपत्र समिती यांनी विदित केले की, उक्त प्रकरणातील त्रुट्यांची पूर्तता करण्यासाठी त्यांना संधी दिली जाते.

उक्त प्रकरणातील त्रुट्यांची पूर्तता करण्यासाठी त्यांना किती वेळा संधी दिलेली आहे? श्रीमती प्रियांका नारनवरे यांनी विहित कालावधीमध्ये जात पडताळणी सामितीकडे प्रस्ताव सादर केला आहे. परंतु जातवैधता प्रमाणपत्र वैध ठरविण्यासाठी जातपडताळणी समितीला ७ वर्षांचा कालावधी लागलेला आहे, ही गंभीर बाब आहे असे समितीने नमूद केले.

जातवैधता प्रमाणपत्र वैध ठरविण्यासाठी जातपडताळणी समितीने विलंब का केलेला आहे? दिनांक २३ मे, २००२ च्या नियमांनुसार अनुसूचित जमाती प्रवर्गात नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे किंवा उक्त प्रकरणी आवश्यक कार्यवाही करणे ही संबंधित विभागाची जाबाबदारी आहे. लक्षपूर्वक अवैध प्रमाणपत्र सादर करणाऱ्या कर्मचाऱ्याला संरक्षण देत असल्याची दिसून येत आहेत. समितीने सांगितल्याप्रमाणे विभाग कोणावर कारवाई करणार आहे? उक्त प्रकरणी विलंब होण्याची कारणे काय आहेत? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी विदित केले की, जातपडताळणी समित्या या अर्ध न्यायिक समित्या असतात. या समितीकडे एखादे प्रकरण सादर केल्यानंतर त्या प्रकरणांचा आढावा घेतला जातो. सदर प्रकरणांचा आढावा घेत असताना सदर प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत विनंती केली जाते. मागील काळामध्ये अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. सदर प्रकरण जुने आहे. सन २०१३ ते सन २०१९ पर्यंत विलंब का झाला, याबाबत पुन्हा माहिती घेणे आवश्यक आहे.

यावर समितीने एखादे प्रकरण जात पडताळणी समितीकडे सादर केल्यानंतर उक्त प्रकरण ६ महिन्यांमध्ये निकाली काढणे बंधनकारक आहे. उक्त प्रकरणी दक्षता पथकाने किती दिवसांमध्ये कार्यवाही करावी, याबाबतचे सर्व नियम जात पडताळणी समितीकडे आहेत. अशा प्रकरणांमध्ये नियमांनुसार कार्यवाही का केली जात नाही? अर्ध न्यायिक अधिकार असले तरी विहित कालावधीमध्ये निर्णय घेणे बंधनकारक आहे. सदर प्रकरणी जो निर्णय असेल तो जात पडताळणी समितीने घ्यावा, याबाबत समितीचे काहीही म्हणणे नाही. परंतु विहित कालावधीमध्ये प्रकरणी निकाली का काढली जात नाहीत? अशी समितीने विचारणा केली असता सह आयुक्त जात पडताळणी समिती यांनी विदित केले की, या प्रकरणात उशीर का झाला याची सविस्तर माहिती समितीला देण्यात येईल.

सदर प्रकरण सन २०१३ ते २०१९ पर्यत प्रलंबित होते. विलंब होण्याची कारणे काय आहेत, याबाबत जात पडताळणी समितीने कार्यवाही करावी अशी सूचना समितीने केली.

आयुक्त, टीआरटीआय यांनी विदित केले की, राज्यात आठ जात पडताळणी समित्या आहेत. मागील वर्षीपर्यत ४० हजारपेक्षा जास्त जात वैधता पडताळणी प्रकरणे प्रलंबित होते. वास्तविक

१५ जात पडताळणी समित्या असणे अपेक्षित आहे. परंतु सचिवांनी गतिमान अभियान राबवून ४० हजाराची प्रलंबित प्रकरणे २० हजारावर आणली आहे. मराठवाडा व विदर्भात नामसदृशाचा फायदा घेऊन मोठया प्रमाणावर चुकीची प्रकरणे झालेली आहेत. यातील प्रत्येक प्रकरणामध्ये सुनावणी घेऊन, त्यांच्या घरी जाऊन पुरावे शोधणे हे काम मोठे आहे. हे पुरावे न शोधता प्रकरण नाकारले गेले तर ते न्यायालयात जातात. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात चार हजारावर प्रकरणे आहेत. गतिमान अभियानाद्वारे ही प्रकरणे जलद गतीने सोडविण्याचा विभागाचा मानस आहे. विभागाला अजून थोडा वेळ द्यावा अशी विनंती आहे.

आयुक्तांनी सांगितलेली वस्तुस्थिती अंशतः सत्य आहे. वैधता प्रमाणपत्र समितीच्या कार्यालयात कमी कर्मचारी असतील याची समितीला कल्पना आहे. विभाग अभियानाद्वारे प्रयत्न करीत आहे. नोकरीत कर्मचाऱ्याची नियुक्ती झाल्यानंतर जात पडताळणी करताना जात पडताळणी समितीकडून जाणीवपुर्वक विलंब होतो, याकडे जातपडताळणी समितीकडून दुर्लक्ष होत आहे, असे मत समितीने व्यक्त केले.

यावर सचिव यांनी विदित केले की, जाणीवपूर्वक विभागाच्या वतीने असे केले जात नाही. जात पडताळणी समितीच्या माध्यमातून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असेल तर नक्कीच त्यांचेवर कारवाई करण्यात येईल. सदर प्रकरणामध्ये पुन्हा तपासणी करुन कोठे किती सुनावण्या झाल्या आहेत ते पाहू. व्हिजीलन्सला किती वेळ लागला याची विभाग चौकशी करतो. त्यामध्ये दुर्लक्ष केले गेल्याचे आढळून आल्यास नक्की कारवाई करु.

विभाग प्रयत्न करीत आहे हे समिती समजू शकते. पण एखाद्या कर्मचाऱ्याची नियुक्ती झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र उमेदवारास दिले गेले नाही तर संबंधित कर्मचा-याविरुध्द कोणती कारवाई केलेली आहे, तसेच आस्थापनेच्या विभाग प्रमुखांची जबाबदारी काय आहे अशी समितीने पृच्छा केली असता सचिवांनी विदित केले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर सामान्य प्रशासन विभागाने सन २०१९ मध्ये शासन निर्णय काढला होता त्यानुसार या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आले आहे.

दिनांक ७ जुलै, २०१७ नंतरचा नाही तर सन २०१३ चा विषय सुरु आहे. सन २०१३ पासून जात वैधता प्रमाणपत्र सादर करीत नसेल तर तो बोगस आहे असे वाटते. त्यामुळे त्यास अधिसंख्य करुन ते पद रिक्त करण्यात यावे असे समितीने सुचविले.

यावर सचिवांनी विदित केले की, यामध्ये दोन बाजू आहेत. अर्जदाराकडूनही कागदपत्रे देण्यास कधी कधी उशीर होतो. यावर समितीने निदर्शनास आणले की, बोगस असलेले वेळकाढूपणा करतात, सेवानिवृत्त होताना उच्च न्यायालयात जातात.

यावर सचिवांनी सांगितले की, घाईने त्यांची सुनावणी घेतल्यास, व्हिजीलन्स केल्याशिवाय त्यांनी निर्णय दिला तर ती प्रकरणे उच्च न्यायालयात जातात म्हणून त्यांना सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करावीच लागते. ही विशिष्ट प्रकरणे तपासणी केल्यानंतर यामध्ये काही दिरंगाई झाली असेल तर नक्कीच कार्यवाही होईल.

उमेदवार उच्च न्यायालयात कधी जातो. आस्थापनेवरील लोकांनी त्या प्रकरणात दुर्लक्ष केल्यास न्यायालयात प्रकरण जाते. वैधता प्रमाणपत्र समितीने जात प्रमाणपत्र अवैध केल्यास सन २००२ च्या कायद्याच्या अनुषंगाने कलम १६ नुसार एफआयआर दाखल केला तर कारवाई होते असे समितीने निदर्शनास आणले असता सचिवांनी विदित केले की, त्यामध्ये एखादे प्रकरण न्यायालयात असल्यास सुनावणी घेणे, संधी देणे हा भाग आहे. त्यासाठी काही कालमर्यादा असावी असे समितीने नमूद केले असता, न्यायिक किंवा अर्धन्यायिक प्रकरणामध्ये कालमर्यादा ठेऊ शकत नाही असे सचिवांनी सांगितले. ती पदे अधिसंख्य करणार का असे समितीने विचारले असता, तो विभागाचा विषय नाही, आस्थापनेचा विषय आहे असे सचिवांनी सांगितले.

विभाग आस्थापनेला तसे सूचित करणार आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी विदित केले की, जात पडताळणी प्रमाणपत्र देणे एवढाच विषय विभागाकडे आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभाग करतो.

ज्यांनी विलंब केला असेल त्यांचेवर कारवाई करण्यात यावी व समितीला अहवाल एक महिन्यात सादर करण्यात यावा असे समितीने निर्देश दिले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली येथील पोलीस शिपाई सह इतर पदांची बिंदूनामावली सन २०१६ पासून पूढे कधी अदयावत करण्यात आली असे समितीने विचारले असता साक्षीला उपस्थित निवासी पोलीस उप अधिक्षक यांच्या उत्तरात स्पष्टता नसल्याने अपर मुख्य सचिव यांनी याबाबत तपासणी करुन समितीला अचूक अहवाल सादर करण्यात येईल असे आश्वासित केले होते. अदयाप गृह विभागाकडून याबाबत समितीला अहवाल प्राप्त झाला नसल्याने या विलंबास जबाबदार संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच **पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस शिपाई सह इतर पदाची सन २०१६ पासून बिंदूनामावली अद्ययावत करण्यात आली नसल्यास त्यास जबाबदार संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, गडचिरोली

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, गडचिरोली या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या पदसंख्येबाबत समितीला माहिती द्यावी. असे समितीने निर्देश दिले असता व्यवस्थापकीय संचालक यांनी विदित केले की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित या कार्यालयात अनुसूचित जमातीची सरळसेवेची एकूण ८३ पदे मंजूर आहेत. सरळसेवेची वर्ग ३ची तांत्रिक संवर्गाची २९ पदे मंजूर असून त्यापैकी १९ पदे भरण्यात आलेली आहेत. त्यानंतर वर्ग-४ ची तांत्रिक संवर्गाची ३२ पदे मंजूर असून त्यापैकी ३ पदे भरण्यात आलेली आहेत. उर्वरित दोन पदांचा अनुशेष आहे. त्याचप्रमाणे सरळसेवेच्या वर्ग ३ व वर्ग ४च्या तांत्रिक संवर्गाच्या १२ पदांचा अनुशेष आहे. वर्ग – ३ ची सरळसेवेची तांत्रिक व अतांत्रिक संवर्गाची एकूण ४८ पदे असून त्यापैकी २६ पदे भरण्यात आलेली असून २२ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ ची तांत्रिक व अतांत्रिक संवर्गाची एकूण ३५ पदे मंजूर असून त्यापैकी ३३ पदे भरण्यात आलेली आहेत व २ पदे रिक्त आहे. त्याचप्रमाणे वर्ग -३ ची पदोन्नतीची १० पदे असून त्यापैकी ९ पदे भरण्यात आलेली आहेत व १ पद रिक्त आहे. वर्ग-४ ची पदोन्नतीची १७ पदे असून १६ पदे भरण्यात आलेली आहेत व एक पद रिक्त आहे. अशा प्रकारे सरळसेवेची व पदोन्नतीची एकूण २६ पदांचा अनुशेष आहे. दरवर्षी साधारणपणे १० ते १५ सबस्टेशन असतात आणि सन २०१५ पासून कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आलेली नाही. सन २०१५ पासून भरती बंद असण्याची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, महामंडळामध्ये सध्या आऊटसोर्सिंग सुरु असल्यामुळे भरती बंद करण्यात आलेली आहे.

व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, गडचिरोली जिल्हा हा नक्षलग्रस्त असून हा जिल्हा स्वर्गीय आर.आर. पाटील यांनी दत्तक घेतला होता. त्यांच्या मार्फत या जिल्ह्याचा विकास करण्याच्या दृष्टीने काम सुरु होते. सध्या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नोकरभरती बंद आहे. परंतु गडचिरोली जिल्ह्यात विभागातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाकडे पत्र व्यवहार करण्यात आला होता काय ? अशी समितीने विचारणा केली असता व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, कर्मचाऱ्यांची नोकर भरती महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फतच करण्यात येत असते. त्यासाठी शासनाकडे पत्र व्यवहार करण्याची आवश्यकता नाही. जर नोकर भरती कंपनीच्या स्तरावरुन करण्यात येत असेल तर एवढया मोठया प्रमाणात पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत ? असा समितीने प्रश्न विचारला असता याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन समितीला सांगण्यात येईल. असे व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले. सन २०१५ पासून भरती प्रक्रिया बंद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित ही आऊट सोर्सींगद्वारे नोकरभरती करीत असल्यामुळे रिक्त पदांचा अनुशेष वाढत आहे, असे समितीने मत व्यक्त केले.

सन २०१६-१७ ला वर्ग-४ ची ४ पदे सरळसेवा भरतीद्वारे भरण्यात आलेली आहेत. सन २०१७-१८ मध्ये वर्ग-३ ची पदोन्नतीची ८ पदे आणि वर्ग-४ ची सरळसेवेची ९ पदे व वर्ग-४ ची पदोन्नतीची ७ पदे भरण्यात आलेली आहेत. अशा प्रकारे एकूण २० पदे भरण्यात आलेली आहेत. अशी व्यवस्थापकीय संचालक यांनी माहिती दिली. आऊट सोर्सिंगद्वारे किती पदे भरण्यात आलेली आहेत ? असे समितीने विचारले असता व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, तीन वषापर्यंत कंत्राटी पध्दतीने बाह्य यंत्रणेद्वारे भरती करण्यात येते. तीन वर्षे झाल्यानंतर कंत्राटी पध्दतीतील कर्मचाऱ्यांना नियमित स्वरुपात नियुक्त करण्यात येत असते.

जर बाह्य यंत्रणेद्वारे जर भरती करण्यात येत असेल तर त्या पदांची बिंदुनामावली कशा प्रकारे तयार करण्यात येते ? कारण कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी बिंदुनामावलीची आवश्यकता नसते का असे समितीने विचारले असता, कंत्राटी पध्दतीच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती ही बिंदुनामावलीप्रमाणेच करण्यात येत असते असे व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले. कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी कशा प्रकारची प्रक्रिया राबविण्यात येत असते अशी समितीने विचारणा केली असता व्यवस्थापकीय संचालक यांनी विदित केले की, दहावीच्या निकषांवर भरती करण्यात येत असते. अर्जदार ऑनलाईन अर्ज भरत असतात आणि त्यांची गुणवत्ता यादी लावण्यात येत असते.

तांत्रिक किंवा अतांतत्रिक स्वरुपातील पदे देखील बाह्य यंत्रणेमार्फत भरल्या जातात, असे असताना त्या पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येते काय ? सदर जाहिरात बिंदूनामावलीप्रमाणे प्रसिध्द करण्यात येते काय ? अशी समितीने विचारणा केली असता  व्यवस्थापकीय संचालक यांनी विदित केले की, सदर जाहिरातीमध्ये कर्मचाऱ्यांना किती पगार देण्यात येणार ? त्यांना तीन वर्षे झाल्यानंतर सेवेमध्ये नियमित सामावून घेण्यात येणार, अशा सर्व बाबींचा उल्लेख सदरहू जाहिरातीमध्ये करण्यात येत असतो.

आतापर्यंत तात्पुरत्या स्वरुपातील कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी देण्यात आलेल्या जाहिरातीची प्रत समितीला सादर करावी. त्याचप्रमाणे सन २०१५ पासून प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त झालेले अर्ज, त्यामधील पात्र झालेले अर्ज आणि नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे अर्ज व या सर्वांची यादी समितीला सादर करण्यात यावी. असे समितीने निर्देश दिले असता  त्यास व्यवस्थापकीय संचालक यांनी होकार दर्शविला आहे. कंत्राटी पध्दतीच्या जाहिराती कोणामार्फत प्रसिध्द करण्यात येत असतात ? अशी समितीने विचारणा केली असता व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की,  सर्व मंडळाची माहिती घेऊन त्या अनुषंगाने जाहिरात देण्यात येत असते. त्यामध्ये कोणत्या भागामध्ये किती पदे आवश्यक आहेत, याचीही माहिती घेतली जाते.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कार्यालयाची बिंदूनामावली कोणामार्फत अंतिम स्वरुपात करण्यात येत असते ? अशी विचारणा समितीने केली असता सर्कल कार्यालय, झोन यांच्याकडून रेकॉर्ड मागविण्यात येत असते त्यानुसार बिंदूनामावली अंतिम करण्यात येते. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने भरती प्रक्रिया सेंट्रलवाईज पध्दतीने करण्यात आली आहे. भरतीची प्रक्रिया मुख्य कार्यालय प्रकाशगड, मुंबई येथून करण्यात येते, असे व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संदर्भात समिती अशी शिफारस करीत आहे की, कार्यालयाची नोकर भरती, पदोन्नती व आरक्षण आणि बिंदू नामावली तपासणे या बाबी प्रत्येक जिल्ह्यात करण्यात याव्यात. याबाबत राज्य शासनाचे आदेश आहेत त्या आदेशांची अंमलबजावणी प्रत्येक विभागाने करणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवर नोकर भरती करण्याचे अधिकार कोणतेही कारण नसताना काढून घेण्यात येत असून ते राज्य पातळीवर देण्यात येत आहेत, याबाबत महावितरण कंपनीची साक्ष घेण्यात यावी असे समितीने निर्देश दिले.

गडचिरोली महावितरण कार्यालयासाठी ८४ पदे भरण्यात आली आहेत, त्यांच्याकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे काय ? असे समितीने विचारले असता महावितरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ७९ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले असून ५ कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र प्रलंबित आहेत.

यासंदर्भात समितीने सन १९९५ पूर्वीची १२ प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आणून विचारणा केली असता या प्रकरणांच्या संदर्भात पाठपुरावा करण्यात आला आहे काय त्यासंदर्भात अधिक्षक अभियंता महावितरण यांनी विदित केले की, १२ पैकी ११ कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्रे आहेत. श्री.सुरेश भास्कर हेडाऊ यांचे प्रकरण नागपूर समितीकडे प्रलंबित आहे.

त्यासंदर्भात मावक कक्षाच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, सदर प्रकरण कार्यवाहीमध्ये आहे, या प्रकरणाची सुनावणी झाली आहे. सन १९९५ नंतर सेवेत लागलेल्या कर्मचाऱ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत काय परिस्थिती आहे. अशी समितीने पृच्छा केली असता अधिक्षक अभियंता यांनी स्पष्ट केले की, वेतनगट-३ व ४ मधील एकूण ७२ प्रकरणांपैकी ६८ प्रकरणांची जात वैधता आहे. ४ प्रकरणे प्रलंबित आहेत. श्री. एम. व्ही. जिवतोडे, यांचे प्रकरण गडचिरोली समितीकडे प्रलंबित आहे. श्री. एम. टी. बारेकर व श्री. व्ही. डी. बारेकर यांचे प्रकरण नागपूर समितीकडे प्रलंबित आहे. त्यानंतर श्री.व्ही.एस. वाघ यांचे प्रकरण गडचिरोली समितीकडे प्रलंबित आहे. ही सर्व प्रकरणे सन १९९५ नंतरची आहेत.

दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार सेवेत रुजू होताना जात वैधता प्रमाणपत्र घ्यावयाचे आहे. त्यावेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर नियुक्तीपासून ६ महिन्याच्या

आत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले पाहिजे. जो कर्मचारी ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकत नसेल त्याची सेवा खंडीत करण्यात यावी असे शासन निर्णयात स्पष्ट नमूद केले आहे. ६ महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर आपली सेवा खंडीत होऊ शकते असे विभागाने नोटीसमध्ये नमूद केले आहे काय? अशी समितीने विचारणा केली व दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानंतर किती कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली आहे. श्री.ए.व्ही.जिवतोडे, श्री.एम.टी.बारेकर, श्री.एस.बी.हेडाऊ, श्री.व्ही.डी.बारेकर, श्री.व्ही.एस.वाघ, या कर्मचाऱ्यांची सविस्तर माहिती आढावा बैठकीत सादर करावी असे निदेश दिले.

सन २०१५-१६ ते सन २०१६-१७ या वर्षात आदिवासी उप योजनेअंतर्गत किती निधी प्राप्त झाला व त्यातून कोणत्या योजना घेण्यात आल्या आहेत. अशी समितीने पृच्छा केली असता अधिक्षक अभियंता यांनी विदित केले की, सन २०१५-१६ मध्ये ९०० लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झाला होता व ९०० लक्ष रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. सन २०१५-१६ मध्ये ९ कोटी रुपये मिळाले होते. या रकमेतून २६ गावांमध्ये विद्युतीकरण करण्यात आले. १२ गावांमध्ये अतिरिक्त पथदिवे लावण्यात आले आहेत. २ गावांमध्ये विद्युतीकरण करण्यात आले आहे. सन २०१६-१७ मध्ये ७ कोटी ६४ लक्ष रुपये मिळाले होते, सन २०१७-१८ मध्ये ८ कोटी रुपये मिळाले होते. यामध्ये २९ गावांचे विद्युतीकरण करण्यात आले. अतिरिक्त पथदिवे आदिवासी उप योजना बाह्य क्षेत्रात घेण्यात आले आहेत. एकूण २३७ गावे असून त्यापैकी २११ गावांमध्ये वीज जोडणी द्यावयाची होती. त्यापैकी १६५ गावांमध्ये विद्युतीकरणाची कामे सुरु आहेत. ४३ गावांची कामे प्रगतीपथावर आहेत. यामध्ये ४९ गावे अवघड क्षेत्रातील होती. ती महाऊर्जाकडे देण्यात आली आहेत. ४९ गावे अवघड क्षेत्रातील असल्यामुळे तेथे सोलर सिस्टीमची कामे सुरु केली आहेत.

सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८ या वर्षात आदिवासी उपयोजनेचा किती निधी आला व त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला आहे. अशी समितीने विचारणा केली असता अधिक्षक अभियंता यांनी सांगितले की, सन २०१५-१६ मध्ये आदिवासी उप योजनेचे एक कोटी रुपये आले होते. सन २०१६-१७ मध्ये ४९ लाख रुपये आले होते. सन २०१७-१८ मध्ये ७० लाख रुपये आले होते.

**विभागीय सचिवाची साक्ष :-**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २० ते २२ एप्रिल, २०१८ रोजी गडचिरोली जिल्हयास भेट दिली होती. त्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदर साक्षीच्यावेळी समितीने खालील बाबींवर चर्चा केली.

विद्युत वितरण कंपनी गडचिरोली कार्यालयात अनुसूचित जमातीची पदे मोठया प्रमाणावर रिक्त होती. सदरहू पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे अशी समितीने विचारणा केली असता मुख्य व्यवस्थापकीय संचालक यांनी विदित केले की, समितीने सन २०१८ मध्ये गडचिरोली येथे दौरा केला तेव्हा वर्ग ३ व वर्ग ४ अनुसूचित जमातीचे २४ पदे रिक्त होती. तांत्रिक संवर्गात ११ पदे रिक्त होते. अतांत्रिक संवर्गात १३ पदे रिक्त होती. पदोन्नतीची २ पदे होती. अशी २६ पदे रिक्त होती, ही पदे भरण्यात आली असून सध्या १७ पदे रिक्त आहेत. दोन श्रेणींची प्राथमिक प्रवेश स्तरावर विभाग पदभरती करतो ते पद विद्युत सहायक व उप केंद्र सहायकाचे आहे. विद्युत सहायकाचे ५००० पदांचे संपूर्ण राज्याची जाहिरातीद्वारे निविदा काढण्यात आली होती. सदरहू प्रकरणास उच्च न्यायालयाची स्थगिती होती. त्याबाबत खूप पाठपुरावा केला. मराठा आरक्षणाचे प्रश्नाबाबत माहे, फेब्रुवारी २०१९ मध्ये शासनाच्या स्तरावर एक परीपत्रक काढले आहे की, सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गाच्या ( SEBC ) उमेदवारांना विकल्प देण्यात यावा की, खुला किंवा आर्थिक दुर्बल घटक ( EWS ) या प्रवर्गाचा विकल्प देण्यात यावा. यामध्ये काही उमेदवारांचे आर्थिक दुर्बल घटकामध्ये ( EWS ) नुकसान होईल यामुळे यावर पुन्हा स्थगिती आणली.

महावितरणची बिंदू नामावली प्रमाणित करण्याची काय प्रकिया आहे अशी समितीने विचारणा केली असता मुख्य व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, बिंदू नामावली नोंदवहयांची विभागीय आयुक्त कार्यालयाकडून तपासणी केली जाते. सरळसेवेची ११ पैकी ४ व पदोन्नतीची ११ पैकी ९ संवर्गाची बिंदू नामावली प्रमाणित झालेली आहे. एकूण २२ संवर्गामध्ये पदोन्नतीचे ११ व सरळसेवेचे ११ संवर्ग आहेत. सरळसेवेच्या बिंदू नामावलीबाबत समितीकडून काढण्यात आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यात येत आहे.

महावितरणमध्ये आऊटसोर्सींगने कंत्राटी पध्दतीने कर्मचारी भरतो तेव्हा बिंदूनामावलीची अंमलबजावणी केली जात नाही. तीन वर्ष कंत्राटी काम केल्यावर त्यांना कायम केले जाते. यावेळी बिंदूनामावलीची अंमलबजावणी केली जात नाही असा समितीने प्रश्न विचारला असता मुख्य व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, दोन श्रेणी आहेत. विद्युत सहायक किंवा उपकेंद्र सहायकास नेमल्यास त्यांचा तीन वर्षाचा प्रशिक्षण किंवा परिविक्षा कालावधी असतो. त्यानंतर त्यांना कायम करणे अनिवार्य आहे. त्यांना कायम नियुक्ती देताना बिंदूनामावली पध्दतीचा अवलंब करण्यात येतो. परंतु काही प्रकरणामध्ये न्यायालयाची स्थगिती होती, त्यामुळे पदभरती करता आली नाही. तेव्हा महावितरणच्या ग्राहकांना द्यावयाच्या सेवेत कोठेही बाधा येऊ नये म्हणून कंत्राटी पध्दतीने ( आउटसोर्सींग ) कामे करण्यात आली.

समितीने न्यायालयाची स्थगिती कशाकरीता होती अशी विचारणा केली असता मुख्य व्यवस्थापकीय संचालक यांनी विदित केले की, विद्युत सहायकाची १५ हजार पदे रिक्त होती. सन

२०१९ मध्ये टप्प्याटप्प्याने भरण्याचा निर्णय घेतला. ५००० पदांकरीता सन २०१९ मध्ये जाहिरात काढली तेव्हा काही लोक न्यायालयात गेले. त्यात सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गाचे (SEBC), आर्थिक दुर्बल घटकाचे (EWS) व बाकीचे आरक्षण होते. न्यायालयात प्रकरण प्रलंबित असताना शासनाने मधला मार्ग काढला. सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गाबाबत न्यायालयाचा निकाल जोपर्यत होत नाही तोपर्यत यांना पर्याय द्यावे की, आर्थिक दुर्बल घटक किंवा खुल्या प्रवर्गामध्ये यावे. याबाबत दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजी परिपत्रक काढले. यानंतर सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गाचे काही लोक आर्थिक दुर्बल घटकाच्या प्रवर्गामध्ये आले तर त्यांचे नुकसान होणार म्हणून आर्थिक दुर्बल घटकाचे उमेदवार पुन्हा न्यायालयात गेले. उच्च न्यायालयात त्यांनी फार मोठया प्रमाणावर पाठपुरावा केला, त्यांनी वैयक्तिक लक्ष घातले. मंत्री महोदयांकडे व राज्यमंत्री महोदयांकडे बैठक झाली, सिनियर कौन्सील नेमला.

हा कंत्राटी तत्वावर उमेदवार नेमण्याचा विषय आहे असे समितीने मत व्यक्त केले असता प्रधान सचिव यांनी विदित केले की, विद्युत सहायक व उप केंद्र सहायक ही पदे भरण्यापूर्वी त्यांना तीन वर्ष कंत्राटी तत्वावर ठेवले जाते. जसे शिक्षण विभागात शिक्षण शिक्षण सेवकांना घेतले जाते व नंतर त्यांना नियमित केले जाते.

कंत्राटी उमेदवार नेमा व जेथे आरक्षणाच्या प्रमाणात घेणे आवश्यक आहे तिथे त्याची अंमलबजावणी करा अशी समितीने सुचना केली असता प्रधान सचिवांनी सांगितले की, भरतीच्या वेळी आरक्षण व बिंदूनामावलीची विभाग नक्कीच अमंलबजावणी करतो.

समिती नाशिक व यवतमाळ येथे देखील दौऱ्यावर गेली होती, पण विभागाने सांगितलेल्या आरक्षणाच्या प्रमाणाची कोठेही अमंलबजावणी झालेली नाही, असे समितीला आढळले आहे. १०० पैकी २५ उमेदवार तुम्ही कंत्राटी तत्वावर घेऊ शकता असे समितीने निदर्शनास आणले असता, याकरीता त्यांची नियमित नियुक्तीच करावी लागते असे प्रधान सचिवांनी सांगितले.

यावर संचालक यांनी विदित केले की, शिक्षण सेवकासारखे विभाग विद्युत सहायक घेतो. हे करताना सर्व आरक्षणाचा नक्कीच अवलंब केला जातो. हे करुन देखील काही पदे रिक्त राहतात, म्हणून कंत्राटदाराकडून आऊटसोर्सींग केले जातात. विभागाचे कंत्राट एजन्सीसोबत असते, उमेदवारांशी असते, त्यामध्ये बिंदू नामावलीचे पालन काही वेळेस होत नाही.

कंत्राटदार कोणालाही घेईल, त्याचा बिंदूनामावलीशी संबंध येत नाही. आऊटसोर्सींगचा विषय वेगळा आहे. तीन वर्ष कंत्राटी ठेवतो, तीन वर्षानंतर कायमस्वरुपी महावितरणच्या सेवेत सामावून घेतले जाते तेव्हा बिंदू नामावलीची आरक्षणाच्या प्रमाणात अंमलबजावणी करण्यात येते का ? अशी समितीने विचारणा केली असता, संचालक यांनी विदित केले की, नियमित कायम नियुक्ती करताना बिंदू नामावलीचे पालन केले जाते.

कंत्राटी पध्दतीने उमेदवार घेताना बिंदू नामावलीचे पालन करता आले तर अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनाही संधी मिळेल असे समितीने मत व्यक्त केले असता प्रधान सचिवांनी विदित केले की, त्या उमेदवारांची कामगिरी पाहून तीन वर्षानंतर नियमित नियुक्ती देण्यात येते. पण कंत्राटी हा शब्द वापरला जातो.

समितीच्या दौऱ्यामध्ये अनेक ठिकाणी निदर्शनास आले आहे की, बिंदू नामावलीबाबत दुर्लक्ष होत आहे,याकडे विशेष बाब म्हणून पहावे व कोठेही चूक होणार नाही याची दखल व नोंद घ्यावी असे समितीने निर्देश दिले असता त्यास प्रधान सचिवांनी सहमती दर्शविली.

वर्ग ३ व वर्ग ४ मधील श्री.जिवतोड, श्री.एम.टी.बारेकर, श्री.व्ही.डी.बारेकर, श्री.वाघ यांच्यावर दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आली काय अशी समितीने विचारणा केली असता मुख्य व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, समितीच्या दौऱ्याच्या वेळी पाच कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणीचा हा विषय आहे, पाच पैकी चार जणांच्या जात वैधता प्रमाणपत्राची तपासणी झालेली आहे, एक प्रलंबित आहे. पाच पैकी तीन वैध ठरले आहेत, एक अवैध ठरले आहे त्यास अधिसंख्य करण्यात आलेले आहे.

**अभिप्राय व शिफारशी :-**

महावितरणमध्ये विदयुत सहायक व उप केंद्र सहायक ही पदे भरण्यापूर्वी उमेदवारांना तीन वर्ष कंत्राटी तत्वावर ठेवले जाते, या पदांसाठी कंत्राटी उमेदवारांची भरती ही महावितरणाच्या प्रकाशगड, मुंबई येथील मुख्य कार्यालयाकडून केंद्रीकृत (Centralized) पध्दतीने घेण्यात येत असून बिंदूनामावलीच्या आरक्षणानुसार घेण्यात येत नसल्याने जिल्हापातळीवरील स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना यात संधी मिळण्याची शक्यता कमी आहे. **त्यामुळे सदर भरती बिंदूनामावलीच्या आरक्षणानुसार गडचिरोली व इतर आदिवासी बहूल जिल्हात जिल्हापातळीवर घेण्यात यावी तसेच या जिल्ह्यातील महावितरणाच्या कार्यालयांची नोकर भरती, पदोन्नती, आरक्षण आणि त्यानुसार बिंदूनामावली तपासणे या बाबी जिल्हा पातळीवर करण्यात याव्यात, जेणेकरुन या आदिवासी बहुल जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना त्यांच्या जिल्ह्याच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार भरतीमध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल. याबाबत विभागाने आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## जिल्हा परिषद कार्यालय, गडचिरोली

विस्तार अधिकारी-२ पदे, वरिष्ठ सहायक-३ पदे व परिचरांची १४ पदे केव्हापासून रिक्त आहेत, रिक्त पदे कधी पर्यंत भरण्यात येतील, पदोन्नतीची ६ पदे केव्हापासून रिक्त आहेत अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, विस्तार अधिकारी यांची पदे सन २०१३ व २०१५ पासून रिक्त आहे. सन २०१३ मध्ये भरतीच्या निकषात न बसल्याने तसेच सन २०१५ मध्ये पद भरती न झाल्यामुळे सदर पदे रिक्त आहेत. वरिष्ठ सहायक (लिपिक) सरळसेवेची ३ पदे रिक्त आहेत. सरळसेवेची पदे दिनांक १४ ऑक्टोंबर, २०१६, दिनांक ५ नोव्हेंबर, २०१६, दिनांक २९ एप्रिल, २०१७ पासून रिक्त आहेत. तसेच दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयामुळे पदोन्नतीची पदे भरली गेलेली नाहीत. सरळसेवेतील वाहन चालकाची एकूण मंजूर पदे ४० असून २० पदे मंजूर आहेत. सदर पदे व्यपगत करण्यात आलेली आहेत. सरळसेवेतील परिचारकांची रिक्त पदे १४ आहेत. दिनांक १४ जानेवारी २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये २५ टक्के पदे निरसित करण्याचे निदेश असल्यामुळे ही १४ पदे रिक्त आहेत. कोणती पदे निरसित करावयाची यासंबंधात शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे.

जिल्हा परिषदेकडे वाहन चालकाची ४० पदे असताना ती व्यपगत करण्याची कारणे काय आहेत, वाहनचालकांची बिंदूनामावली आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, सन २००३ पासून ही पदे भरलेली नाहीत. सदर पदे व्यपगत झाल्यामुळे बिंदूनामावली ठेवलेले नाही. वाहन चालकाला बिंदू आहे. अशी मागासवर्ग कक्षाच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली. जिल्हा परिषदेने वाहन चालकाचा बिंदू तयार केला होता असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. जिल्हा परिषदेने बिंदुनामावली कधी प्रमाणित केली आहे, त्यावेळी स्टेटस काय होते, अशी समितीने विचारणा केली असता मागासवर्ग कक्षाच्या अधिकारी यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेच्या विभागांची वेगवेगळ्या तारखांना बिंदुनामावली प्रमाणित केलेली आहे.

जिल्हा परिषदेतील सर्व विभागांची बिंदुनामावली प्रमाणित केली असली तरी वाहन चालक पद व्यपगत करण्यात आले आहे. कोणत्या शासन निर्णयाच्या अधीन राहून ही पदे व्यपगत केली आहेत अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, दिनांक २७ जून, २००३ च्या शासन निर्णयानुसार सदर पदे व्यपगत करण्यात आली आहेत. दिनांक २७ जून, २००३ नुसार पदभरती संबंधी सर्वसाधारण शासकीय धोरणाच्या अनुषंगाने कोणत्याही कारणास्तव रिक्त झालेल्या वाहन चालकांचे पद भरण्यात येऊ नये, अपवादात्मक परिस्थितीमध्ये वाहन चालकाचे पद मंजूर केले जाणार नाही व नवीन किंवा रिक्त पद भरण्यात येणार नाही, अशा

प्रकारचे निदेश असल्यामुळे यापुढे बिंदुनामावली ठेवण्याची आवश्यकता राहणार नाही. ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभागाच्या दिनांक ८ जून, २०१० च्या पत्रानुसार जिल्हापरिषदेच्या वाहन चालकांची पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे येणार नाही, असे निदेश देण्यात आलेले आहेत. यामुळे पदोन्नतीनेही पदे भरता येणार नाहीत. या कारणास्तव बिंदुनामावली ठेवण्याची आवश्यकता राहणार नाही. जिल्हा परिषदेमध्ये किती वाहने आहेत आणि त्या वाहनांवर किती वाहन चालक आहेत अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेकडे एकूण २२ वाहने आहेत आणि त्यावर ४५ वाहन चालक आहेत. काही वाहन चालक हे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी देण्यात आलेले आहेत. १२ पंचायत समितीचे १२ वाहने आणि जिल्हा परिषदेची ११ वाहने आहेत. जिल्हा परिषदेचे वाहन चालक आरोग्य विभागाला देण्याचे कारण काय आहे जिल्हा परिषदेने आरोग्य विभागाचे वाहन चालक काढून घेतले तर आरोग्य विभागासाठी कोणते धोरण राबविण्यात येणार आहे,अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी वाहन चालक देण्यात आलेले आहेत. तेथील वाहने आरोग्य सुविधेसाठी देण्यात आलेली आहेत. आरोग्य विभागासाठी कंत्राटी पध्दतीने वाहन चालक ठेवण्याचे धोरण ठरविण्यात आलेले आहे. जिल्हा परिषदेने यासाठी त्रयस्थ संस्थासोबत करार केला आहे.

जिल्हा परिषदेकडे कंत्राटी पध्दतीचे किती वाहन चालक आहेत? एन.आर.एच.एम. अंतर्गत जिल्हा परिषदेकडे किती वाहन चालक आहेत? अशी समितीने विचारणा केली असता सध्या २० वाहन चालकांची मागणी करण्यात आलेली आहे. आऊट सोर्सिंगद्वारे सध्या वाहन चालक आहेत. असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले. जिल्हा परिषदेकडे किती प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत  जिल्हा परिषदेकेडे सध्या ४५ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. ४५ रुग्णवाहिका असून ३६ पथके आहेत. त्यापैकी एकाही पथकास वाहने नाहीत असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी विदित केले केले.

बोअरवेल दुरुस्ती पथकासाठी किती वाहने आहेत  या व्यतिरिक्त किती वाहने जिल्हा परिषदेकडे आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, १२ पथके असून त्यावर १२ कंत्राटी पध्दतीने वाहन चालक घेण्यात आलेले आहेत. उप अभियंत्यांना वाहने देण्यात आलेली आहेत. कंत्राटी पध्दतीने वाहन चालकांची पदे भरण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाची मंजुरी लागत असते. संबंधित विभागाचे कंत्राट कशा प्रकारे नियुक्त केल्या जातात यासाठी निधी कोणामार्फत देण्यात येतो अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, संबंधित विभागामार्फत मंजूरी व निधी देण्यात येत असते. बाह्ययंत्रणेद्वारे संबंधित विभागाकडून कंत्राटी पध्दतीने वाहन चालक घेण्यात

येतात. बाह्य यंत्रणेद्वारे वाहन चालक भरण्यासाठी कोणाची मंजुरी घेण्यात येते असे समितीने प्रश्न विचारले असता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची यासाठी मंजुरी घेण्यात येत असते. असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले. वाहन चालक किंवा इतर पदांबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वेळोवेळी आढावा घेत नाहीत काय ? अशा प्रकारचा आढावा वर्षातून कितीवेळा घेण्यात येत असतो. पदोन्नती, भरती, बिंदुनामावली याबाबत राज्य शासनाकडून जिल्हा परिषदेने मार्गदर्शन मागितले आहे काय ? किंवा त्याबाबतचा आढावा घेण्यात आलेला आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, या वर्षी सर्व पदांच्या बिंदुनामावलीचा आढावा घेण्यात आलेला आहे. केवळ एकाकी असणाऱ्या पदांचा आढावा जात पडताळणी समितीकडे पाठविण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे पदभरती संदर्भात मागील दोन वर्षापासून पद भरती झालेली नाही.

जिल्हा परिषदेमध्ये मागास वर्ग कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे काय  आणि त्यासाठी आतापर्यंत किती बैठका घेण्यात आलेल्या आहेत. शासन निर्णयाप्रमाणे मागासवर्ग कक्षाच्या किती बैठका होणे अपेक्षित आहे अशी समितीने विचारणा केली असता असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, मागास वर्ग कक्ष स्थापन करण्यात आलेला असून मागील दोन वर्षात दोन बैठका घेण्यात आलेल्या आहेत. शासन निर्णयाप्रमाणे दर तीन महिन्याला एक बैठक घ्यावयास पाहिजे.

यावर समितीने,  जर दोन वर्षात दोन बैठका घेण्यात येत असतील तर यावरुन असे लक्षात येते की, जिल्हा परिषदेचे अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यामागील राज्य शासनाचा कोणता हेतू होता अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, अनुसूचित जाती, जमातीच्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी या कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे, त्याचप्रमाणे यासाठी नियमित बैठका घेणे अपेक्षित आहे. समितीला सांगू इच्छितो की, दर महिन्यातील दुसऱ्या मंगळवारी जिल्हा परिषदेतील संपूर्ण कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबींचा आढावा घेण्यात येत असतो. त्यामध्ये मागसवर्गीय कर्मचाऱ्यांचा आढावा घेण्यात येत असतो. सदर बाब ही अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. जिल्हा परिषदेचे अधिकारी मागासवर्ग कक्षाच्या नियमित बैठका घेण्यासाठी दूर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे याबाबत समिती नाराजी व्यक्त करते.

दर सहा महिन्यांनी मागासवर्ग कर्मचाऱ्याचा आढावा घेण्यात येत असतो. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले. आतापर्यंत किती तक्रारी दाखल झालेल्या आहेत अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, वन विभागाच्या एका कर्मचाऱ्यांने अनुसूचित जमाती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.  दिनांक ११ डिसेंबर,

२०१७ रोजी तक्रार दाखल करण्यात आलेली होती. यासाठी जिल्हा परिषदेने त्रिसदस्यीय समिती नियुक्त केलेली आहे. सदर तक्रार थेट आयोगाकडे करण्यात आल्यानंतर सदर तक्रार जिल्हा परिषदेला एक महिन्यानंतर प्राप्त झाली होती. सदर तक्रार ही आस्थापना विषयक बाबीसंबंधी होती. यासाठीच्या नियुक्त केलेल्या समितीने अहवाल सादर केलेला आहे. त्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक ३१ जुलै, २०१६ रोजी श्रीमती बी.पी. मडावी, प्राचार्य जिल्हा परिषद, धानोरा यांच्या संदर्भात काही तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यासंदर्भात काय कारवाई करण्यात आलेली आहे अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, या मुख्याध्यापिकेने शिष्यवृत्तीसंदर्भात अपहार केला होता. त्यामुळे त्यांच्या विरोधात एफ.आय. आर. दाखल करण्यात आलेला होता. त्यानंतर त्यांना निलंबित करण्यात आले होते. या महिला अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. प्राथमिक चौकशी अहवालामध्ये त्या दोषी आढळुन आलेल्या आहेत. त्यांच्या विरोधात दोषारोप पत्र तयार करण्यात आलेले असून त्यांची सध्या विभागीय चौकशी सुरु आहे. त्यांचे आता असे मत आहे की त्यांना पुन्हा सेवेमध्ये घेण्यात यावे. त्याप्रमाणे निलंबन कालावधीमध्ये त्यांना नियुक्तीसाठी एक मुख्यालय देण्यात आलेले होते. परंतु सदर महिला अधिकारी त्या मुख्यालयामध्ये हजर झालेल्या नाहीत.

शासकीय सेवा आणि शर्तीच्या अनुषंगाने एखादया कर्मचाऱ्याला किती कालावधीसाठी निलंबित करता येते आणि त्यासाठी कोणत्या अटी आणि शर्ती नमूद करण्यात आलेल्या आहेत असा समितीने प्रश्न विचारला असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, दर सहा महिन्यांनी निलंबित कर्मचाऱ्यांचा आढावा घ्यावयास पाहिजे. जर निलंबित कर्मचाऱ्यामुळे चौकशीमध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब होत नसेल तर त्यांना सेवारत करण्याचा विभागीय अधिकाऱ्यांना अधिकार आहे. या प्रकरणामध्ये निलंबन कालावधीमध्ये सदर अधिकाऱ्याचा निलंबन भत्ता मिळण्यासाठी त्यांना एक मुख्यालय नेमून देण्यात आलेले होते. परंतु सदर अधिकारी त्या मुख्यालयामध्ये हजर झालेल्या नाहीत. त्याचप्रमाणे विभागाने काढलेल्या निलंबन आदेशाला कोणत्याही प्रकारे आवाहन दिलेले नाही. त्यांनी केवळ असे म्हटलेले आहे की,  सदर निलंबन योग्य नाही.

यावर समितीने जर एखादा निलंबित झालेला कर्मचारी त्याला नेमून दिलेल्या कार्यालयात जर सहा  महिन्यापर्यंत गेला नाही, तर त्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी पत्र पाठवून त्यांबाबत विचारणा करावयास पाहिजे. असे समितीने मत व्यक्त केले. याबाबत संबंधित महिला अधिकाऱ्यांना पत्र पाठविण्यात आले होते, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले जर त्या अधिकाऱ्याला इच्छित किंवा योग्य ठिकाणी विभागाने नियुक्ती दिली

असेल आणि अगोदरच त्यांना निलंबित करुन शिक्षा दिली असेल तर अशावेळी त्या कर्मचाऱ्याने त्या ठिकाणी हजर होण्यासाठी नकार देणे साहजिक आहे असे समितीने मत व्यक्त केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सदर महिला शाळेच्या मुख्याध्यापक होत्या. त्यामुळे त्यांना दुसऱ्या ठिकाणी असलेल्या शाळेमध्ये हजर होण्यासाठी सांगण्यात आलेले होते. निलंबित कर्मचाऱ्यांना नियमानुसार कशा प्रकारे निलंबन भत्ता द्यावयास पाहिजे ? याची समितीला माहिती द्यावी. त्यावर शिक्षण अधिकारी यांनी विदित केले की, निलंबित कर्मचाऱ्यांना सुरुवातीच्या सहा महिन्यापर्यंत ५० टक्के निलंबन भत्ता देण्यात येत असतो त्यानंतर त्यांना ७५ टक्के निलंबन भत्ता देण्यात येतो. यावर समितीने आता ७५ टक्के निलंबन भत्ता देण्यात येत आहे काय अशी विचारणा केली असता, शिक्षण अधिकारी यांनी सांगितले की, सध्या ५० टक्के निलंबन भत्ता देण्यात येत आहे.

सदर कर्मचाऱ्यांबाबत पक्षपातीपणा करण्याचा आमचा कोणताही प्रयत्न नाही. त्यांना विभागाने असे सांगितले होते की, ज्या ठिकाणी त्यांना नियुक्ती देण्यात आलेली आहे, त्या ठिकाणी त्यांनी नियुक्त व्हावे, जेणेकरुन त्यांना निलंबन भत्ता देणे शक्य होईलअसे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले.

या वरुन असे लक्षात येते की, सदर आदिवासी महिला मुख्याध्यापकावर अन्याय झाल्याचे समितीचे मत आहे. त्यामुळे याबाबत चौकशी केली पाहिजे. त्याचप्रमाणे सदर महिला मुख्याध्यापकांना ७५ टक्के निलंबन भत्ता मिळण्याच्या दृष्टीने योग्य ती कारवाई केली पाहिजे, असे निर्देश समितीने जिल्हा परिषदेस प्रस्तावित केले. सदर प्रकरणाची योग्य ती चौकशी करुन समितीला अहवाल सादर करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आश्वासन दिले.

जिल्हापरिषदेतील वर्ग ३ व वर्ग ४ ची अनुसूचित जमातीची २१३ पदे भरण्यात आलेली आहेत. यासाठी ९५६ एवढे एकूण पदे आहेत. सदर २१३ पदे केव्हा भरण्यात आलेली आहेत आणि त्या सर्व कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे काय सन १९९४ मध्ये सदर कर्मचाऱ्याची नियुक्ती झाली आहे. त्यांना जिल्हा परिषदेने शोकॉज नोटीस दिली. तरी देखील त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. त्या कर्मचाऱ्यांना त्याचा जो मूळ संवर्ग असेल तिकडे वर्ग करुन अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करावा असा शासन निर्णय आहे. अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, सदर कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे म्हणून त्यांना जिल्हा परिषदेकडून पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. पत्र व्यवहाराद्वारे जिल्हा परिषदेने संबंधित कर्मचाऱ्याला फक्त चार नोटीसा दिल्या आहेत. त्या व्यतिरिक्त कोणतीच कारवाई करण्यात आली नाही असे समितीने लक्ष वेधले असता, मुख्य

कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, सदर कर्मचाऱ्यांची नियुक्ती सन १९९४ ची असल्यामुळे त्यांना मूळ संवर्गात वर्ग करणे आवश्यक आहे. ती व्यक्ती जात वैधता प्रमाणपत्र देत नाही म्हणून त्यांना काढून टाकता येत नाही. सन १९९५ च्या शासन निर्णयानुसार कारवाई करण्यात यावी. असे समितीने सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, सदर कर्मचारी सन १९९५ च्या अगोदर लागलेला असल्यामुळे त्याला मूळ संवर्गात जाण्याची मुभा आहे. दिनांक ३० जून, २००४ च्या शासन निर्णयानुसार त्यांना नोकरीमध्ये संरक्षण देण्यात आले आहे. दिनांक १५ जून, १९९५ च्या शासन निर्णयानुसार आरक्षणाचा बिंदू रिक्त करुन त्यांना त्यांच्या मूळ प्रवर्गात स्थलांतरित केले पाहिजे. सामान्य प्रशासन विभाग-१०९४ दिनांक २७ मे, २००२ चे आदेश यासंदर्भात आहेत. या दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येत आहेत.

जिल्हापरिषदेने फक्त चार वेळा नोटीस बजावली आहे. त्या व्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही केली नाही. सन १९९५ पूर्वी त्याची नियुक्ती झालेली असताना त्यांना पाचवा व सहावा वेतन आयोग लागू केला आहे. आता सातव्या वेतन आयोगाची तयारी सुरु आहे. परंतु सन २००४ च्या शासन निर्णयानुसार बिंदू रिक्त करण्याची कारवाई करण्यात आलेली नाही. दिनांक १८ मे, २०१३ चा शासन निर्णयाचे अवलोकन करावे. असे समितीने निदर्शनास आणले असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ५ व मुद्दा क्रमांक ७ मध्ये या बाबी नमूद केल्या आहेत. पदोन्नती व सरळसेवेची माहिती त्या शासन निर्णयात नमूद केली आहे. सन १९९५ अगोदरच्या कर्मचाऱ्यांना सेवेचे संरक्षण आहे, परंतु तो ज्या प्रवर्गातील असेल त्या प्रवर्गात त्यांना वर्ग करण्याची कार्यवाही विभागाने करणे आवश्यक आहे व अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करुन घेणे आवश्यक आहे. ही कार्यवाही होत नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. सरळसेवा भरती करुन नियुक्ती देतांना जात वैधता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले आहे, जर जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर नियुक्तीनंतर ६ महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र संबंधित कर्मचाऱ्याने सादर करणे बंधकारक आहे. आतापर्यंत जात वैधता प्रमाणपत्र घेणे आवश्यक होते. शासन निर्णयात स्पष्ट नमूद केलेले आहे तरी देखील कार्यवाही होत नाही.असे समितीने मत व्यक्त केले. ती व्यक्ती खरी आदिवासी आहे, यासंदर्भातील कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. त्या व्यक्तीला कार्यालयात बोलावून समजावून सांगण्यात आले आहे, तो आता कागदपत्रे गोळा करण्यास लागला आहे. त्याचा प्रस्ताव जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करण्यास जिल्हा परिषद त्याला मदत करीत आहे. असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले जिल्हा परिषद त्या कर्मचाऱ्याला सन १९९४ पासून मदत करत आहे आता हे काम किती दिवसात पूर्ण करण्यात येईल ते समितीला सांगावे, असे समितीने विचारले असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, कागदपत्राची पूर्तता करण्यासाठी जिल्हा परिषद पुढाकार घेईल. एक महिन्याच्या आत यासंदर्भातील कार्यवाही करुन समितीला अहवाल सादर करावा. असे समितीने निदेश दिले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेच्या दोन ते तीन मुद्यांची माहिती समितीने मागितली होती. माहितीच्या अनुषंगाने पुर्तता करण्यात आलेली आहे. त्यामध्ये परिचर या पदाबद्दल माहिती मागितली होती. परिचराची तीन पदे होती, त्यांची जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त झालेली आहेत. त्याच प्रमाणे ज्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही, त्यांच्या सेवा कमी करण्याबद्दल जिल्हा परिषदेने कारवाई सुरु केलेली आहे.

यावर समितीने आतापर्यंत ज्या ज्या कर्मचाऱ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही, त्यांना नोटीस द्यावयास पाहिजे होत्या असे मत व्यक्त केले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, त्या सर्वांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

ज्या कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहेत त्यांच्या प्रमाणपत्राची प्रत समितीला सादर करण्यात यावी. त्याप्रमाणे ज्या ज्या कर्मचाऱ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे त्या नोटीसची प्रत समितीला सादर करावी. उपरोक्त सर्व बाबतची पुढील कारवाई एक महिन्याच्या आत करुन समितीला त्याबाबत माहिती द्यावी असे समितीने निर्देश दिले.

**पंचायत विभाग :-**

ग्रामसेवकांच्या (पेसा पदे) २३९ पदांच्या समायोजनाबाबत सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय ? ही पदे केव्हापासून रिक्त आहेत, अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, पेसा संदर्भातील शासन निर्णय दिनांक ५ मे, २०१५ चा आहे. जिल्हा परिषदेमध्ये ६०२६ कर्मचारी आहेत. स्थानिक आदिवासी उमेदवारांना नियुक्तीचे आदेश दिले आहेत. पेसा व नॉन पेसा असे दोन भाग आहेत, नॉन पेसामधील पदे समायोजित करताना स्थानिक आदिवासींचे एकत्रित समायोजन करण्यात येते. पेसा क्षेत्रातील आदिवासी पदे रिक्त आहेत. यावर समितीने पेसा ग्रामपंचायती किती आहेत. असे विचारले असता एकूण ग्रामपंचायती ४५६ असून त्यापैकी ३६३ ग्रामपंचायती पेसामध्ये येतात, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. वाड्या वस्त्यांना ग्रामपंचायतीचा दर्जा दिला आहे काय? ३६३ पेसा ग्रामपंचायतीमध्ये पेसा क्षेत्रातील किती ग्रामसेवक आहेत? अशी समितीने विचारणा केली असता, ११९ वाड्या वस्त्यांना पेसा गावाचा दर्जा दिलेला आहे. पेसा क्षेत्रातील ११० ग्रामसेवकांची पदे भरण्यात आली आहेत.असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले.

ठक्कर बाप्पा योजनेमधील तांत्रिक कामांना कोणामार्फत मंजुरी मिळत असते अशी समितीने विचारणा केली असता पंचायत समितीमधील शाखा अभियंता यासाठी मंजुरी देत असतात, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

जिल्हा विकास निधीमधून ठक्कर बाप्पा योजनेची कामे आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून मंजूर होत असतात. त्यानंतर रस्त्यांची किंवा बांधकामाची कामे जिल्हा परिषदेकडे वर्ग होत असतात. गडचिरोली जिल्ह्यामध्ये ठक्कर बाप्पा योजनेच्यामाध्यमातून कामे घेण्यासाठी किती निधी मंजुर करण्यात आलेला आहे. ठक्कर बाप्पाच्या अनुषंगाने रस्त्याच्या कामासाठीचा निधी जिल्हा परिषदेला वर्ग करण्यात येतो काय ? त्याचप्रमाणे याची तांत्रिक मंजुरी कोण देत असते अशी समितीने विचारणा केली असता, प्रकल्प विकास अधिकारी यांनी विदित केले की, गट विकास अधिकारी यांच्या मार्फत तांत्रिक मंजुरी देण्यात येत असते. त्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात येतो. त्यानंतर गट विकास अधिकारी यांना निधी वर्ग करण्यात येत असतो. किती लाख रुपयांच्या कामासाठी कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक मान्यता लागते. शाखा अभियंतांना किती लाख रुपये खर्चाच्या कामाला तांत्रिक मान्यता देण्याची परवानगी आहे, ५०५४ च्या हेडवरील निधी कोठे व किती खर्च करण्यात आला आहे, ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत असलेल्या कामांना गट विकास अधिकारी मान्यता देतात काय असा समितीने प्रश्न विचारला असता पाच लाख रुपयांच्यावरील कामांसाठी कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक मान्यता घ्यावी लागते, असे गट विकास अधिकारी यांनी विदित केले. पाच लाख रुपयांच्यावरील कामांसाठी कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक मान्यता लागते तरी देखील पाच लाख रुपयांपर्यतच्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार शाखा अभियंता यांना नाहीत असे समितीने स्प्ष्ट केले.

ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत किती कामे केली याची सविस्तर माहिती विभागाकडे आहे काय ठक्कर बाप्पा योजना विभागात गट विकास अधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येते असे जिल्हा परिषदेचे अधिकारी सांगत आहे. ठक्कर बाप्पा योजनेतून आदिवासी भागातील वाड्या वस्त्यांवर रस्ते, वीज, पाण्याची सोय केली जाते. ठक्कर बाप्पा योजनेचा निधी डायरेक्ट जिल्हा परिषदेकडे न येता नोडल एजन्सी म्हणून गट विकास अधिकाऱ्यांकडे जातो असे जिल्हा परिषदचे अधिकारी सांगत आहे अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेमार्फत ज्या योजना राबविण्यात येतात त्यांचा आढावा जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात येतो. समितीने, ठक्कर बाप्पा योजनेचा पाच टक्के निधी गट विकास अधिकाऱ्यांमार्फत खर्च केला जातो. त्याची माहिती देण्यात आली आहे. तीन वर्षात १२ पंचायत समित्यांमध्ये ६६९ कामे मंजूर केली असून त्यापैकी ५६६ कामे पूर्ण करण्यात आली असून १०२ कामे अपूर्ण आहेत. ठक्कर बाप्पा योजनेचा निधी आदिवासी भागात योग्य प्रकारे खर्च झाला किंवा नाही याचा आढावा कशा प्रकारे घेण्यात येतो. अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेमार्फत गट विकास अधिकाऱ्यांनी त्या-त्या वर्षात सदर योजनेवर किती निधी खर्च केला व कोणती कामे केली याची माहिती घेण्यात येते.

जिल्हा परिषदेमार्फत जी माहिती सादर करण्यात आली त्यामध्ये तफावत दिसून येते. आदिवासी विभागात कोणती कामे केली आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुस्तिकेत कामांच्या नावासह सविस्तर माहिती दिलेली नाही. अमुक इतका निधी खर्च झाला परंतु कोणत्या योजनेवर किती निधी व कोणत्या कालावधीत खर्च झाला याची सविस्तर लेखी माहिती देण्यात आलेली नाही. या विषयाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी विविध प्रश्न विचारले आहेत, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अखत्यारित असलेल्या विभाग प्रमुखांनी त्यांच्याकडील विभागाची उत्तरे समितीला मुद्देसूद देणे आवश्यक आहे. पंरतु कोणत्याही विभागाकडून समितीला उत्तरे येत नाहीत. जात वैधता प्रमाणपत्रासंदर्भात माहिती मिळत नाही. अनुसूचित जमातीतील लोकांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रगती होण्यासाठी प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून जिल्हा परिषदेला निधी दिला जातो. त्या निधीचा उपयोग योग्य पध्दतीने झाला किंवा नाही याची शहानिशा करणे आदिवासी विकास विभागाचे काम आहे. संबंधित विभागाला निधी दिल्यानंतर त्याच वर्षात तो निधी त्याच कामावर खर्च झाला किंवा नाही याची तपासणी करण्यात आल्याचे दिसत नाही. ठक्कर बाप्पा योजनेचा निधी जिल्हा परिषदेकडून डायरेक्ट न खर्च करता गट विकास अधिकाऱ्यांमार्फत खर्च केला जातो. आदिवासी विकास विभागाकडून जिल्हा परिषदेला निधी दिला जातो. जिल्हा परिषदेअंतर्गत जो आदिवासी भाग येतो त्या भागाच्या अडचणी सोडविणे आवश्यक आहे. गट विकास अधिकाऱ्यांकडून निधी खर्च केला जातो किंवा नाही याची माहिती मिळत नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. आदिवासी विकास विभागाने निधी दिल्यावर त्याची तपासणी करणे आवश्यक आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती आढावा बैठकीत सादर करावी. असे समितीने अभिप्राय दिले. यासंदर्भातील सविस्तर माहिती आढावा बैठकीत सादर करण्यात येईल. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वासन दिले.

कोणत्याही योजनांची अंमलबजावणी जिल्हापरिषदेच्या यंत्रणामार्फत करण्यात येते. गट विकास अधिकारी प्रत्यक्षात योजना राबवित नाहीत. जिल्हा परिषदेमध्ये अंमलबजावणी करणारे वेगवेगळे विभाग आहेत. यामध्ये घरकुल बांधणे, शौचालय बांधणे अशा योजना आहेत, त्यांचा निधी जिल्हा परिषदेतील विभागांना दिला जातो. ठक्कर बाप्पा योजनेचा निधी गट विकास अधिकाऱ्यांना का दिला जातो. प्रकल्प अधिकाऱ्यांनी शासन निर्णयाच्या अधीन राहून ठक्कर बाप्पा योजनेचा निधी थेट गट विकास अधिकाऱ्यांना दिलेला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय असेल तर समितीला दाखविण्यात यावा.अशी समितीने विचारणा केली असता प्रकल्प अधिकारी यांनी विदित केले की, गट विकास अधिकारी यांच्याकडे थेट निधी दिला जातो. यासंदर्भात शासन निर्णय बघून माहिती घेतो व समितीला सविस्तर माहिती देण्यात येईल. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आश्वासित केले.

जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे किती प्रकरणे प्रलंबित आहेत. अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सामान्य प्रशासन विभागामध्ये कनिष्ठ सहायक संवर्गातील ३ प्रकरणे गडचिरोली व गिरीपेठ नागपूर समितीकडे प्रलंबित आहेत. पंचायत विभागामध्ये ग्रामसेवक संवर्गातील १ प्रकरण गडचिरोली समितीकडे प्रलंबित आहे. बांधकाम विभागामध्ये स्थापत्य अभियंता सहायक संवर्गातील १ प्रकरण औरंगाबाद समितीकडे प्रलंबित आहे. आरोग्य विभागामध्ये आरोग्य सेवक (पुरूष) संवर्गातील ३ प्रकरणे गडचिरोली समितीकडे प्रलंबित आहेत. आरोग्य सेवक (महिला) संवर्गातील ४ प्रकरणे गडचिरोली समितीकडे प्रलंबित आहेत. शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षक संवर्गातील १३ प्रकरणे गडचिरोली, १ प्रकरण यवतमाळ, १ प्रकरण नागपूर समितीकडे प्रलंबित आहेत.

**कृषि विभाग :-**

कृषि विभागामार्फत कोणकोणत्या योजना अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राबविण्यात येतात. त्यासाठी आदिवासी उपयोजनेतून गत ३ वर्षात किती निधी वितरित करण्यात आला आहे, त्यापैकी खर्च किती करण्यात व शिल्लक निधी किती आहे अशी समितीने विचारणा केली असता कृषि विकास अधिकारी यांनी विदित केले की, आदिवासी उपयोजनेमध्ये (TSP) अंतर्गत विहिरी, नवीन विहीरी, जमीन सुधारणा, निविष्टा वाटप, पीक संरक्षण अवजारे, बैलजोडी, रेडे जोडी, बैलगाडी, जुनी विहीर दुरूस्ती, पंपसंच, शेततळे इत्यादी प्रकारच्या योजना राबविण्यात येतात. आदिवासी उपयोजने अंतर्गत सन २०१५-२०१६ मध्ये ६२१.०२ लाख इतका निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी रूपये ६११.९३ इतका निधी खर्च झाला तर, रूपये ०९.०८ लाख निधी शिल्लक आहे. एकूण १२०८ लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे. सन २०१६-१७ मध्ये रूपये ७७५.०० लाभ इतका निधी प्राप्त होता त्यापैकी रूपये ६४४.२७ लाभ इतका निधी खर्च झाला आहे, तर रूपये १३०.७३ लाभ इतका निधी शिल्लक आहे. एकूण १३४७ लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे. सन २०१७-१८ मध्ये रूपये ११७४.०० लाख इतका निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी रूपये ४००.११ लाख इतका निधी खर्च झाला असून रूपये ७७३.८९ लाख इतका निधी शिल्लक आहे.

आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्राअंतर्गत (OTSP) सन २०१५-२०१६ मध्ये रूपये ७७.९२ लाख इतका निधी प्राप्त झाला होता, त्यापैकी रूपये ७२.३४ लाख इतका निधी खर्च झाला आहे, तर रूपये ५.५८ लाख इतका निधी शिल्लक राहिला असून १५८ लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे. सन २०१६-२०१७ मध्ये रूपये ७०.०० लाख इतका निधी प्राप्त झाला असून त्यापैकी रूपये ६६.८२ इतका निधी खर्च झाला असून रूपये ३.१८ लाख इतका निधी शिल्लक राहिला आहे. सन २०१७-१८ मध्ये रूपये ७०.०० लाख इतका निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी रूपये १५.१८

लाख इतका खर्च झाला असून रूपये ५४.२२ इतका निधी खर्च झाला आहे. यावर समितीने, लाभार्थी निवड प्रक्रिया कशी राबविण्यात येते, कृषि अधिकारी यांनी विदित केले की, दारिद्र्य रेषे खालील व्यक्ती, अपंग व्यक्ती, महिला या लाभार्थींना प्राधान्य देण्यात येते. या वर्षी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. बीरसा मुंडा कृषी योजना राबविलेली आहे.

दिनांक ९ ऑगस्ट रोजी शासन निर्णय निर्गमित झाला आहे. असे असताना विभागाने अर्ज मागे कसे काय घेतले आहेत असा समितीने प्रश्न विचारला असता, कृषि अधिकारी यांनी विदित केले की, ज्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र होते अशा कएूण २०० जणांचे अर्ज आले होते. दिनांक ३० डिसेंबर रोजी जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही अशा प्रकारचा निर्णय झाला. त्यामुळे ऑन लाईन व ऑफलाईन अर्ज मागविण्यात आले. शासन निर्णय आल्यानंतर सर्वांना विश्वासात घेऊन आरटीजीएसद्वारे लाभ दिलेला आहे. ही योजना जिल्हास्तरावरून राबविण्यात आली आहे. आदिवासी उपयोजने अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये रूपये ७७.८९ लाख इतका निधी शिल्लक आहे.

"२५१५" या लेखाशीर्षाखालील कामे सुरू आहेत काय अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, "२५१५" या लेखाशीर्षाखाली जिल्हा परिषदेकडे कामे नाहीत. रस्त्याच्या कामासाठी जिल्हा नियोजन समिती मार्फत निधी येतो. "२५१५" या लेखाशीर्षांतर्गत गावअंतर्गत रस्ते ग्रामपंचायत विभागामार्फत घेण्यात येतात, अशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली. या कामाचे पर्यवेक्षण कोण करतो असे समितीने विचारणा केली असता एम.बी. रेकॉर्डचे काम कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती करतात, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

**बांधकाम विभाग :-**

कार्यकारी अभियंता यांनी बांधकाम विभागाची पुढीलप्रमाणे माहिती दिली. इतर जिल्हा मार्गाची रूंदी ६३०० कि.मी.आहे. आदिवासी उपयोजनान्वये ३०५४ अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये रूपये ६४७.०२ लाख निधी मिळाला असून हा सर्व निधी खर्च झाला आहे. सन २०१६-१७ मध्ये रूपये ४५०.०० लाख निधी मिळाला असून रूपये २८१.९० लाख इतका निधी खर्च झाला आहे, तर रूपये १६८.०९ लाख इतका निधी शिल्लक राहिला आहे. सन २०१७-१८ मध्ये रूपये ६०० लाख निधी मिळाला असून या कामाची निविदा प्रक्रिया झालेली आहे. '३०५४' एमएनपी अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये रूपये ५३०.६९ लाख निधी मिळाला असून सदर निधी खर्च झालेला आहे. सन २०१६-१७ मध्ये रूपये ३५०लाख निधी प्राप्त झाला असून रूपये १४९.६३ लाख इतका निधी खर्च झाला असून रूपये २३७ लाख निधी शिल्लक आहे. सन २०१७-१८ मध्ये रूपये ५५०

लाख निधी प्राप्त झाला असून यासंबंधातील निविदा प्रक्रिया सुरू झालेली आहे. कार्यारंभ आदेश झालेली आहे. '५०५४' टीएसपी अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये रूपये १२१.०७ लाख इतका निधी प्राप्त झाला असून शिल्लक निधी रूपये ५२७.१८ लाख शिल्लक आहे. सन २०१६-१७ मध्ये रूपये ६४९.१५ लाख निधी प्राप्त झाला आहे. सन २०१७-१८ मध्ये रूपये ५७१.५५ लाख निधी प्राप्त झालेला आहे.

दुर्गम भागातील ६७ गावातील रस्ते खराब असल्यामुळे अजूनही ती गावे रस्त्यांनी जोडलेली नाहीत. या गावांमध्ये अजूनही एस.टी.जाऊ शकत नाही, असा एस.टी.महामंडळाचा अहवाल आहे. आजही ६७ गावांना रस्ते जोडणी नाही अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, सदर गावे ही दुर्गम भागात आहेत. या गावातील रस्त्यांच्या कामासाठी अधीक्षक, गडचिरोली पोलीस यांनी सुरक्षा पुरविलेली नाही. मुख्यमंत्री सडक योजनेतून व्हीडीआर, ओडीआरचे काम होते काय, ३ वर्षात किती लांबी कव्हर करण्यात आली आहे अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमधून वेगवेगळी कामे घेण्यात आली आहेत.

जिल्हा परिषदेकडे सी.आर व एस.आर. चे कार्यक्रम घेण्यात येतात काय? आतापर्यंत यामाध्यमातून कोणती कामे घेण्यात आलेली आहेत, त्याची माहिती समितीला द्यावी असे समितीने सांगितले असता याबाबतची माहिती समितीला आढावा बैठकीमध्ये देण्यात येईल.

जिल्हा परिषदेचा चालू वर्षातील निधी खर्च झाला नाही तर त्या निधीला प्रशासकीय मान्यता देऊन तो पुढील वर्षात खर्च करण्याची मान्यता देण्यात येत असते. त्या अनुषंगाने काही कामे राहिलेली असतील तर त्यासाठी मागील वर्षाचा निधी वापरुन खर्च करता येतो. असे असताना मागील दोन वर्षात प्राप्त झालेला निधी जिल्हा परिषदेच्या बँक खात्यात ठेवावा लागतो. जर तो निधी खर्च होत नसेल आणि शासनाला समर्पित करावयाचा नसेल तर तो निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीच्या माध्यमातून काढून घेण्यात येतो. त्यानंतर तो निधी बचत खात्यामध्ये ठेवण्यात येत असतो. त्या बचत खात्यावरील निधीवर बँकेकडून व्याज मिळत असते. त्यामुळे मिळणाऱ्या व्याजाचे पुढे काय करण्यात येते ? असे समितीने विचारले असता व्याजाचा निधी हा बचतीचा भाग आहे असे मुख्य लेखा अधिकारी यांनी सांगितले.

सदर निधी हा राज्य शासनाचा असतो. शासनाने तो निधी जिल्हा परिषदेच्या विकास कामासाठी दिलेला असतो. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी लोकांच्या सोयी सुविधांसाठी तो निधी वापरावयाचा असतो. परंतु शासनाकडून मिळालेला निधी न वापरता तो निधी तो जिल्हा परिषदेच्या बचत खात्यामध्ये जमा ठेवण्यात येतो आणि त्यावर मिळणाऱ्या व्याजामधून जिल्हा परिषदेची कामे

करण्यात येतात. सदर कामे कोणत्या नियमानुसार करण्यात येतात  याची माहिती समितीला द्यावी. सदर निधी जिल्हा परिषद स्व निधीसाठी वापरत असेल तर ते योग्य नाही. अशी समितीने सुचना केली.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की,  चालू वर्षातील निधी खर्च होऊ शकला नाही तर तो पुढील दोन वर्षात खर्च करण्यासाठी मान्यता देण्यात येत असते. प्रत्येक विभागाचा निधी जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण  सभेमार्फत मंजूर झालेला आहे. सदर निधी खर्चित झालेला आहे काय  असे समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, नाही. परंतु यासाठी जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन त्यानंतर जिल्हा नियोजन समिती मान्यता घ्यावी लागते त्याप्रमाणे जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली आहे. सन २०१४ च्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्हा परिषदेला राज्य शासनाकडून जो निधी प्राप्त होतो तो निधी प्राप्त झाल्यानंतर त्यासाठी जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन त्यानंतर पुन्हा जिल्हा नियोजन समितीची मान्यता घ्यावी लागत असते. त्यानंतर तो निधी जिल्हा परिषदेला खर्च करता येतो.

माहे मार्च, २०१८ मध्ये राज्य शासनाने अर्थसंकल्प मंजूर केलेला आहे. त्यामध्ये जिल्हा परिषदेने मागणी केल्याप्रमाणे कमी-अधिक प्रमाणात जिल्हा परिषदेला निधी मिळालेला असेल. त्यानंतर एप्रिल महिन्यामध्ये जिल्हा परिषदेला विविध कामांसाठी निधी मिळालेला असतो. असे असताना तो निधी किती कालावधीमध्ये विविध विभागांना वितरित करणे आवश्यक होते. मिळालेल्या निधीच्या कामांची प्रत्यक्षात सुरुवात केव्हा होत असते, अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी  यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेचा प्रारुप आराखडा जिल्हा नियोजन समितीला  सादर करण्यात येत असतो. त्यानंतर तो जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येत असतो सन २०१८ चा बाब निहाय आराखडा अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. ज्यावेळी तो आराखडा प्राप्त होईल त्यावेळी गावनिहाय त्याची मंजुरी घेऊन त्याला सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन काम सुरु करण्यात येईल.  त्याचप्रमाणे सन २०१८-१९ चा नियतव्यय अजून जिल्हा परिषदेला प्राप्त झालेला नाही.

आदिवासी विकास विभागाकडून मिळालेला निधी बँकेमध्ये बचत खात्यावर ठेवण्यात येतो. त्या निधीमधून मिळणाऱ्या व्याजावर जिल्हा परिषद स्वतःचा खर्च करीत असते. मागील तीन वर्षात आदिवासी विकास विभागामार्फत जिल्हा परिषदेला प्राप्त झालेल्या निधीच्या रकमेवर किती व्याज प्राप्त झाले ? याची माहिती समितीला सादर करण्यात यावी. त्याचप्रमाणे आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त झालेला निधी जिल्हा परिषद, गडचिरोली कोणत्या शासन निर्णयानुसार सदर निधी जिल्हा परिषदेच्या सेसमध्ये जमा करते, याची माहिती समितीला आढावा बैठकीमध्ये देण्यात यावी. असे समितीने निदेश दिले.

सहा हजार तीनशे किलो मीटरच्या ग्रामीण रस्ते (VR) आणि इतर जिल्हा रस्ते (ODR) या रस्त्यांपैकी किती रस्त्यांचे डांबरीकरण पूर्ण झालेले आहे ? किती रस्ते अपूर्ण आहेत, याची माहिती समितीला देण्यात यावी. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत गडचिरोली जिल्ह्यास किती निधी प्राप्त झाला आणि त्यापैकी किती कामे पूर्ण झालेली आहेत ? याची माहिती समितीला देण्यात यावी. जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाबद्दल सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे संबंधित अधिकाऱ्यांकडून समितीला प्राप्त झालेली नाहीत. त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत जिल्हा परिषदेला प्राप्त झालेला निधी जिल्हा परिषद इतरत्र वळवित असल्याचे निदर्शनास आलेले आहे.त्यामुळे याबाबत जिल्हा परिषदेने समितीला खुलासा दिला पाहिजे. त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने प्राप्त निधी, खर्चित निधी त्याचप्रमाणे इतरही अनेक प्रकारची माहिती न दिल्यामुळे समितीला सदरहू विभागाच्या निधीबद्दल साशंकता वाटत असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची साक्ष घेण्यात येईल, असे समितीने मत व्यक्त केले.

जिल्ह्यामध्ये असलेल्या ६ हजार ३०० कि.मी. रस्त्यांबद्दल समितीला माहिती देण्यात यावी अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता जि.प. यांनी विदित केले की, ६ हजार ३०० कि.मी. पैकी १६८३ कि.मी. डी.पी. रोड आहेत.

यावर समितीने जिल्ह्याला रस्त्यांसाठी मोठया प्रमाणात निधी प्राप्त झाला तरी देखील ५० टक्के रस्त्यांची कामे अपूर्ण असल्याचे दिसत आहे असा प्रश्न विचारला असता, कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, या वर्षी ४१४ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या कामांसाठी मंजूरी मिळालेली आहे.

अंतर्गत रस्ते तयार करीत असताना सार्वजनिक बांधकाम विभागाला वन विभागाकडून किंवा इतर विभागाकडून काही अडचणी उद्‌भवतात काय, अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, वन विभागाची कोणत्याही प्रकारची अडचण उद्‌भवत नाही. त्या विभागाची परवानगी मिळत असते.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये ५० टक्के रस्त्यांचे डांबरीकरण झालेले नाही. गडचिरोली जिल्हा नक्षलग्रस्त असल्यामुळे आणि अतिदुर्गम भाग असल्यामुळे जिल्ह्याच्या विकासासाठी राज्य शासनाकडून चांगल्या प्रकारे निधी मिळत असतो. परंतु येथील नागरिकांना किमान मुलभूत सुविधा जसे की, रस्ते, पाणी, आरोग्य या सारख्या सुविधा मिळत असल्याचे आढळुन येत नाही. प्रत्येक विभागाने त्यांची जबाबदारी ओळखुन काम केले पाहिजे, परंतु दुर्दैवाने या जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेच्या माध्यमातून अशा प्रकारचे काम होत असल्याचे आढळुन येत नाही, अशी समितीने नाराजी व्यक्त केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सन २०१६-१७

च्या कामाचे कार्यारंभ आदेश मिळालेले आहेत. सन २०१६-१७ ची कामे माहे जून महिन्यापर्यंत पूर्ण होतील. राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करुन घेण्याच्या संदर्भात राज्य शासनाकडे जिल्हा परिषदेमार्फत मागणी करण्यात येत नाही. ज्या प्रमाणे जिल्हा नियोजनाच्या आरखडयानुसार मागणी करण्यात येते त्याप्रमाणे निधी मिळत असतो.

केवळ कागदोपत्री रस्ते, इमारती बांधल्याचे दर्शविण्यात येते. त्यामुळे यासाठी मिळालेला निधी कोठे वापरण्यात येतो ? जिल्ह्यातील मुख्य रस्तेही वाईट अवस्थेत आहेत. त्यामुळे याबाबत कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात येत असते ? रस्त्याचे निविदा काढले आहेत, परंतु त्या ठिकाणी रस्ता तयार करण्यात आलेला नाही, अशा प्रकारच्या तक्रारी जिल्हा परिषदेकडे प्राप्त झालेल्या आहेत काय, अशी समितीने विचारणा केली असता अशा प्रकारच्या तक्रारी जिल्हा परिषदेकडे प्राप्त झालेल्या नाहीत असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

मागील वर्षात रस्त्यावरील डागडूजीवर किती खर्च करण्यात आलेला आहे असा समितीने प्रश्न विचारला असता डागडुजीवर १ कोटी १५ लाख रुपये खर्च झाले आहेत असे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले.

समितीने दुर्गम भागातील रस्त्यांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. रस्त्यांची कामे दर्जेदार झाली नाहीत, सन २०१६-१७ च्या कामांबाबत समितीकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. विभागाकडे तक्रारी प्राप्त झाल्या असतील त्याबाबत कारवाई करण्यात आली आहे काय अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, रस्त्यांच्या दर्जाबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. एसपीएम या थर्डपार्टीकडून रस्त्याच्या दर्जाबाबत तपासणी करुन घेण्यात आली आहे. यासंदर्भातील एक प्रकरण सादर करण्यात आले आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते चांगले नसल्यामुळे अनेक ठिकाणी एस.टी. बस जात नाही. रस्ते खराब असल्यामुळे एस.टी.कडून त्या मार्गावरील बससेवा बंद करण्यात आली असे परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २० एप्रिल, २०१८ च्या बैठकीत समितीला सांगितले आहे. किती बस फेऱ्या रस्त्यांअभावी बंद करण्यात आल्या आहेत अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय नियंत्रक एस.टी. महामंडळ यांनी सांगितले की, पेंढारी रस्त्यावरील बससेवा बंद केली आहे. रस्त्यांची तात्पुरती कामे सुरु केली आहेत. बस सेवा अद्याप सुरु केलेली नाही.

भामरागड तालुक्यातील अनेक गावांमध्ये बससेवा उपलब्ध होऊ शकत नाही. भामरागड ते अहेरी जाण्यासाठी सायंकाळी ६.०० वाजेनंतर बससेवा उपलब्ध नाही. समजा एखाद्या कर्मचाऱ्याला सहा नंतर आरोग्य सेवेची गरज भासल्यास तेथे बससेवा उपलब्ध नसल्यामुळे तेथील लोकांची अडचण होत आहे. त्यामुळे भामरागड येथून अहेरीला जाण्यासाठी सायंकाळी ६.०० वाजेनंतर बससेवा

उपलब्ध करुन देण्यात यावी असे समितीने निदर्शनास आणले असता, भामरागड येथून सायंकाळी ५ वाजेनंतर बससेवा उपलब्ध नाही. अहेरी येथून गडचिरोली येथे जाण्यासाठी सायंकाळी ६ व ७ नंतर बससेवा उपलब्ध नाही. भामरागड येथून अहेरी येथे जाण्यासाठी शवेटची बस सायंकाळी ५.०० वाजता आहे असे विभागीय नियंत्रक एस.टी. महामंडळ यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबीकडे लक्ष द्यावे, कारण ग्रामीण भागात बससेवा पूर्ववत सुरु करायला पाहिजे असे समितीने निर्देश दिले.

रस्ते चांगले नसल्यामुळे बससेवा सुरु करता येत नाही. रस्ते तयार करण्यासाठी निधी उपलब्ध नाही काय ? ६७ गावांमध्ये रस्ते नाहीत ही बाब अतिशय गंभीर आहे. जिल्ह्यातील सर्व रस्ते व्हायला पाहिजेत. यासाठी विभागाने राज्य शासनाकडे निधी मागण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागात रस्ते होणे अतिशय आवश्यक आहे. गडचिरोली जिल्ह्यातील प्रत्येक आदिवासी गावात रस्ते असावेत तेथे बस सेवा असावी. उशिरात उशिरा रात्री ७ ते ८ वाजेपर्यंत बससेवा उपलब्ध करुन दिली पाहिजे.

गडचिरोली जिल्ह्यातील रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करण्यात येतात. त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी देण्यात येतो. त्यामुळे बससेवा सुरळीत सुरु राहणे ही अतिशय महत्वाची बाब आहे. पाऊस जास्त झाला तेव्हा देखील काही गावांचा संपर्क तुटतो व बससेवा बंद होते. याकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे असे समितीने मत व्यक्त केले.

विभागीय नियंत्रक यांनी सांगितले की, जास्त प्रमाणात पाऊस झाल्यास भामरागड येथील बस सेवा एक दोन दिवसांसाठी बंद करावी लागते. जास्त प्रमाणात पाऊस झाला तेव्हा जिल्हाधिकारी आढावा घेतात. काही ठिकाणी पूलाची उंची कमी असल्यामुळे तेथून पाणी वाहत असताना बससेवा बंद करावी लागते. तेथील पूलाची उंची वाढविण्याचा प्रयत्न झालेला नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील ६७ गावांमध्ये रस्ते खराब असल्यामुळे तेथे बससेवा बंद आहे. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यासंदर्भात तातडीने बैठक घेऊन त्या रस्त्यांच्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करुन समितीला अहवाल सादर करावा. त्याचप्रमाणे भामरागड ते अहेरी येथून ६.०० वाजेनंतरची सेवा तातडीने सुरु करण्याची कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश दिले.

यावर दोन सेवा वाढविण्याचा प्रयत्न तातडीने करण्यात येईल असे विभागीय नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ यांनी आश्वासन दिले.

**महिला व बाल कल्याण विभाग :-**

गडचिरोली जिल्ह्यात अंगणवाड्यांची संख्या किती आहे अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, एकूण अंगणवाड्या १७७१ आहे. त्यापैकी १६०७ अंगणवाडींना इमारती असून १६४ अंगणवाडींना इमारती नाहीत.

यावर समितीने, १६०७ इमारती पैकी किती इमारती जीर्ण झालेल्या आहेत अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, १६४ पैकी ९० अंगणवाड्या निर्लेखित केल्या आहेत. पावसाळा येत असल्यामुळे निर्लेखनाची कारवाई बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे. सन २०१५-१६ मध्ये केंद्र शासनाचा फ्री फॅब्रीकेटेड अंगणवाडीसाठी ७५ टक्के निधी आला होता. जिल्हा वार्षिक योजनेमध्ये रूपये १३.०० लक्ष इतक्या निधीची ग्रँट ठेवली होती. परंतु, शासनाचे पत्र आले की, बांधकामासाठी निधी वितरित करण्यात येऊ नये. सन २०१५-१६ मध्ये फ्री फॅब्रीकेटेड अंगणवाडीसाठी किती निधी आला होता असा समितीने प्रश्न विचारला असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, रूपये ५.९० कोटी निधी देण्यात आला होता. तो निधी शासनाने परत मागितला. दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर अंगणवाडीसाठी नवीन लेखाशिर्ष निर्माण झाला. सन २०१६-१७ मध्ये शासनाने नवीन निदेश दिले होते. पूर्वी अंगणवाडीसाठी रूपये ५.३० लाख, त्यानंतर रूपये ६.६० हजार आणि आता रूपये ७.०० लाख देण्यात येतात याची माहिती आहे काय अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की,दिनांक १५ डिसेंबर २०१७ रोजीचा शासन निर्णय आहे. त्यानुसार बांधकाम विभागाला अंदाजपत्रक बनवावयास सांगितले होते. तेव्हा त्यांनी रूपये ६.६० लाख मध्ये अंगणवाडीचे काम होऊ शकत नाही असे कळविले. बांधकाम विभागाने रूपये ९ लाख इतक्या रकमेचे अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यांनी निधी वाढवून द्यावा असे सांगितले आहे. सन २०१६-१७ मध्ये ४ अंगणवाड्या मंजूर झाल्या होत्या. त्या पूर्ण झालेल्या आहेत. त्यासाठी एका अंगणवाडीसाठी रूपये ६.६० लाख इतका निधी देण्यात आला होता. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून हे काम पूर्ण केले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून रूपये ६.६० लाख दिल्यानंतर अंगणवाडीचे काम पूर्ण होते. राज्य शासनाच्या एकात्मिक बाल विकास कार्यक्रमाच्या (ICDP) माध्यमातून बांधण्यात येणाऱ्या अंगणवाडीचे काम रूपये ६.६० लाख इतक्या निधीमध्ये करण्यास बांधकाम विभाग तयार होत नाही.

यावर समितीने जिल्हा परिषदेच्या जिल्हा नियोजन समिती मधून ६ लाख ६० हजार रुपयांचा निधी चार कामांसाठी मिळालेला आहे. त्याचप्रमाणे आदिवासी विकास विभागाकडून एकात्मिक बाल विकास कार्यक्रमाच्या (ICDP) साठी निधी मिळत असतो. आयुक्त कार्यालयाकडून निधी मिळालेला नाही. असे शिक्षण अधिकारी यांनी सांगितले. सदरहू ०६ लाख ६० हजार रुपयांचा

निधी कोणामार्फत मिळालेला आहे असे समितीने विचारणा केली असता शिक्षण अधिकारी यांनी विदित केले की, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या पत्रामध्ये ६ लाख ६० हजार रुपयांच्या निधी आदिवासी क्षेत्रासाठी देण्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. राज्य शासनाकडे निधीची मागणी देण्यासाठी पत्र व्यवहार करण्यात आला होता. परंतु त्याबाबत पुढील कार्यवाही झालेली नाही. सध्या ६ कोटी रुपयांची मागणी अंगणवाडयांसाठी करण्यात आलेली आहे.

यावर समितीने, लहान मुलांच्या शिक्षणाच्या हक्कापासून त्यांना वंचित ठेवता कामा नये. जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून बांधण्यात येणाऱ्या अंगणवाडीसाठी जर निधी कमी मिळत असेल तर त्यासाठी निधीची बचत करण्यासाठी शांळांच्या स्लॅब ऐवजी पत्रे टाकून त्याखाली लाकडाचे प्लायवूड बसवून शाळा सुरु करता येऊ शकते, अशा प्रकारच्या काही सूचना विभागामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाला करण्यात येतील काय ? ज्यामुळे मुलांची मोकळ्या जागेवर शाळा घेण्याची वेळ येणार नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, समितीने म्हटल्याप्रमाणे स्लॅबच्या ऐवजी पत्राचा शेड तयार करुन शाळा तयार करता येऊ शकेल काय ? याचा अभ्यास करता येईल. त्याचप्रमाणे अंगणवाडया जिल्हा परिषदेच्या टाईप प्लॅननुसार करण्यासाठी योग्य ती कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येईल. आवश्यकता वाटल्यास काही ठिकाणीच्या अंगणवाडयांचे शौचालयाचा खर्च कमी करुन तो अंगणवाडीसाठी वापरुन इस्टीमेट कमी करता येईल.

लहान मुलांनी शौचाला बाहेर जाणे योग्य नाही. सध्या संपूर्ण भारतात स्वच्छ भारत अभियान सुरु असताना त्यांना उघडयावर शौचालयास पाठविणे योग्य होणार नाही. त्याऐवजी अंगणवाडयांच्या छताचा खर्च कमी करुन त्याऐवजी पत्राचे छत तयार करुन खर्च कमी करता येऊ शकतो. असे समितीने मत व्यक्त केले.

समितीने, अंगणवाडयांची बांधकामे आणि शौचालये किती दिवसामध्ये पूर्ण करण्यात येतील ? याची माहिती देण्यात यावी. असे सांगितले असता शिक्षण अधिकारी यांनी विदित केले की, अंगणवाडयांच्या दुरुस्ती आणि बांधकामासाठी ६ कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. त्यामुळे अंगणवाडी, शौचालये बांधण्याचे काम लवकरात लवकर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. त्याचप्रमाणे लहान मुलांच्या कुपोषणाच्या दृष्टीनेही योग्यती कार्यवाही करण्यात येईल. ६४ अंगणवाडयांसाठी १० कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. त्यापैकी ६ कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. पुढील आर्थिक वर्षामध्ये यासाठी अधिकच्या निधीची मागणी करण्यात येईल.

गडचिरोली जिल्ह्यामधील बालकांच्या कुपोषणाच्या स्थितीबद्दल समितीला माहिती देण्यात यावी. अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, गडचिरोली जिल्ह्यामध्ये ६१४ बालके ही सॅम गटातील असून मॅम गटातील २७०० बालके आहेत. कुपोषाचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) सुरु करण्यात येत आहे.

ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) कार्यक्रमाची माहिती समितीला देण्यात यावी. असे समितीने सांगितले असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सध्या जिल्हा परिषदेकडे जो आहार आहे, तो मुलांना देण्यात येत आहे. तसेच डॉक्टरांकडून कुपोषित बालकांची तपासणी करण्यात येत असते. त्याचप्रमाणे कुपोषित बालकांना सकस आहार देण्यासाठी अंगणवाडी सेविकांना सांगण्यात येत असते. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेची माहिती देण्यात यावी. असे समितीने सांगितले असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, अब्दुल कलाम योजनेंतर्गत टप्पा १ आणि टप्पा २ गरोदर आणि स्तनदा मातांसाठी एकवेळचा आहार या माध्यमातून देण्यात येत असतो. परंतु यासाठी निधी कमी पडत असल्यामुळे अपेक्षित उद्दिष्ट गाठता येत नाही.

अपुऱ्या निधीसाठी जिल्हा परिषदेमार्फत कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, गरोदर आणि स्तनदा मातांसाठी एकवेळचा आहार यासाठी २३ रुपये मिळत असतात. परंतु यामध्ये सदर खर्च परवडत नाही. सामान्यपणे एका महिलेच्या आहारासाठी सरासरी ३५ रुपयांचा खर्च अपेक्षित असतो.

पालघर जिल्ह्यामध्ये अब्दुल कलाम अमृत आहार योजनेमधून मिळणाऱ्या रकमेमध्ये जिल्हा परिषदेने स्वनिधीमधून प्रत्येक लाभार्थ्यांसाठी १० रुपये देऊन गरोदर आणि स्तनदा मातांसाठी एकवेळचा आहार देण्यात येतो. अशा प्रकारचा उपक्रम पालघर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे. जर पालघर जिल्हा परिषद अशा प्रकारची मदत गरोदर आणि स्तनदा मातांसाठीच्या आहारासाठी करु शकत असेल तर गडचिरोली जिल्हा प्रशासनानेही त्यादृष्टीने कार्यवाही करावी. असे समितीने मत व्यक्त केले.

**सिंचन विभाग :**

सिंचन विभागाचा गडचिरोली जिल्ह्यामध्ये मा.मा. तलाव किती आहेत? याची माहिती देण्यात यावी असे समितीने विचारणा केली असता गडचिरोली जिल्ह्यामध्ये मा.मा. तलावाची १३ कामे मंजूर असून त्यापैकी ६ तलावांचे काम पूर्ण झालेले आहे. मा.मा. तलावांची साठवण क्षमता किती आहे असे समितीने विचारले असता कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, शून्य हेक्टरपासून ते २०० हेक्टरपर्यंत या तलावांच्या माध्यमातून क्षेत्र ओलीताखाली येऊ शकते. त्याचप्रमाणे जिल्ह्यामध्ये १६४५ मा.मा. तलाव आहेत. सदर तलाव हे गाळमुक्त आहेत काय असा प्रश्न विचारला असता

तीन मा.मा. तलावामधील गाळ काढण्यात आलेला होता. सध्या जून महिन्यामध्ये गाळ उपसण्यात येणार आहे असे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले.

यावर समितीने, मा.मा. तलाव गाळमुक्त करण्यासाठी जिल्हा परिषदेने प्रस्ताव तयार केलेला आहे काय अशी विचारणा केली असता मा.मा. तलावामधील गाळ काढण्यासाठी विभागाने कार्यक्रम तयार केलेला आहे काय ? जेणेकरुन राज्य शासनाच्या यासंदर्भातील योजनांचा फायदा जिल्हा परिषदेला होऊ शकतो. मा.मा. तलावांची साठवणूक क्षमता वाढली पाहिजे, या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजे आणि यासाठी जिल्हा परिषदेने पुढाकार घेऊन युध्द पातळीवर या संदर्भातील कामे केली पाहिजेत. अशी समितीने सूचना केली.

त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, माल गुजारी तलावाची १५८ कामे सुरु केली आहेत. त्या तलावातील गाळ काढण्याचे काम सुरु आहे. शासनाच्या योजनेतून ही कामे केली जात आहेत. माल गुजारी तलावाच्या कामांना आयुक्त, सिंचन विभागाकडून मंजुरी घेतली जाते. माल गुजारी तलावासाठी नॉन प्लॅनमधून निधी घेण्यात येतो. नॉन प्लॅनमधून १८ कोटी रुपये देण्यात आले आहेत. १५८ माल गुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे सुरु असून १८ कोटी रुपयांपैकी १० कोटी रुपये खर्च केले आहेत. यामध्ये गाळ काढणे, गेट बसविणे त्याचप्रमाणे तलावाची सर्वंकष दुरुस्ती करण्यात येत आहे. पुढील वर्षात उर्वरित माल गुजारी तलावांची कामे केली जाणार आहेत. ही कामे जिल्हापरिषदेच्या माध्यमातून करण्यात येत आहेत. सिंचन क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने काम होणे आवश्यक आहे. जिल्हापरिषदेच्या योजनेतून सिंचन वाढविण्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत. असे समितीने विचारले असता जिल्हापरिषदेच्या योजनेतून सिंचन क्षमता वाढविण्यासाठी उप बंधारे बांधण्यात आली आहेत. असे कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. निधी किती प्राप्त झाला त्यातून कोणत्या वर्षात किती कामे करण्यात आली आहेत अशी समितीने विचारणा केली असता, कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, सन २०१५-१६ मध्ये ५०४ लक्ष रुपये निधी प्राप्त झाला होता. या वर्षात ४२ मंजूर कामांपैकी ३६ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. ६ कामे अपूर्ण आहेत. सन २०१६-१७ मध्ये ७६० लक्ष रुपये निधी प्राप्त झाला होता या निधीतून ६० बंधाऱ्यांची कामे प्रस्तावित करण्यात आली आहे. सन २०१७-१८ मध्ये ३९७ लक्ष रुपये निधी प्राप्त झाला होता या निधीमधे २७ बंधारे बांधण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सन २०१६-१७ मधील ६० बंधाऱ्यांची कामे सुरु आहेत. सन २०१७-१८ मध्ये २७ बंधाऱ्यांची कामे प्रस्तावित आहेत. सदर कामाच्या निविदा काढण्यात आल्या आहेत काय ? बंधाऱ्यांची क्षमता किती आहे. बंधाऱ्याचे स्ट्रक्चर झाले आहे काय, बंधाऱ्यांची लांबी, रुंदी वाढविण्यात आली आहे काय, निविदा काढून किती कालावधी झालेला आहे. सन २०१४-१५ मधील कामे पूर्ण झाली आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, सन २०१४-१५ मधील

काही कामे अपूर्ण आहेत. ती कामे माहे मे महिन्यापर्यंत करुन घेण्यात येतील. काही बंधाऱ्यांमध्ये पाणी असल्यामुळे कामे करता येत नाहीत.

यावर समितीने, विभागाने खबरदारी घेतलेली दिसत नाही. कामाचे कार्यादेश देताना पावसाळ्याचे दिवस त्यातून वगळण्यात येतात. कनिष्ठ अभियंता कामाच्या जागेवर जाऊन कामाची पाहणी करतात काय ? सदर कामाचा निधी त्याच वर्षात खर्च झाला पाहिजे. सदर कामाचा निधी दोन वर्षे ठेवता येत नाही त्यामुळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची अडचण होते. ९६ कामे अपूर्ण दिसत आहेत. ही सर्व कामे कधी पर्यंत पूर्ण होतील. अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, सदर कामे माहे सप्टेंबर,ऑक्टोबर महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे.

सन २०१५-१६ चा निधी सन २०१७-१८ मध्ये खर्च झाला पाहिजे. दोन वर्षापासून ४२ कामांची मंजुरी असून त्यापैकी फक्त ३६ कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे पूर्ण होण्यासाठी पुढील मार्च महिना उजाडेल. उर्वरित ९६ कामे किती दिवसात पूर्ण करण्यात येतील. असे समितीने विचारले असता ही सर्व कामे करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. असे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले मागील कामांचा निधी समर्पित झाल्यामुळे तो मिळविण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा लागतो. राज्य शासनाच्या वित्त विभागाकडून निधी लवकर मिळत नाही. गडचिरोली येथून मुंबईला जाण्यासाठी दीड दिवस लागतो. एकदा निधी परत गेल्यावर तो पुन्हा मिळविणे कठीण असते. त्यामुळे वेळेत कामे करणे अत्यंत महत्वाचे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यासंदर्भातील कामांचा वेळोवेळी आढावा घेणे आवश्यक आहे. अपूर्ण कामे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. लवकरच अपूर्ण कामे पूर्ण करण्यात येतील, असे कार्यकारी अभियंता यांनी आश्वासित केले.

यावर समितीने ज्या कंत्राटदाराला ही कामे दिली आहेत त्यांनी वेळेत काम केले नाही म्हणून त्यांना नोटीस दिली आहे काय ? काम वेळेवर केले नाही तर तीन नोटीसा देऊन कंत्राटदाराला दंड लावता येतो ती कार्यवाही करण्यात आली आहे काय असे विचारले असता, त्या कंत्राटदाराची कार्यादेश रद्द करुन त्यांना काळया यादीत टाकण्यात येत आहे, असे कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले.

यावर समितीने किती कंत्राटदारांना नोटीसा दिल्या त्याची यादी समितीला सादर करावी. नोटीस पाठविल्यावर दंडात्मक कारवाई करावी. नंतर त्यांना काळया यादीत टाकण्यात यावे. अशी सुचना केली असता, कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, कंत्राटदारांना दंड लावण्यात आला असून अद्याप काळया यादीत टाकले नाही. अपूर्ण कामे पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

कामासाठी दिलेला निधी खर्च होत नाही. निधी समर्पित करण्यात येतो. गडचिरोली जिल्ह्यातील अधिकारी जाणीवपूर्वक कामे करीत नाहीत असे दिसून येते. येथील अधिकारी आदिवासी विकास

विभागाचा निधी खर्च करीत नाही. राज्यपाल महोदयांचे निदेश आहेत, त्यानुसार कार्यवाही होणे अपेक्षित आहे. तांत्रिक अडचणी असतील तर समिती समजू शकते. ज्या अधिकाऱ्यांनी जाणीवपुर्वक निधी समर्पित होऊ दिला त्यांच्या गोपनीय अहवालात याबाबत नोंद घेण्यात यावी. निधी मिळविण्यासाठी पाठपुरावा करावा लागतो, निधी मिळाल्यावर तो समर्पित होऊ दिला जात असेल तर ही बाब योग्य नाही. गोरगरीब आदिवासी माणसाला चांगले जीवन जगता आले पाहिजे यासाठी शासन भरपूर निधी खर्च करते. परंतु अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मूळ आदिवासी लोक त्यांच्या लाभापासून वंचित राहत आहेत. तीन वर्षापासून कामे प्रलंबित आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, माहे जानेवारी, २०१७ रोजी जिल्हा परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागली होती म्हणून कामे पूर्ण करता आली नाहीत. यावर समितीने आचारसंहिता काही ठराविक काळापुरती असते. इतर वेळेत ही कामे पूर्ण करणे आवश्यक होते. ती केल्याचे दिसत नाही असे लक्ष वेधले असता, जलसंधारणाची चुकीचे कामे रद्द करण्याचा ठराव जिल्हा परिषदेने केला होता, असे कार्यकारी अभियंता यानी स्पष्ट केले.

समितीने, ही ४२ कामे रद्द करण्याचा ठराव झाला होता काय असे विचारले असता, कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, ही ४२ कामे रद्द करण्याचा ठराव झालेला नसून यातील ३६ कामे पूर्ण झाली आहेत. पाऊस सुरु झाल्यामुळे ६ कामे अपूर्ण राहिली आहेत. १५ लाख रुपयांच्या वर रकमेचे ई-निविदा करण्यात येते. ही ६ कामे १५ लाख रुपयांच्या आतील असून ग्रामपंचायतीकडून ही कामे करण्यास उशीर झाला आहे, ही कामे पुर्ण करणारी संस्था ग्रामपंचायत आहे. एटापल्ली गट विकास अधिकारी यांच्या अखत्यारितील ही कामे आहेत. या ६ कामांबाबत सविस्तर माहिती उद्या समितीला सादर करतो.

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा :-**

अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी कोणकोणत्या योजना राबविण्यात येत आहेत, त्यासाठी किती निधी प्राप्त झाला आहे, योजनानिहाय घरकुल लाभार्थींची यादी सादर करण्यात यावी. अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, लाभार्थींची यादी फार मोठी आहे. ती समितीस सादर करतो आदिवासी उपयोजना अंतर्गत इंदिरा आवास योजनेसाठी सन २०१५-१६ मध्ये एकूण रूपये ९१५.९६ लाख इतका निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी रूपये ७६३.०६ लाख इतका निधी खर्च झाला असून रूपये १५२.०९लाख निधी शिल्लक आहे. पंतप्रधान आवास योजने अंतर्गत सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये एकूण रूपये ६०२.४५ लाख इतका निधी प्राप्त झाला असून सर्व निधी खर्च करण्यात आलेला आहे. शबरी घरकुल योजने अंतर्गत रूपये २८० लाख इतका निधी प्राप्त झाला असून रूपे २३५.१३ लाख इतका निधी खर्च झालेला आहे, तर रूपये ४४.८७ लाख इतका निधी शिल्लक राहिला आहे. आदिम जमाती घरकूल

योजने अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये रूपये २५० लाख, सन २०१६-१७ मध्ये रूपये ३४ लाख दिनांक ५ मे, २०१६ रोजी रूपये ३३ लाख दिनांक १ जून, २०१६ रोजी निधी प्राप्त झाला आहे. सन २०१५-१६ ते २०१६-१७ या कालावधीत एकूण रूपये ३१७ लाख इतका निधी मिळाला असून हा सर्व निधी खर्च झालेला आहे. सन २०१५-१६ या वर्षामध्ये इंदिरा आवास योजने अंतर्गत ३१२३ घरकुले मंजूर झाली असून १५२३ घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे. सन २०१६-१७ या वर्षात पंतप्रधान अवास योजने अंतर्गत एकूण ३७१९ घरकुले मंजूर असून ६१० घरकुलांचे काम पूर्ण आहे. सन २०१७-१८ या वर्षात १०१६ घरकुले मंजूर असून ११ कामे पूर्ण आहेत. आदिम जमाती घरकूल योजने अंतर्गत सन २०१४-१५, सन २०१५-१६ या वर्षात ९६७ कामे मंजूर असून १५ कामे पूर्ण झाली आहेत. सन २०१६-१७, २०१७-१८ या वर्षात ३७७ घरकुले मंजूर झाली आहेत. शबरी घरकुल योजने अंतर्गत सन २०१५-१६, सन २०१६-१७ या वर्षात ७९७ घरकुले मंजूर झाली आहेत, तर १३९ घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे.

अपूर्ण कामांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. सदर कामे पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषदेने कोणती उपाययोजना केली आहे अशी समितीने विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, भामरागड येथील आदिवासींची घर बांधण्याची प्रवृत्ती वेगळी आहे. ते स्वतः घरकुलाचे बांधकाम करतात. सुरूवातीला ते फक्त फाऊंडेशचे काम करतात. पावसाळा संपल्यानंतर मग ते घराचे काम करतात. ग्रामस्थापत्यमध्ये अडचणी आल्या आहेत. एनजीओने अभियंते पुरविले होते. पण त्यांनी पगार व्यवस्थित दिला नसल्यामुळे त्या एनजीओला काळ्या यादीत टाकले. दुसऱ्या एनजीओने ३१ अभियंते पुरविले होते. त्यापैकी २१ अभियंते काम करीत आहेत त्यामुळे दिनांक ३० जून पर्यंत घरकुले पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. राज्य शासनाकडून जिल्हा परिषदेला फार मोठी मदत मिळालेली आहे. या अभियंत्यांना फक्त बेसिक पगार द्यावा अशी मागणी जिल्हा परिषदेने केली आहे ती तत्त्वतः मान्य करण्यात आली आहे. अपूर्ण घरकुलांची संख्या ११५२७ होती त्यापैकी ७००० घरकुलांचे काम पूर्ण करण्यात आले आहेत. ज्या लाभार्थींनी प्रथम हप्ता घेतला आहे पण कुठलेही काम केले नाही, मात्र निधी खर्च केला आहे त्यासंबंधात शासनाकडून मार्गदर्शन देखील मागितले आहे.

यावर समितीने ज्या लाभार्थीने संपूर्ण पैसे उचलले असतील आणि ज्यांची पैसे भरण्याची तयार असेल अशांकडून पैसे वसूल करून शासनाकडे भरण्यात यावेत. असे मत व्यक्त केले असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, घरकुलांसाठी देण्यात आलेला निधी उचलून कोणत्याही प्रकारचे काम लाभार्थीने केले नसेल तर त्याच्या विरोधात कायदेशीर कारवाई करावी किंवा कसे असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी शासनाने लाभार्थींवर कारवाई न करता घरकुल बांधण्याची कार्यवाही होत असेल तर करावी असे मत व्यक्त केले.

**शालेय शिक्षण विभाग :-**

गडचिरोली जिल्ह्यामध्ये कमी पटसंख्येच्या शाळा किती आहेत अशी समितीने विचारणा केली असता शिक्षण अधिकारी यांनी विदित केले की, कमी पटसंख्येच्या आतील ४२ शाळा आहेत. त्यामध्ये १२ शाळा बंद झालेल्या आहेत. बंद झालेल्या १२ शाळामधील आणि हस्तांतरित करण्यात आलेल्या मुख्य शाळेमधील अंतर किती आहे असा प्रश्न विचारला असता शिक्षण अधिकारी यांनी सांगितले की, शाळांची पटसंख्या जर १० च्या आत असेल तर त्या शाळा बंद करण्यात आलेल्या आहेत अशा बंद केलेल्या शाळांची एकूण संख्या १२ आहे.

सदरहू १२ शाळांमध्ये किती विद्यार्थी शिक्षण घेत होते, याची माहिती समितीला देण्यात यावी. असे समितीने निर्देश दिले असता सदरबाबतची माहिती समितीला आढावा बैठकीमध्ये देण्यात येईल असे शिक्षणाधिकारी यांनी सांगितले. शिक्षण हक्क कायद्याबद्दलची माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने सांगितले असता, ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे असे शिक्षणाधिकारी यांनी स्पष्ट केले. पेसा अंतर्गत सदर शाळा आहेत काय असे समितीने विचारले असता, शिक्षण अधिकारी यांनी होकार दर्शविला.

ज्या ठिकाणी आदिवासी लोकसंख्या अधिक आहे, त्या ठिकाणी पेसा कायदा लागू करण्यात आलेला आहे काय अशी समितीने विचारणा केली असता शिक्षणाधिकारी यांनी सांगितले की, पेसा अंतर्गत गावांची निश्चिती करण्यात आलेली आहे. आदिवासी लोकांच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे, या दृष्टीने पेसा कायद्यामध्ये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या दृष्टीने त्यामध्ये विविध प्रकारचे निकष लावण्यात आलेले आहेत. दुर्गम भागातील मुलांना चांगल्या दर्जाचे आणि त्याच्या भाषेमधून शिक्षण मिळाले पाहिजे. या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सदर योजना राबविण्यात येत असते. त्यामुळे पेसाच्या कामाचे नियोजन करण्यात आलेले आहे काय अशी समितीने विचारणा केली असता शिक्षणाधिकारी यांनी पेसाच्या कामाचे नियोजन करण्यात न आल्याचे सांगितले.

पेसा अंतर्गत असणाऱ्या शाळांवर बोली भाषेतील शिक्षक असले पाहिजे. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी अनुसूचित जमातीच्या बिंदुवरील शिक्षक असेल पाहिजेत. अशा प्रकारच्या तरतुदी त्यामध्ये करण्यात आलेल्या आहेत. जिल्हा अंतर्गत किती शिक्षकांच्या बदली झालेल्या आहेत अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, पेसा कायदयामुळे जिल्हा अंतर्गत बदली करता येत नाही. शिक्षकांच्या अंतर्गत बदलीच्या संदर्भात पेसा भागात आणि नॉन पेसा भागामध्ये शिक्षकांची बदली कशा प्रकारे करता येईल, याबाबत शासनाचे कोणत्याही प्रकारचे धोरण उपलब्ध नाही. सध्याच्या शासन निर्णयाप्रमाणे पेसा क्षेत्रातही अंतर्गत बदली होऊ शकते.

पेसा भागातील शाळांच्या संदर्भात राज्य शासनाने सोपा आणि अवघड अशा प्रकारचा शासन निर्णय तयार केलेला आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, ज्या ठिकाणच्या दुर्गम भागात एस.टी. बस जाते तो भाग सोपा आहे, असे म्हटलेले आहे असे समितीने लक्षात आणून दिले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अंतर्गत अवघड क्षेत्रे ठरविण्यात आलेले आहेत असे शिक्षणाधिकारी यांनी सांगितले उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की,गडचिरोली जिल्ह्यामध्ये एटापल्ली, भामरागड या सारख्या अतिदुर्गम भागामध्ये कोणते शिक्षक जाण्यासाठी तयार होत नाही. गडचिरोली ते भामरागड किंवा एटापल्ली या ठिकाणी जाण्यासाठी बसने पाच तास लागत असतात. त्यामुळे सदर भाग हे अवघड क्षेत्रामध्ये घोषित करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने शिक्षकांच्या बदल्या होत असतात.

दुर्गम आणि आदिवासी भागामध्ये शिक्षक जाण्यासाठी तयार होत नाहीत. त्यामुळे त्यांना विशेष भत्ता देण्यात येत असतो. परंतु काही शिक्षक अशा प्रकारचा विशेष भत्ता घेऊन त्या ठिकाणी जात नाहीत. या अनुषंगाने राज्य शासनाने पेसा अंतर्गत असलेल्या शाळांमध्ये शिक्षक प्राधान्याने असले पाहिजेत, अशा प्रकारची तरतूद केलेली आहे असे समितीने लक्ष वेधले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की,सोपे आणि अवघड क्षेत्र घोषित करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे आदिवासी उप योजना भागामध्ये अधिक शिक्षक मिळाले पाहिजेत, यासाठी रिक्त पदे भरण्यात येत असतात. त्याचप्रमाणे बिगर आदिवासी क्षेत्रासाठी शिक्षकांची उपलब्धता करुन ते विविध ठिकाणी सामनीकरण पध्दतीने कार्यान्वीत करण्यात येतात.

समितीने, दुर्गम आदिवासी भागातील शिक्षकांना एक उच्चस्तर वेतनश्रेणी लागू आहे काय, असा प्रश्न विचारला असता शिक्षणाधिकारी यांनी शिक्षकांना एक उच्चस्तर वेतनश्रेणी लागू आहे असे सांगितले.

सुवर्ण जयंती अभियानांतर्गत शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे काय असे समितीने विचारले असता शिक्षणाधिकारी यांनी सांगितले की, सदर योजना सन २०१०-११ पासून आदिवासी विकास विभागामार्फत सुरु करण्यात आलेली आहे. सन २०१५-१६ ला ४५५.३३ लक्ष रुपये प्राप्त झालेले होते. त्यापैकी ३३१.५७ लक्ष रुपये वितरीत करण्यात आलेले आहेत. सन २०१६-१७ मध्ये ५४९.९४ लक्ष रुपये प्राप्त झालेले होते. त्यापैकी २३३.४३ लक्ष रुपये वितरीत करण्यात आलेले आहेत. सन २०१७-१८मध्ये ४२० लक्ष रुपये प्राप्त झालेले आहेत. त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. किती शाळांची वीज जोडणी करण्यात आलेली नाही. आणि किती शाळांची वीज जोडणी देयकाआभावी तोडण्यात आलेली आहे. अशी समितीने विचारणा केली असता शिक्षणाधिकारी यांनी सांगितले की, ८३ टक्के शाळांची वीज जोडणी करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे ४० टक्के शाळांची वीज जोडणी पैशांअभावी तोडण्यात आलेली आहे.

समितीने, पेसा अंतर्गत ग्रामपंचायतीमधील शाळांच्या डिजिटलसाठी कार्यवाही करण्यात आलेली आहे काय असे विचारले असता १३४८ शाळा विविध योजनांच्या माध्यमातून डिजिटल करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये ग्रामपंचायतीचा फार मोठा सहभाग असतो. असे शिक्षणाधिकारी यांनी सांगितले. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचाविण्यासाठी कोणत्या प्रकारचे धोरण राबविण्यात येणार आहेत अशी समितीने विचारणा केली असता शिक्षणाधिकारी यांनी विदित केले की, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी स्तर निश्चितीकरण, गुणवत्ता विकास कार्यक्रम, विविध प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत असते. या माध्यमातून विद्यार्थ्यांची क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

आदिवासी भागातील जे विद्यार्थी शाळेत शिक्षण घेत आहेत, त्यांच्यासाठी इंग्रजी आणि गणित या विषयाच्या संदर्भात कोणते धोरण राबविण्यात आलेले आहे अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, केंद्र शासनाकडून नॅशनल सॅम्पल सर्व्हे केला होता. त्यामध्ये मराठी भाषा व गणित विषयामध्ये मुलांची प्रगती कमी असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे अध्यापनाचा स्तर वाढविण्यासाठी आदिवासी भागात बोली भाषेत शिक्षण देण्यात येत आहे. यासाठी दूभाषकाची नियुक्ती केल्यामुळे मुलांना भाषा व गणित विषय समजावून सांगितला जातो. स्थानिक आदिवासी लोकांना भाषेचे शिक्षण देण्याचे काम सुरु आहे. यासंदर्भातील कॅम्प भामरागड येथे आयोजित करण्यात येतात.

आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी हा चांगला उपक्रम आहे. असे समितीने मत व्यक्त केले. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांमधील बिंदूनामावली तपासणी करण्यात आली आहे काय ? त्याचप्रमाणे खाजगी माध्यमिक शाळांची बिंदूनामावली तपासणी करण्यात आली आहे काय अशी समितीने विचारणा केली असता शिक्षणाधिकारी यांनी विदित केले की, सन २०१२ पासून भरती प्रक्रिया बंद आहे, प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

समितीने जिल्हा परिषदेच्या ज्या इंग्रजी शाळा आहेत, त्या शाळेतील मुलांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे, लहान मुले ग्रामीण भागातून इंग्रजी माध्यमाच्या शाळेत चांगले शिक्षण घेण्यासाठी येतात. पंरतु तेथील शाळेतील शिक्षकांना इंग्रजी येत नाही. शिक्षकांना इंग्रजीचा गंध नसतो. त्यामुळे ग्रामीण भागातील आदिवासी बांधवाची मोठी फसवणूक होत आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे याकडे लक्ष दिसत नाही. संच मान्यतेचे प्रस्ताव येतात त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने इंग्रजी माध्यमांच्या शिक्षकांची भरती करण्यात येत असावी. संच मान्यता व शिक्षकांची मान्यता प्रकल्प कार्यालयाकडून मिळते. याबाबत तपासणी करुन कार्यवाही करण्यात यावी. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी दर्जेदार शिक्षकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. अशी सुचना केली असता संच

मान्यतेनुसार शिक्षक भरण्यात आले किंवा नाही याची तपासणी करण्यात येते. संच मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर केले जातात. असे शिक्षणाधिकारी यांनी विदित केले संच मान्यतेनुसार विषयवार शिक्षक आहेत किंवा नाही याची तपासणी होणे आवश्यक आहे. असे समितीने मत व्यक्त केले असता शिक्षणाधिकारी यांनी सांगितले की, संच मान्यता दिली तर शिक्षक भरतीच्या मान्यतेचे प्रस्ताव सादर केले जात नाहीत.

आदिवासी विकास विभागाकडून इंग्रजी माध्यमाच्या एका मुलाला शिक्षण देण्यासाठी संस्था चालकास ५२ ते ७२ हजार रुपये दिले जातात. या संस्थांची एका वर्षात कोटी रुपयांची कमाई होत असते. प्रकल्प कार्यालयाकडून मान्यता मिळवितांना गैरप्रकार होतो काय याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. सरकारचा हेतू चांगला असून आदिवासी विकास विभाग याकडे दुर्लक्ष करीत आहे. दर्जेदार शिक्षकांची नियुक्ती सदर संस्थेत व्हावी याकडे शिक्षणाधिकारी यांनी लक्ष देणे अतिशय आवश्यक आहे. लहान मुलांचे भविष्य घडविण्याचे काम शिक्षण संस्था करीत असतात त्यामुळे त्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे अशी समितीची अपेक्षा आहे. असे समितीने अभिप्राय दिले असता याबाबत विशेष लक्ष देण्यात येईल असे शिक्षणाधिकारी यांनी आश्वासन दिले.

शिक्षण विभागातील प्राथिमिक व माध्यमिक विभागाच्या एकूण किती शाळा आहेत, त्यापैकी किती शाळा अनुदानित, विनाअनुदानित आहेत, तसेच शिक्षकांच्या किती जागा आहेत, त्यापैकी किती जागा भरलेल्या आहेत  अशी समितीने विचारणा केली असता शिक्षणाधिकारी यांनी विदित केले की, प्राथमिक शिक्षकांची (पेसा) एकूण मंजूर पदे ४३६९ असून अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ३४४५ पदे राखीव असून भरलेली पदे ९९९ असून २४४६ पदे रिक्त आहेत. इतर प्रवर्गातून ही पदे भरण्यात आलेली आहेत. पेसा मुळे आता ही पदे अतिरिक्त ठरत आहेत. शिक्षण विभागात एकूण २९ जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत. १२ प्रकरणांसंबंधात जात पडताळणी समितीने पोच पावत्या दिलेल्या आहेत. जात पडताळणी समितीकडे ही प्रकरणे केव्हापासून प्रलंबित आहेत व या १२ जणांची नेमणूक कोणत्या तारखेला झाली आहे, विभागाने समितीला अद्ययावत अशी परिपूर्ण माहिती का दिलेली नाही अशी समितीने विचारणा केली असता  यासंबंधातील माहिती पान क्रमांक २६ वर दिलेली आहे, असे शिक्षण अधिकारी यांनी स्पष्ट केले.

यावर समितीने, यात कर्मचाऱ्यांची यादी जोडलेली नाही, असे सांगितले असता माहिती पुस्तिकेमध्ये कर्मचाऱ्यांची यादी दिलेली नाही. समितीस कर्मचाऱ्यांची यादी देण्यात येईल असे शिक्षण अधिकारी यांनी सांगितले.  सर्व कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र समितीला सादर करावे. असे समितीने निदेश दिले असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती समितीस सादर करण्यात येईल असे आश्वासित केले.

शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी माहिती दिली की, जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते आठवीमध्ये ६३,७५१ विद्यार्थी असून सन २०१७-१८ च्या संच मान्यतेनुसार प्राथमिक शिक्षकांची ३४९४ पदे मंजूर आहेत, त्यापैकी ३२९३ पदे भरलेली आहेत. उर्वरित पदे रिक्त आहेत.

जिल्हा परिषदेच्या शिक्षकांची बिंदूनामावली तपासणी पूर्ण झाली आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी सांगितले की, बिंदूनामावली प्रमाणित करुन घेण्यात आली आहे.

हेमलकसा येथे समिती गेली होती. तेथील लहान मुलांनी समितीजवळ शिक्षणाबाबत तक्रार केली होती. लहान मुलांना तेथे शिक्षणात अडचणी येत आहेत. भामरागड येथील गट विकास अधिकाऱ्यांनी याबाबत दक्षता बाळगली पाहिजे असे समितीने निर्देश दिले असता शिक्षणाधिकारी यांनी विदित केले की, तेथे केंद्र प्रमुख, गट शिक्षणाधिकारी कार्यरत आहेत. त्यांच्या माध्यमातून तेथील अडचणी सोडविण्यात येतील. भामरागड येथे शिक्षणाधिकारी यांनी किती भेटी दिल्या आहेत अशी समितीने विचारणा केली असता चार महिन्यापासून येथील पदभार घेतला असून चार महिन्यात मी भामरागड येथे दोन वेळा भेटी दिल्या आहेत असे शिक्षणाधिकारी यांनी सांगितले.

भामरागड येथील कोणत्या शाळेला भेट दिली होती. तेथील व्हीजीट बुकमध्ये नोंद केली आहे काय, त्या शाळेत काय आढळून आले आहे असा समितीने प्रश्न विचारला असता, शिक्षणाधिकारी यांनी विदित केले की, भामरागड येथील जिल्हा परिषदेच्या आदिवासी विभागाच्या केजेबी या निवासी शाळेला भेट दिली होती. शाळेची तपासणी केली होती. भाषा विषयात मुलांची कमी प्रगती आढळून आली आहे. शाळेतील मुलांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांनी जास्त लक्ष द्यावे अशा त्यांना सूचना करण्यात आल्या आहेत.

पेसा कायद्याअंतर्गत गुणवत्ता वाढीसाठी काय कार्यवाही करणे आवश्यक आहे. पेसाची नियमावली काय आहे, पेसा अंतर्गत किती शिक्षकांची भरती करण्यात आली आहे अशी समितीने विचारणा केली असता, शिक्षणाधिकारी यांनी विदित केले की, सन २०१२ पासून शासकीय नियमानुसार पेसा अंतर्गत शिक्षकांची भरती करण्यात आली आहे. पेसा अंतर्गत स्थानिक मुलांची भरती करण्यात आली आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता आता शासन स्तरावरुन भरती करण्यात येत नाही असे शिक्षणाधिकारी यांनी सांगितले.

जिल्ह्यात नियमित नियुक्ती करण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत काय प्रयत्न करण्यात येत आहेत. आंतर जिल्हा बदली करण्यात येते काय, अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, पेसा कायद्याअंतर्गत सन २०१५ पासून भरती करताना आंतरजिल्हा बदलीमुळे मागील वेळी कार्यवाही करण्यात आली आहे. आंतरबदलीसाठी १८ कर्मचारी आले

होते. त्यांना गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा हा अतिदुर्गम भाग आहे तेथे १८ शिक्षक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भामरागड व सिरोंचा या दुर्गम भागातील भरतीसाठी प्रथम प्राधान्य देण्यात येत आहे.

समितीने, पेसा अंतर्गत जागा भराव्यात असे राज्यपाल महोदयांचे आदेश आहेत, त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे असे सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यास सहमती दर्शविली.

**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग :-**

जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांची संख्या किती आहे. त्यापैकी किती योजना सुरु आहे व किती योजना बंद आहेत मागील तीन वर्षात किती योजना पूर्ण झाल्या आहेत.अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की,  एकूण २१९ पाणी पुरवठा योजना असून त्यापैकी १७ योजना बंद आहेत. राष्ट्रीय पेयजल योजनेच्या माध्यमातून ११ योजना पूर्ण केल्या आहेत. सन २०१५-१६ मध्ये ५१ योजनांचे टार्गेट होते त्यापैकी ३६ योजना पूर्ण झाल्या आहेत. सन २०१६-१७ मध्ये ३६ योजनांचे टार्गेट होते त्यापैकी २० योजना पूर्ण झाल्या आहेत. सन २०१७-१८ मध्ये १८ योजनांचे टार्गेट होते त्यापैकी ११ योजना पूर्ण झाल्या आहेत.

समितीने, सर्व योजनांची कामे पूर्ण का करता आली नाहीत. अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की,  सदर योजनांचा निधी ग्रामपंचायतीला दिला जातो. गावाच्या माध्यमातून योजनेची अंमलबाजवणी होत असते. यासाठी गावात समिती स्थापन करण्यात येते त्या समितीमध्ये सरपंच व ग्रामसेवक असतात. गावातील सदस्य त्या समितीचा सचिव असतो.

यावर समितीने ५१ योजनांना मंजुरी दिलेली आहे. त्या योजनांमध्ये गावातील लोकांचा सहभाग असतो. गावातील ५० टक्के लोक मंजुरी देत नाही. त्यामुळे योजना अपूर्ण राहत आहेत काय ? गाव हागणदारी मुक्त झाले आहे काय  अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, गाव हागणदारी मुक्त करण्यासाठी ६० टक्के निधी पहिल्या टप्प्यात देण्यात येतो. उर्वरित निधी दुसऱ्या टप्प्यात देण्यात येतो. सन २०१२ मध्ये तपासणी करण्यात आली तेव्हा शौचालयांच्या बांधकामात २५ टक्के वाढ झाली आहे. या योजनेचा निधी तीन टप्प्यात देण्यात आला आहे. त्यामुळे हागणदारी मुक्त योजना झपाट्याने राबविण्यात येत आहे. सदर योजनेवर पूर्णपणे निधी खर्च केला जात आहे.

राष्ट्रीय पेयजल योजनेचे निकष आता काय आहेत. राष्ट्रीय पेयजल योजनेचे प्रस्ताव आले आहेत काय? असे समितीने विचारले असता दिनांक ९ मार्च, २०१८ पासून ग्रामपंचायत स्तरावर,

जिल्हा परिषद स्तरावर मुख्यमंत्री पेयजल योजनेचे निविदा काढण्यात येत आहेत. राष्ट्रीय पेयजल योजनेचे ११० आराखडे राज्य शासनाकडे सादर केले आहेत. असे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले.

गडचिरोली जिल्ह्या हागणदारी मुक्त झाला आहे काय, त्याचप्रमाणे राष्ट्रीय पेयजल योजनेची सर्व कामे पूर्ण झाली आहेत काय अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सन २०१५-१६ मध्ये हागणदारी मुक्त योजनेची ४५ कामे रखडली होती. त्या योजना पुढील वर्षात पूर्ण केल्या आहेत. राष्ट्रीय पेयजल योजनेचे टार्गेट ५१,३६,१८ व ११ असे होते ते जवळपास पूर्ण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे जुन्या घरकुलांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

**आरोग्य विभाग :-**

गडचिरोली जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उप केंद्राची संख्या किती आहे, डॉक्टरांची मंजूर पदे किती असून सध्या कार्यरत किती डॉक्टर आहेत अशी समितीने विचारणा केली असता जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी विदित केले की, प्राथमिक आरोग्य केंद्र ४५ असून उप केंद्र ३७६ आहेत. वैद्यकीय अधिकारी गट "अ" संवर्गातील ८७ पदे मंजूर असून ५२ पदे भरली आहेत, तर ३५ पदे रिक्त आहेत. गट "ब" संवर्गातील ७३ पदे मंजूर असून ४८ पदे भरली आहेत, तर २५ पदे रिक्त आहेत.

समितीने, गडचिरोली जिल्ह्यात आरोग्य पथकांची संख्या किती आहे, या पथकांमार्फत किती आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे? असा प्रश्न केला असता, जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी विदित केले की, गडचिरोली जिल्ह्यात फिरत्या आरोग्य पथकांची संख्या ५४ इतकी आहे सदर पथकामार्फत आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची नियमित वैद्यकीय तपासणी करण्यात येते. प्रत्येक आश्रमशाळेला १ एएनएम संलग्न करण्यात आली आहे. ज्या गावात आश्रमशाळा आहेत तेथे उपकेंद्र आहे. आश्रमशाळेच्या जवळ असलेल्या उप केंद्रामधील एका सहायक परिचारिका मिडवाइफरी (ANM) वैद्यकीय तपासणीसाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मुलींची आश्रमशाळा असेल तर तेथे विभागाकडून आरोग्य तपासणी संदर्भात कोणती व्यवस्था करण्यात येते ? अशी समितीने विचारणा केली असता जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी विदित केले की, एक ए.एन.एम. कायमस्वरूपी आश्रमशाळेला संलग्न केलेली असते. त्यांच्याकडून महिन्याभरातील अहवाल घेण्यात येतो.

समितीने, ४५ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतींची सद्यःस्थिती काय आहे? अशी विचारणा केली असता जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी विदित केले की, सगळ्या प्राथमिक आरोग्य केंद्रांना इमारती आहेत. १ प्राथमिक आरोग्य केंद्र निर्लेखित केले आहे. निविदा प्रक्रिया होऊन कामाला सुरूवात होत आहे. आजही ४५ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असून तेथे ओपीडी सुरू असते. एकूण ओपीडी किती आहेत ? असा समितीने प्रश्न विचारला असता जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले की, दुर्गम भागामध्ये ३० ते ४० ओपीडी असते, तर ग्रामीण भागामध्ये ९० ते १०० ओपीडी असते. एकूण उप केंद्र ३७६ आहेत. यातील ४ उप केंद्रांना इमारती नाहीत. उर्वरित उप केंद्रांना इमारती आहेत. १ उप केंद्र या वर्षी इमारतीसाठी प्रस्तावित करण्यात आले आहे. राज्यस्तरावरून औषधे आली नसल्यामुळे औषधांचा पुरवठा थोडासा कमी आहे. त्यामुळे जिल्हा स्तरावरून दीड कोटी रूपयांची औषधे खरेदी केली आहेत. तीन महिना पुरेल इतका हा औषधीसाठा आहे. हा निधी विभागाने जिल्हा नियोजन समिती मधून घेतलेला आहे.

राज्य शासनाकडून निधी व औषधे मिळविण्यासाठी पाठपुरावा करीत आहोत. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले काही महिन्यांनी पावसाळा सुरू होणार आहे. तेव्हा साथीचे आजार उद्‌भवू शकतात. असे समितीने लक्ष वेधले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, सदर औषधांची खरेदी आताच केलेली आहे. अजून त्याचा पुरवठा होणे बाकी आहे. आजमितीस औषधांचा पुरेसा साठा आहे. पावसाळा गृहीत धरूनच औषध खरेदी केलेली आहे. पावसाळ्यातील तीन महिने निघून जातील एवढी औषधे खरेदी करण्यात आलेली आहेत दरम्यानच्या काळात शासनाकडे देखील निधी व औषधांसाठी पाठपुरावा करणार आहोत.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये असे किती प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत ज्या ठिकाणी जाण्यासाठी जोडरस्ता तयार करण्यात आलेला नाही अशी समितीने विचारणा केली असता जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगितले की, एका प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जाण्यासाठी रस्ता आहे, परंतु पावसाळ्यामध्ये त्या ठिकाणी जाता येत नाही.

यावर समितीने आदिवासी विकास विभागामार्फत जिल्हा परिषदेला विविध कामांसाठी निधी मिळत असतो. जर जिल्हा परिषदेच्या सक्षम अधिकाऱ्यांनी ज्या ठिकाणी रस्ता नसेल त्या ठिकाणच्या रस्त्यांची मागणी केली असती तर त्या रस्त्याचे काम झाले असते असे मत व्यक्त केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेला '३०५४' आणि '५०५४' या लेखा शीर्षकाअंतर्गत इतर जिल्हा रस्ते (ODR) आणि ग्रामीण रस्ते (VR) रस्त्यांच्या कामासाठी निधी मिळत असतो. त्यानुसार सन २०१६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने कोणत्या रस्त्याची कामे प्राधान्याने करावयाची आहेत, याची माहिती घेऊन सर्वसाधारण सभेसमोर (G.B.) समोर

सादर करावी लागते. मागील वर्षीच्या सर्व कामांना मान्यता देण्यात आलेली असून त्यामधील बरीचशी कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातील रस्त्यांची अवस्था अतिशय वाईट स्वरुपाची आहे. गडचिरोली जिल्हा अतिशय दुर्गम भागातील आहे. या जिल्ह्यामध्ये आदिवासी लोकसंख्या जास्त असल्यामुळे शासनाचा विविध योजनांच्या रुपाने निधी मिळत असतो. परंतु अशा प्रकारचा निधी मिळत असताना त्या ठिकाणी चांगल्या दर्जाची कामे होत असताना आढळुन येत नाहीत. जिल्हा परिषदेला विविध प्रकारचा निधी विशेषतः रस्त्यांच्याबाबत मिळत असतो. परंतु जिल्ह्यामध्ये निधीप्रमाणे कामे चांगल्या दर्जाची होत असल्याचे आढळुन येत नाही असे समितीने निदर्शनास आणले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, या वर्षी जिल्हा परिषदेला जे आदेश प्राप्त झालेले आहेत त्या अनुषंगाने कामे सुरु करण्यात आलेली आहे. सर्व कामांची तपासणी एस.पी.ओ. मार्फत केली जात असते.

जिल्ह्यामध्ये सहा हजार तीनशे किमी ग्रामीण रस्ते आणि जिल्हा रस्त्यांची लांबी आहे. जिल्ह्यामध्ये किती रस्त्यांचे कामे पूर्ण झालेली आहेत, किती रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आलेले आहे, त्याचप्रमाणे किती रस्त्यांची कामे अपूर्ण आहेत, या सर्वांची माहिती समितीने मागितली होती. परंतु अद्यापपर्यंत सदरहू माहिती समितीला अप्राप्त आहे असे समितीने विभागाच्या लक्षात आणून दिले असता, समितीला याबाबतची माहिती कार्यकारी अभियंता, सार्वजिनक बांधकाम विभाग हे सांगू शकतील असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये अनेक आरोग्य केंद्राच्या इमारतीची अवस्था चांगल्या प्रकारे आहे. परंतु जिल्ह्यातील आरोग्य सेवा सुरळीत सुरु नाही. गडचिरोली जिल्हा अतिशय दुर्गम असल्यामुळे त्या भागातील लोकांना आरोग्याच्या सुविधा मिळत नाही.याबाबत विभागाकडून निष्काळजीपणा करण्यात येत आहे. येथील इमारती, औषोधपचार, डॉक्टर या सर्वांवर खर्च करण्यात येत आहे, परंतु ग्रामीण भागातील लोकांना आरोग्याच्या सुविधा मिळत नाहीत. भामरागड सारख्या तालुक्याच्या ठिकाणीही आरोग्याच्या सुविधा उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे याबाबत तीव्र खेद व्यक्त करावा लागत आहे अशी समितीने नाराजी व्यक्त केली.

प्रत्येक गावामध्ये वैद्यकीय अधिकारी वास्तव्याला असतात. अनेक ठिकाणी त्यांच्यामार्फत सेवा देण्यात येत आहे. गडचिरोली हा दुर्गम भाग असुनही आरोग्याच्या सेवा बऱ्याच चांगल्या प्रमणात देण्यात येत आहे असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगितले.

प्रत्यक्षात अशा प्रकारची कारवाई झालेली दिसत नाही. जिल्ह्यातील आरोग्य सेवेचेच आरोग्य ढासळल्याचे आढळुन येत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील आरोग्याबाबत विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रावर सकाळी ०८.०० वाजता ओ.पी.डी. सुरु व्हावयास पाहिजे असते. परंतु जिल्हा परिषदेच्या ३८ प्राथमिक आरोग्य केंद्रावर अशा प्रकारची ओ.पी.डी. सुरु होत असल्याचे आढळुन येत नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशेष लक्ष दिले पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले.

**विभागीय सचिवाची साक्ष :-**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २० ते २२ एप्रिल, २०१८ रोजी गडचिरोली जिल्हयास भेट दिली होती. त्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्यावेळी समितीने, खालील बाबींवर चर्चा केली.

पेसा क्षेत्रातील ग्रामसेवकांच्या २३९ पदांचे समायोजन करण्यात आले आहे काय, तसेच पेसा क्षेत्रातील रिक्त आदिवासी पदे भरण्यात आली आहेत काय अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, गडचिरोली जिल्हयात ४५८ ग्रामपंचायती असून त्यापैकी ३६६ ग्रामपंचायत पेसा क्षेत्रात आहेत. ९२ ग्रामपंचायत पेसा क्षेत्राच्या बाहेर आहेत. ४५८ ग्रामपंचायतीमध्ये ४२५ ग्रामसेवकांची पदे मंजूर आहेत. बाकीची ग्रामविस्तार अधिकाऱ्याची पदे मंजूर आहेत. ३६६ ग्रामपंचायतीमध्ये ९९ जागी अनुसूचित जमातीचे स्थानिक उमेदवार भरलेले आहेत. २३९ पदे इतर प्रवर्गातून भरलेले आहेत. दिनांक २३ जुलै २०१८ च्या शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक वर्षी विकल्प घेऊन २० टक्के पदे भरावयाची होती. सध्या २३९ पदे रिक्त असून तेथे इतर प्रवर्गातील उमेदवार भरली आहेत. दिनांक १ मार्च २०१९ पर्यत बिंदू नामावली तपासून घेतली आहे.

सन २०१३ पासून रिक्त असलेली विस्तार अधिकारी-२ पदे, वरिष्ठ सहायक (सरळसेवा) ३ पदे, परिचर (सरळसेवा) १४ पदे, सदर पदे भरण्यात आली आहेत काय, तसेच पदे निरसित करण्याबाबत शासनाकडून केव्हा मार्गदर्शन मागविण्यात आले होते, त्याबाबत शासनाकडून कोणते आदेश प्राप्त झाले आहेत व त्यानुषंगाने जिल्हा परिषदेने काय कार्यवाही केलेली आहे अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, विस्तार अधिकारी (सां) २ पदे रिक्त होते. श्री.बारापात्रे यांची अनुसूचित जमाती प्रवर्गात नियुक्ती करण्यात आली होती. परंतु त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र अवैध ठरविल्यामुळे त्यांनी विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर केले होते. त्यामुळे अनुसूचित जमाती प्रवर्गाचा एक बिंदू रिक्त झाला होता. तसेच दिनांक २९ फेब्रुवारी, २०१५ रोजी श्री. वलादे सेवानिवृत्त झाल्यामुळे एक पद रिक्त झाले होते. असे दोन्ही मिळून अनुसूचित जमातीचे दोन पदे रिक्त आहेत. सन २०१५ पासून पद भरतीवर बंदी असल्यामुळे सदर पदे भरता आली नाहीत.

श्री. बारपात्रे हे शासन सेवेत केव्हा रुजू झाले आहेत? दिनांक १३ जून १९९५ रोजीच्या शासन निर्णयाच्या आधीन राहून संबंधित कर्मचाऱ्यांची नियुक्ती अनुसूचित जमाती प्रवर्गातून केली असेल आणि तो अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र देऊ शकला नाही तरच त्या कर्मचाऱ्याची नियुक्ती विशेष मागास प्रवर्गाला प्रदान केलेल्या २ टक्के आरक्षणामध्ये रुपांतरित करता येते. परंतु दिनांक १३ जून १९९५ नंतर शासन सेवेत नियुक्त झाला असेल तर संबंधित कर्मचाऱ्याला विशेष मागास प्रवर्गाचा लाभ देता येणार नाही असे समितीने निदर्शनास आणले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, श्री.बारपात्रे यांची सन १९९५ पूर्वी शासन सेवेत नियुक्ती झाली असल्यामुळे आणि ते अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र सादर करु न शकल्यामुळे जिल्हा परिषदेने त्यांना विशेष मागास प्रवर्गातून नियुक्ती दिलेली आहे. त्यामुळे अनुसूचित जमातीचे एक पद रिक्त झाले आहे आणि श्री.वलादे हे सन २०१५ मध्ये सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचे एक पद रिक्त झाले आहे. सद्यःस्थिती अनुसूचित जमातीचे दोन पदे रिक्त आहेत.

सदर रिक्त विस्तार अधिकारी (सां) २ पदे भरण्यात आलेली आहेत काय ? अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सन २०१९ मध्ये ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून एक पद भरलेले आहे व उर्वरित एक पद रिक्त आहे. पद भरतीवर बंदी असल्यामुळे सदर पद भरु शकलो नाही.

समितीने सद्यःस्थितीत पद भरतीवरील बंदी उठविण्यात आलेली आहे असे लक्षात आणून दिले असता फक्त आरोग्य विभागातील पदे भरण्याची परवानगी दिलेली आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

सदर पदांची जाहीरात काढण्यात आलेली आहे काय? असा समितीने प्रश्न विचारला असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, जाहीरात काढण्यात आलेली आहे परंतु भरती करण्यात आलेली नाही. दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या शासान निर्णयानुसार पद भरतीस मान्यता नाही.

भविष्यामध्ये परवानगी मिळाल्यानंतर सदर पदे तात्काळ भरण्यात यावीत अशी समितीने सुचना केली त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शविली व विदित केले की, वरिष्ठ सहाय्यक यांचे तीन पदे रिक्त आहेत. त्यापैकी दिनांक १४ ऑक्टोंबर, २०१६ रोजी एक पद रिक्त झाले. दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१६ रोजी एक पद रिक्त झाले व दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजी एक पद रिक्त झाले. असे मिळून सन २०१६ मध्ये एकूण तीन पदे रिक्त झाली होती. सदर तीन पदे अनुकंपामधून भरलेली आहेत. आता एकही पद रिक्त नाही. परिचरची १४ पदे रिक्त होती. दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ व दिनांक १९ मार्च, २०१६ अन्वये जी २५ टक्के पदे निरसित करावयाची

होती. त्याबाबत जिल्हा परिषदेने शासनाकडे मार्गदर्शन मागितले होते. त्यानंतर दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१ रोजी सर्वसाधारण सभेचा ठराव घेऊन २५ टक्के पदे कमी केलेली आहेत. त्यामुळे आता अनुसूचित जमाती प्रवर्गाचे एक पद अतिरिक्त होत आहे.

समितीने पेसा अंतर्गत प्राथमिक शिक्षकांची अनुसूचित जमातीची २४४६ रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच शिक्षण विभागातील २९ प्रलंबित जातपडताळणी प्रकरणांबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय? अशी विचारणा केली असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, अनुसूचित जमाती प्रवर्गातील शिक्षकांची २४४६ पदे रिक्त आहे.

गडचिरोली हा नक्षलग्रस्त जिल्हा आहे. त्यामुळे या जिल्ह्याची कार्यक्षमता अधिक सक्षम असेल तर अन्य परिस्थितीला तोंड देण्यास बळ मिळेल. गडचिरोली जिल्ह्यातील परिस्थिती हा राष्ट्रीय विषय आहे. तो विषय राज्याकरिता देखील अतिशय महत्त्वाचा आहे. अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी तेथील जिल्हा प्रशासन अतिशय खंबीर असले पाहिजे.

गडचिरोली जिल्ह्याचा विषय वेगळ्या पद्धतीने हाताळण्याची आवश्यकता आहे व उर्वरित महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा विषय वेगळ्या पद्धतीने हाताळला पाहिजे. पूर्वी शासन सेवेमध्ये कोणत्या अधिकाऱ्यांने दादागिरी केली तर त्यांना गडचिरोलीला पाठविण्याची धमकी दिली जात होती. परंतु आता तशी परिस्थिती नाही. कार्यक्षम अधिकाऱ्यांना गडचिरोलीला पाठवून तेथे अधिक कार्यक्षमतेने काम करुन तेथील डायव्हर्शनचा विषय मानसिकदृट्या थांबविण्यासाठी मदत करणे गरजेचे आहे. समिती सचिव महोदयांना विनंती करते की, गडचिरोलीमधील पदांचा आराखडा तयार करावा व तेथील सर्व रिक्त पदे भरण्यासाठी राज्याच्या अन्य भागातील सक्षम अधिकाऱ्यांची रोटेशनप्रमाणे नियुक्ती करण्याबाबत संबंधित सर्व विभागाच्या सचिवांनी एकत्र येऊन निर्णय घेणे आवश्यक आहे. असे केले तरच गडचिरोली जिल्ह्यातील परिस्थितीमध्ये बदल होईल. राज्यातील अन्य सक्षम अधिकाऱ्यांनी तेथे सेवा दिली पाहिजे. गडचिरोली जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील अधिकाऱ्यांची दर आठवड्याला बैठका होत आहेत की नाही, याबाबतची माहिती घेणे, लोकांमध्ये विश्वास निर्माण करुन देणे फार महत्त्वाचे आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये किती वाहतूक आहे? गडचिरोली जिल्ह्यामध्ये सकाळी गेलेली महामंडळाची बस रात्री येते. मध्यंतरीच्या वेळेमध्ये कोणतीही बस जात नाही. ही परिस्थिती बदलली पाहिजे. या जिल्ह्यामध्ये रोजगार किती आहे, हा एक महत्त्वाचा विषय आहे.

गडचिरोली जिल्ह्याचा विकास करण्यासाठी किंवा तेथील परिस्थितीमध्ये सुधारणा कशी करता येईल, याबाबत सल्ला देण्यासाठी ज्या अधिकाऱ्यांनी गडचिरोली जिल्ह्यामध्ये काम केले आहे, त्या

सर्व अधिकाऱ्यांची एक समिती घटित करावी. शक्य असेल तर त्यांना वेतन देण्यात यावे किंवा मानधन देऊन अशा अधिकाऱ्यांची समिती घटित करावी. तेथील जनतेला नक्की कशाची गरज आहे, या बाबींचा शोध घेऊन त्याची पूर्तता केली पाहिजे. तरच प्रशासकीय यंत्रणेचा उपयोग होईल. तेथील लोकांच्या अडचणी दूर झाल्या पाहिजे. याबाबत विभाग काय करु शकतो? गडचिरोली जिल्ह्यातील विषयांवर धोरणात्मक निर्णय घेणे हे एक प्रकारे आव्हान आहे असे समितीने मत व्यक्त केले असता सचिवांनी विदित केले की, नक्षलग्रस्त भागातील तरुणांना स्थानिक पातळीवर नोकऱ्या देऊन तेथे सुधाराणा घडवून आणण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने प्रयत्न केले होते. सामान्य प्रशासन विभागाने याबाबत काही धोरण देखील निश्चित केलेले आहे. जसे की, गडचिरोली किंवा अशा नक्षलग्रस्त भागामध्ये जे नियुक्ती घेतात त्यांसाठी काही सवलती देण्यात आलेल्या आहेत. नक्षलग्रत भागामध्ये नोकरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना अशा प्रकारच्या सवलती देण्याचा सामान्य प्रशासन विभागाने प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे अधिकारी नक्षलग्रस्त भागामध्ये नोकरी करण्यास आता पूर्वी सारखा विरोध करीत नाहीत.

समितीने, नक्षलग्रस्त भागामध्ये नोकरी करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना एक वेतनवाढ देण्याबाबतचा विषय मांडण्यात आला होता. याबाबत निर्णय झालेला आहे काय ? अशी विचारणा केली असता सचिवांनी सांगितले की, नक्षलग्रस्त भागामध्ये नोकरी करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना एक वेतनवाढ देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे आणि उक्त निर्णयाची अंमलबजावणी देखील करण्यात आलेली आहे.

या समितीच्या माध्यमातून शासनाने नक्षलग्रस्त भागामध्ये रोजगार निर्माण करण्यासाठी एक धोरणात्मक निर्णय घ्यावा, असे समितीला वाटत आहे. यासाठी विभागास काय करता येईल? तेथील तरुणांना काहीच काम नाही म्हणून ते नक्षलवादी संघटनांकडे आकर्षित होत आहेत. आदिवासी समाजातील मुलं मुख्य प्रवाहामध्ये येण्यासाठी शासन नक्की काय प्रयत्न करीत आहे? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ४०-४५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयांच्या माणसांचा विचार करण्यापेक्षा कमी वयाच्या मुलांचा विचार केला तरच तेथे सुधारणा घडवून आणू शकतो. शासनास याबाबतचा विचार दूर दृष्टीने करावा लागेत. हा खूप मोठा प्रवास आहे. या कामासाठी एखाद्या अधिकाऱ्यांने पुढाकार घेऊन अतिशय हुशारीने आणि विचार करुन काम करणे गरजेचे आहे. गडचिरोली भागातील परिस्थितीबाबत राज्याच्या मुख्य सचिवांनी दर तीन महिन्यांनी एकदा आढावा बैठक घ्यावी, अशा प्रकारे दर तीन महिन्याला आढावा बैठक घेतली तर तेथील कामांना गती प्राप्त होईल व अधिकाऱ्यांना बळ मिळेल. गडचिरोली भागामध्ये प्रशासकीय अधिकारी खंबीरपणे काम करीत असल्यामुळे बऱ्याच गोष्टी थांबलेल्या आहेत. नक्षलग्रस्त भागातील गावांना पोलीस संरक्षण देऊन फायदा नाही. त्या गावातील लोकांनाच तेवढे कार्यक्षम बनविणे गरजेचे आहे. तर खऱ्या

अर्थाने गावाची सुरक्षा होईल. नक्षलग्रस्त भागामध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असतील आणि पदे भरण्यास शासनाची मान्यता नसेल तर आवश्यक त्या ठिकाणी अन्य ठिकाणच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करावी. नक्षलग्रस्त भागामध्ये स्थानिक नागरिकांना संधी द्यावी. त्यांच्याकडे जातीचे दाखले राहत नाहीत. त्यामुळे काहीजण असत्य स्वरुपाचे दाखला देऊन नोकरी मिळवितात. आताच अधिकाऱ्यांने सांगितले की, अनुसूचित जमातीचा दाखले देऊ न शकल्यामुळे त्यांनी विशेष मागास प्रवर्गाचा दाखला दिला आहे. असे प्रकार झाले तरी काही वेळा विभागाने नियमानुसार नियमित करुन घ्यावे. कारण त्या ठिकाणी काम करण्यास कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे अशा समितीने सुचना केल्या व नक्षलग्रस्त भागातील तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, कृषी सहाय्यक व अंगणवाडी सेविका यांची पदे रिक्त राहू नयेत, असे समितीने निर्देश दिले.

समितीने शिक्षकांची २४४६ पदे रिक्त आहेत काय? अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, पेसा अंतर्गत २४४६ पदे रिक्त होती. पेसा अंतर्गत स्थानिक अनुसूचित जमातीचे पात्र उमेदवार मिळत नसल्यामुळे शासनाने इतर प्रवर्गातून सदर २४४६ पदे भरलेली आहेत. सदर पदे पवित्र पोर्टलद्वारे भरली जातात. राज्यातील सर्व शिक्षकांची पदे पवित्र पोर्टलद्वारे भरली जात असल्यामुळे याबाबत विभाग काहीही करु शकत नाही.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असतील तर तेथील अधिकाऱ्यांनी काम कसे करावे? असा समितीने प्रश्न विचारला असता अतिरिक्त सचिवांनी विदित केले की, शिक्षक पद भरतीसंदर्भात पालघर येथे एक महिन्यांपासून ७०० ते ८०० शिक्षक उपोषण करीत आहेत. आजच्या बैठकीसाठी शिक्षण विभागाचे कोणतेही अधिकारी उपस्थित नाहीत. शिक्षण विभागाने शिक्षक पद भरतीसाठी सेंट्रल पवित्र पोर्टल तयार केले आहे. या पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती केली जात आहे. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षकांची पद भरती केल्यामुळे फक्त ६० शिक्षक मिळालेले आहेत.

पेसा क्षेत्रातील शिक्षक, ग्रामसेवक, तलाठी, अशा प्रकारच्या १० संवर्गातील पदे फक्त स्थानिक अनुसूचित जमातीमधूनच भरण्यात यावीत, असे सन २०१५ मध्ये अध्यादेश काढून राज्यपाल महोदयांनी सूचना दिलेल्या आहेत. दुसरा भाग असा आहे की, शिक्षण विभागाने दिनांक २३ सप्टेंबर रोजी एक शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्यामुळे राज्यपाल महोदयांनी पेसा क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातींना दिलेल्या आरक्षणाचे काय, हा एक प्रश्न आहे. शिक्षक पद भरतीचा अधिकार जिल्हा परिषदेचा आहे. राज्यपाल महोदयांच्या अध्यादेशाप्रमाणे पेसा क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातींच्या उमेदवारांची नियुक्ती करावयाची असेल तर मुख्य कार्यकारी अधिकारी हे त्यांच्या स्तरावर स्थानिक उमेदवारांची परीक्षा व मुलाखत घेऊन शिक्षकांची नियुक्ती करु शकतात. पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या पद भरतीसाठी म्हणजे त्यांना सेंट्रल पोर्टलची पेसा क्षेत्रापुरती गरज नाही असे शिक्षण विभागाला सांगितले आहे. पालघरला ७००-८०० मुले पात्र आहेत, ते स्थानिक असून

आदिवासी समाजाचेही आहेत. या मुलांनी पवित्र पोर्टलवर परीक्षा दिली असता यातील ५-७ मुलेच उत्तीर्ण झालेली आहेत. गडचिरोली येथे पवित्र पोर्टलद्वारे हे उमेदवार भरण्याचा प्रयत्न केला तेव्हा अनुसूचित जमातीचे फक्त ६३ उमेदवार स्थानिकचे मिळाले. त्या जिल्हयामध्ये पात्र मुले असतील तर विभागाने जिल्हा स्तरावर भरतीद्वारे घ्यावेत.

स्थानिक उमेदवार पाहिजे हा धोरणात्मक निर्णय झालेला आहेत. त्या उमेदवारांना वर्षभर प्रशिक्षण देऊन त्यांना शिकविण्यास तयार करणे हे काम प्रथम केले पाहिजे अशी समितीने सुचना केली.

अतिरिक्त सचिव यांनी सांगितले की, आदिवासींची परिस्थिती तशी आता राहिली नाही, आता पात्र उमेदवार खूप आहेत. त्यांनी डीएड, बीएड, पात्रता परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे, स्थानिक असून अनुसूचित जमातीचे आहेत. त्याच जिल्हयात त्यांना नोकरी द्यायची आहे. त्याकरीता विभागाने पुढाकार घ्यावा लागेल. प्रकल्प कार्यालयामार्फत सुशिक्षित तरुणांचे प्रशिक्षण घेऊन हे करण्यात यावे असे समितीने निर्देश दिले.

आश्रमशाळेचे शिक्षक शक्यतो त्या त्या जिल्हयातूनच भरले जातात. आश्रमशाळेतील भरती केंद्रीकृत पध्दतीने होत नाही असे अतिरिक्त सचिव यांनी सांगितले.

यावर आयुक्त, टी.आर.टी.आय. यांनी सांगितले की, आदिवासी विकास विभागाकडून अनुसूचित जमातीच्या शिक्षकांना टीईटी पात्रता परीक्षेचे ६ महिन्याचे विशेष प्रशिक्षण देणे, टॅबलेट, पुस्तके देण्याबाबत विभागाने आदेश काढलेले आहेत. शिक्षण विभागाचे म्हणणे आहे की, सर्व शिक्षकांची केंद्रीकृत पध्दतीने भरती केली जावी.

त्याकरीता विभागास जिल्हे निवडावे लागतील. याकरीता विभागाने मुख्य सचिवांशी बोलावे, कारण आदिवासी समाजाची मुले, सर्व मुलांमध्ये मिक्स होऊ शकत नाहीत. राज्यपाल महोदयांनी स्थानिक उमेदवारांसाठी बरोबर निदेश दिलेले आहे. विषय शिक्षण विभागाचा आहे, त्यांनी हा प्रश्न सोडविला पाहिजे. अर्थसंकल्पातील तरतूदीचा वापर करून त्या मुलांना पुढे कसे आणता येईल हा विषय आहे.

पवित्र पोर्टलमध्ये येणाऱ्या अडचणीबाबत विभागाने नोंद घ्यावी. आदिवासी सल्लागार परिषदेची बैठक तात्काळ आयोजित करण्याबाबत विभागाने निर्देश द्यावेत अशा सुचना समितीने सचिव आदिवासी विकास विभाग यांना केली. यावर सचिवांनी सांगितले की, याबाबत समितीकडून शिफारस आली तर विभागास शिक्षण विभागाला पाठवता येईल.

गडचिरोलीला उमेदवार मिळत नाहीत, येथे उमेदवार उपलब्ध असून त्यांना संधी दिली जात नाही. बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये शिक्षकांची शिकविण्याची चांगली पध्दत असते. बिगर आदिवासी क्षेत्रामधील शिक्षकाने आदिवासी क्षेत्रामध्ये एक वर्ष शिक्षणाचे काम केल्यास आदिवासीमध्ये

शिकविण्याची पध्दत निर्माण होईल असे समितीने मत व्यक्त केले. यावर सचिवांनी सांगितले की, माननीय राज्यपालांचे निर्देश आहेत की, आदिवासी भागात स्थानिक आदिवासी उमेदवारास नोकरीत घेण्यात यावे. समितीने तशी शिफारस संबंधित विभागास करावी.

यावर अतिरिक्त सचिवांनी विनंती केली की, सार्वजनिक आरोग्य विभागाप्रमाणे पेसा क्षेत्राबाबतच्या दिनांक ४ मे, च्या जीआरमधून पदे भरण्याची सुट मिळण्याची देखील समितीने शिफारस करावी. शालेय शिक्षण विभाग व आदिवासी विकास विभागाने पदे भरण्याबाबत समन्वय साधावा. तसेच धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी तात्काळ जनजाती सल्लागार परिषदेचे आयोजन करण्यात यावे अशी शिफारस देखील करण्यात यावी असे समितीने सुचविले. स्थानिक आदिवासींची भरती करण्याबाबत राज्यपाल महोदयांचे निर्देश आधिच आहेत, आता त्यातून आदिवासींकरीता भरतीबाबत पवित्र पोर्टल हटवावे अशी सुचना करावी.

समितीने, २९ जात पडताळणी प्रकरणाबाबत निर्णय घेण्यात आला आहे का अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, २९ पैकी ४ उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. ९ उमेदवारांचे पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. २ उमेदवार मयत झालेले आहेत. १४ उमेदवारांना अधिसंख्य करण्याबाबत ठरविले होते पण यातील ३ उमेदवारांना न्यायालयाने संरक्षण दिलेले आहे.

पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेल्या ९ उमेदवारांची सद्यस्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता सह आयुक्त, जात पडताळणी समिती यांनी सांगितले की, एकूण ३१ प्रकरणे प्रलंबित होते, ही सर्व प्रकरणे निकाली काढलेली आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, प्रलंबित प्रकरणांची नावे सांगतो. श्री. मधुकर मडावी, श्री.वामन कुमरे, श्री.सुभाष कुरसंगे, श्री.साधू सडमेख, श्री.भुजंगराव उइके, श्री.मोतीराम रायसिडाम, श्री.अरुण सोयाम, श्रीमती मंदा पुल्लेवार, श्री.येन्नू, श्री.सत्यनारायण यांची जात वैधता प्रकरणे पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत, त्यांना नोटीस दिलेल्या आहेत.

सह आयुक्त, जात पडताळणी समिती यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेच्या १३ प्रकरणांपैकी ८ वैध ठरलेली आहेत. ५ अवैध आहेत. एकूण ही १३ प्रकरणे निकाली काढलेली आहेत. यावर आयुक्त, टी.आर.टी.आय. यांनी सांगिले की, नियुक्त उमेदवार मुळ कोणत्या जिल्हयातील आहे त्याप्रमाणे तेथील पडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्राबाबत प्रस्ताव पाठविला जातो व ती समिती निर्णय घेते. सह आयुक्त जातपडताळणी समिती गडचिरोली जिल्हयापुरते बोलत आहेत, त्यामुळे आकडा मॅच होणार नाही.

विभागाने सांगितलेली संख्या ही गडचिरोली जिल्हयातील प्राथमिक शाळेत कार्यरत शिक्षकाची आहे. ते वेगवेगळया जिल्हयाचे रहिवासी आहेत असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

सह आयुक्त जातपडताळणी समिती यांनी सांगावे की, औरंगाबाद, नागपूर, अमरावतीची पडताळणी समितीसमोरील प्रकरणे आहेत का, आयुक्त समितीला माहिती देण्याकरीता येतात तेव्हा ही माहिती तपासून येत नाही का ? अशी समितीने विचारणा केली असता, गडचिरोली व नागपूर येथील पेंडसी शुन्य आहे असे सह आयुक्त जातपडताळणी समिती यांनी सांगितले.

समितीने एक महिन्याच्या आत प्रलंबित प्रकरणी निर्णयाची माहिती समितीला देण्यात यावी असे निर्देश दिले. १२ प्रकरणात जात पडताळणी समितीने पोचपावती दिलेल्या प्रकरणांची सद्यस्थिती काय आहे, सदर शिक्षक सेवेत आहेत का? अशी समितीने विचारणा केली असता, अतिरिक्त सचिव यांनी विदित केले की, याबाबत याआधिच माहिती दिलेली आहे की, १२ पैकी ८ प्रकरणे वैध ठरलेली आहेत. यापुढे उमेदवाराची जात पडताळणी झालेली नसेल तर नियुक्ती देण्यात येऊ नये. नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत जात पडताळणी करुन घ्यावी असा नियम, शासन निर्णय आहे. सन २०१७ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने जर अनुसूचित जमातीच्या उमेदवाराची नियुक्ती करायची असेल तर नेमणूक आदेशात लिहिले जाते की, सहा महिन्यात आत जात पडताळणी करावी असे समितीने निदर्शनास आणले असता आयुक्त, टी.आर.टी.आय. यांनी विदित केले की, एमपीएससीमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय उमेदवारास नियुक्ती दिली जात नाही.

जात वैधता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया वेगळी आहे. १२ वी विज्ञान शाखेमध्ये विद्यार्थी असेल तर त्याला जात वैधता प्रमाणपत्र मिळते. कोणीही येऊन वैधता प्रमाणपत्र मिळवावे अशी ती प्रक्रिया नाही. सर्वांना जात वैधता प्रमाणपत्र द्यायचे असेल तर दिनांक २३ मे २००२ रोजी जो कायदा अस्तित्वात आला आहे त्यात सुधारणा करावी लागेल. विज्ञान शाखेव्यतिरिक्त विद्यार्थ्यांकडे वैधता प्रमाणपत्र नाही. त्यामुळे याबाबत उचित निर्णय घ्यावा, असे समितीने मत व्यक्त केले.

जिल्हा परिषदेने रिक्त पदे भरण्याची पूर्ण प्रक्रिया करावी असे समितीने निर्देश दिले असता त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शविली.

जिल्हयात सॅम व मॅम गटातील बालकाचे प्रमाण कमी करण्यासाठी महिला व बालकल्याण विभाग व आरोग्य विभागामध्ये आदिवासी विकास विभागाकडून समन्वय साधावा. या विषयी जिल्हा परिषदेकडून धोरणात्मक निर्णय घेण्यात येणे आवश्यक आहे असे समितीने मत व्यक्त केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, अंगणवाडी ९३५१८ मुले मुली आहेत. त्यात सॅमचे प्रमाण १००७ आहे, मॅमचे प्रमाणे ५९२३ आहे. सिव्हीएर अंडरवेटचे ४३०० बालके आहेत.

सॅम व मॅमची तपासणी अंगणवाडी सेविका व आशा वर्कर करतात. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे झाला होता त्यात सॅम व मॅमचे वजन घेण्याची १६ पॉईंट मेथॉडॉलॉजी आहे. याबाबत विभाग संबंधित सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. त्यानंतर ९३ हजार बालकांची आरोग्य विभाग व आयसीडीएसमार्फत पुन्हा तपासणी करण्यात आली आहे. त्यानंतर सॅम आणि मॅमचे अचूक आकडेवारी समोर आलेली आहे.

१५ व्या वित्त आयोगातील ८० टक्के निधी ग्रामपंचायतींना दिला जातो. त्यापैकी ग्रामपंचायतीने आरोग्य व शिक्षणावर २५ टक्के निधी खर्च करावयाचा आहे. या २५ टक्के निधीच्यामाध्यमातून सॅम, मॅम व सिव्हीएर अंडरवेटच्या मुलांना आवश्यक विटामिन, आर्यन, कॅल्शियम, प्रोटीन या सर्वांचे बॅलेन्सकरुन एक आहार तयार करुन तो शिजवून एका आठवड्यात सहा वेळा दिला जात आहे. ग्रामसेवकांनी कडधान्य खरेदी करुन ते अंगणवाडी सेविकांकडे द्यावयाचे आहे. यासाठी जिल्हा परिषदेने नवीन स्पेशल अकाउंट ओपन केलेले आहे. ग्रामसेवकांच्या माध्यामतून या अकाउंटमध्ये भाजी-पाल्यांसाठी पैसे ट्रान्सफर केले जातात. सॅम, मॅम व सिव्हीएर अंडरवेटच्या मुलांना अशा प्रकारचा आहार दिला जात आहे.

सॅम, मॅम व सिव्हीएर अंडरवेटच्या मुलांना एनर्जी डेन्स न्युट्रीशियस फूड (EDNF) देत आहोत. एका दिवसामध्ये दोन ते तीन वेळा हे फूड घ्यावयाचे आहे. परंतु सदर मुलं एनर्जी डेन्स न्युट्रीशियस फूडचे सेवन करीत नाहीत. त्यामुळे हा विशेष आहार तयार केलेला आहे. हाच आहार जवळपास ९८ टक्के अंगणवाडी केंद्रामध्ये दिला जात आहे. ज्या अंगणवाडी केंद्रांमध्ये गॅस सिलेंडर नव्हते त्या अंगणवाडी केंद्राला गॅस सिलेंडर उपलब्ध करुन दिलेला आहे.

सॅम व मॅम बालकांना आरोग्य कार्ड देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण या मुलांना रक्ताची खूप आवश्यकता असते. त्यामुळे महिला बाल विकास व जिल्हा परिषद या दोन विभागांच्या माध्यमातून अशा मुलांना आरोग्य कार्ड देण्याबाबतचा निर्णय घेणे आवश्यक आहे आणि तो दोन्ही विभागाने निर्णय घ्यावा, अशी समितीने सुचना केली.

सर्व सॅम व मॅमच्या बालकांची स्क्रीनिंग करुन त्यांना अन्य कोणता आजार आहे काय, याबाबतची तपासणी करीत आहोत. सदर तपासणीची कार्यवाही माहे नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. ज्या सॅम किंवा मॅम बालकांना अन्य आजार असेल अशा मुलांना वेगळ्या रंगाचे कार्ड देऊन त्यांना पुढील उपचारासाठी योग्य त्या रुग्णांलयामध्ये भरती करण्याचे विभागाचे नियोजन आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

समितीने सॅम व मॅम बालकांना जेव्हा रक्ताची आवश्यकता असते तेव्हा त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे त्यांना आरोग्य कार्ड देणे अत्यंत आवश्यक आहे

असे समितीने निर्देश दिले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यास सहमी दर्शविली व १०० टक्के सर्व सॅम व मॅम बलकांना आरोग्य कार्ड देण्यात येईल असे आश्वासन दिले.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये थॅलेसेमियाचे रुग्ण आहेत काय? सदर रुग्णांची संख्या किती आहे? अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, थॅलेसेमियाचे रुग्ण आहेत.आकडेवारीची माहिती आता उपलब्ध नाही. त्यामुळे सदर माहिती समितीला सादर करण्यात येईल.

समितीने सदर आहार अंगणवाडीच्या माध्यमातून केव्हापासून दिला जात आहे अशी विचारणा केली असता सदर आहार दीड ते दोन महिन्यांपासून दिला जात आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

सदर आहारामुळे किती टक्के मुल सिव्हीएरमधून मिडियममध्ये आली आहेत असा समितीने प्रश्न विचारला असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, पुढील दिनांक २० डिसेंबर रोजी आरोग्य विभाग व आयसीडीएस विभागामार्फत सर्व बालकांच्या आरोग्याची तपासणी करण्यात येणार आहे. त्यानंतर याबाबतची माहिती देता येईल.

एक निष्कर्ष असा आहे की, हे सॅम आणि मॅम बालके आहेत ते फक्त न्युट्रीशियस कमी आहेत म्हणून सॅम किंवा मॅम होत नाहीत. बहुतांश वेळी त्यांच्या पालकांपैकी एकजण मतीमंद किंवा अन्य आजाराचे असते. अशा प्रकारची ५० टक्के तरी प्रकरणे असतात. अशा बालकांचे व पाल्यांचे विभागाने कौन्सिलींग केलेले आहे काय? अशी समितीने पुच्छा केली असता, आरबीएसके टीममार्फत सॅम व मॅम बालकांचे स्क्रीनिंग करीत आहोत. या स्क्रीनिंगमध्ये कोणत्या सॅम किंवा मॅम बालकांना जेनेटिक आजार असल्याचे आढळून आल्यानंतर त्यांचे कौन्सिलींग करुन त्यांना पुढील उपचार देण्यात येणार आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

अशा मुलांना अंगणवाडी केंद्रांमध्ये किंवा त्यांच्या घरी एनर्जी डेन्स न्युट्रीशियस फूड (EDNF) देण्यापेक्षा एका ठराविक कालावधीमध्ये या मुलांचे कॅम्प घेऊन त्या कॅम्पमध्ये सदर आहार दिले तर अधिक फायदा होईल. कारण १५ ते २० वर्षांपूर्वी महाराष्ट्रामध्ये आरोग्य विभागाच्या माध्यमातून राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य आणि पोषण मिशनने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्तरावर चाईल्ड हेल्थ सेंटर उभारले होते. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या सर्व बालकांना या चाईल्ड हेल्थ सेंटरमध्ये भरती करुन त्यांच्या उपचारासाठी ते आठ दिवसांचा कॅम्प घेत होते. या कॅम्पच्या माध्यातून संबंधित बालकांच्या आई-वडिलांना बोलावून त्यांचे कौन्सिलींग केले जात होते. अशा प्रकारचा विभागाने एक कार्यक्रम केला तर ते अधिक प्रभावी ठरेल, अशी समितीची सुचना आहे.

सीटीसी आणि एनआरसीच्या माध्यामातून सदर काम केले जात आहे. अतिशय कमी वजनाच्या मुलांना बोलावून त्यांना १४ दिवस तेथेच ठेवले जात आहे. या १४ दिवसांमध्ये वजनामध्ये १५ टक्के वाढ झाल्यानंतर संबंधित बालकाला डिस्चार्ज दिला जात आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले.

जिल्हा परिषद, गडचिरोली बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित आहेत काय? आदिवासी विभाग व जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्हा परिषदेला निधी दिला जातो. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्राप्त झालेला निधी त्याच वर्षामध्ये खर्च झाला नाही तर दुसऱ्या वर्षामध्ये खर्च केला जातो. या निधीवर मिळणाऱ्या व्याजाची रक्कम जिल्हा परिषद कोठे खर्च करीत आहे अशी समितीने विचारणा केली असता, सदर निधी सेसमध्ये घेतला जातो असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सांगितले.

याचा अर्थ आदिवासी विभागामार्फत प्राप्त झालेल्या निधीचा वापर अन्य कोणत्याही कामासाठी केला जात आहे. सेस फंडातील रक्कम कोठेही वापरता येते. आदिवासी विभागामार्फत प्राप्त झालेल्या निधीतून आदिवासींच्या कामासाठीच खर्च करणे आवश्यक आहे असे समितीने निदर्शनास आणले असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, दिनांक १० जून, २००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार एखाद्या निधी दोन-तीन महिने वापराविना पडून राहत असेल तर तो निधी एफडीमध्ये ठेवून त्यातून मिळणाऱ्या व्याजाची रक्कम ही जिल्हा विकासासाठी वापरता येते.

सदर शासन निर्णयामध्ये असे नमूद केले आहे काय? सदर शासन निर्णयाची एक प्रत समितीला सादर करण्यात यावी. सदर शासन निर्णयामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. कारण आदिवासी विभागामार्फत प्राप्त झालेल्या निधीवरील व्याजाची रक्कम सॅम, मॅम किंवा आदिवासी लोकांच्या आरोग्यांसाठी वापरणे आवश्यक आहे. सदर निधीवर कोट्यवधी रुपये व्याज प्राप्त होत आहे. सदर व्याजाची रक्कम आदिवासी विद्यार्थ्यांवर खर्च केला तर आदिवासी मुले मुख्य प्रवाहात येतील, अशी समितीने सुचना केली.

**अभिप्राय व शिफारशी :-**

(१) गडचिरोली जिल्हा परिषदेतील पेसा अंतर्गत शिक्षकांची २४४६ रिक्त पदे ही पेसा अंतर्गत स्थानिक अनुसूचित जमातीचे पात्र उमेदवार मिळत नसल्यामुळे शासनाने ही पदे इतर प्रवर्गातून भरलेली आहेत. परंतू पेसा क्षेत्रातील शिक्षक, ग्रामसेवक, तलाठी अशा प्रकारच्या १७ संवर्गातील रिक्त पदे फक्त स्थानिक अनुसूचित जमातीमधूनच भरावी असे मा. राज्यपाल यांचे अधिसूचनेद्वारे निदेश आहेत. **त्यामुळे सदर पदे ही स्थानिक अनुसूचित जमातीमधून**

**भरणे आवश्यक होती. राज्यातील सर्व शिक्षकांची पदे ही पवित्र पोर्टलद्वारे भरली जात असल्यामुळे गडचिरोली येथे पवित्र पोर्टलद्वारे स्थानिक अनुसूचित जमातीची फक्त ६३ उमेदवार मिळाली अशी ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी साक्षीच्या वेळेस माहिती दिली. आदिवासी बहूल जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील शिक्षकांची मोठया प्रमाणात असलेली रिक्त पदे भरण्याकरिता या जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील शिक्षकांची भरती ही शालेय शिक्षण विकास विभागाने सेंट्रल पवित्र पोर्टलच्या माध्यमातून न घेता जिल्हा पातळीवर घ्यावी जेणे करुन रिक्त पदाच्या प्रमाणात स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवार पात्र होतील. याबाबत शासनाने आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल हा समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) गडचिरोली जिल्हा हा नक्षलग्रस्त, अतिदुर्गम व विकासाच्या दृष्टीने मागास जिल्हा असल्यामुळे जिल्ह्याच्या विकासासाठी राज्य शासनाकडून मोठया प्रमाणात निधी मिळत असतो परंतू त्या निधीच्या प्रमाणात जिल्हात विकास कामे होत नाही. गडचिरोली जिल्हा दौऱ्याच्या वेळेस समितीला जिल्ह्यातील ५० टक्के रस्त्यांचे डांबरीकरण न झालेली व जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची दूरवस्था असल्याचे निदर्शनास आले. तसेच ६७ गावांमधील रस्ते खराब असल्यामुळे तेथे बससेवा उपलब्ध होऊ शकल्या नाही, अशी माहिती दौऱ्याच्या वेळेस एस. टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिली. जिल्ह्यातील रस्त्यांची कामे व त्यांची देखभालीच्या कामांकडे जिल्हापरिषदेच्या बांधकाम विभागाचे मोठया प्रमाणात दुर्लक्ष झाल्याचे निदर्शनास आले. **त्यामुळे यास जबाबदार संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच मागील ५ वर्षातील या रस्त्यांचे काम पुर्ण न करणारे कंत्राटदार यांना काळया यादीत टाकण्यात यावे व जिल्ह्यातील रस्त्यांचे डांबरीकरण व ग्रामीण भागातील रस्त्याची कामे पूर्ण होण्याबाबत आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(३) गडचिरोली जिल्ह्यात ४५ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३८६ उप केंद्र आहेत. गट अ वर्गातील वैदयकिय अधिकारी यांची ८७ पदांपैकी ३५ पदे रिक्त आहेत, तसेच गट-ब संवर्गातील ६३ पदापैकी २५ पदे रिक्त आहेत. ४ उप केंद्रांना इमारती नाहीत जिल्ह्यातील दुर्गम अतिदुर्गम भागामधील प्राथमिक आरोग्य केंद्रांत व उप केंद्रात ही पदे रिक्त असल्याने तेथील आदिवासी जनतेला आरोग्य सेवा वेळेवर मिळण्यास अडचणी येत आहेत. **त्यामुळे वैदयकीय अधिकाऱ्यांची व इतर रिक्त पदे तातडीने भरुन ज्या उप केंद्राच्या इमारती नाहीत त्यांना त्या ठिकाणी**

**इमारती बांधण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्यात यावा व दुर्गम व अतिदुर्गम भागात प्रभावीपणे आरोग्य सेवा पुरविण्यात यावी. याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(४) गडचिरोली जिल्हापरिषदेतील सामान्य प्रशासन विभाग, पंचायत विभाग, शिक्षण विभाग, बांधकाम विभाग व आरोग्य विभाग या विविध विभागातील कर्मचाऱ्यांची जात पडताळणी प्रामणपत्रांची प्रकरणे विविध जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत सदर प्रकरणे तातडीने निकाली काढण्याकरिता जिल्हा परिषदेने योग्य तो पाठपुरावा करावा. **ज्या कर्मचाऱ्यांची प्रकरणे अवैध झाली किवा ज्या कर्मचाऱ्यांनी बऱ्याच वर्षापासून जात पडताळणी प्रमाणपत्र दिली नाहीत त्यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार त्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात यावे व त्या पदांचा बिंदू रिक्त करुन अनुसूचित जमातीच्या जात वैधता प्राप्त उमेदवारांची तातडीने नियुक्ती करण्याबाबत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(५) तीव्र व मध्यम कुपोषित बालकांना उपचारासाठी नेहमी रूग्णालयात जावे लागत असते, उपचार घेत असतांना बालकांना व त्यांच्या पालकांना अडचणी येत असल्याने या अडचणी दूर करण्याकरिता समितीने दौऱ्यावर असताना महिला व बालविकास विभाग व जिल्हा परिषद या दोन विभागाच्या माध्यमातून सॅम व मॅम बालकांना तातडीने उपचार मिळण्याकरिता आरोग्य कार्ड देण्यासंदर्भात शिफारस केली होती. **त्यानुषगाने सॅम व मॅम बालकांना आरोग्य कार्ड देण्यासंदर्भात उचित कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोली, अहेरी व भामरागड

गडचिरोली जिल्ह्यामध्ये आदिवासी जंगल कामगार संस्था आहे. मागच्या वर्षी ७ मुले असल्यामुळे त्यांची तुकडी, मान्यता काढून घेण्यात आलेली आहे. मुली शिकल्या पाहिजेत असे शासनाचे धोरण असताना तुकडीची मान्यता काढून घेण्यात येत आहे. मुलींमध्ये शिक्षणाची गोडी वाढण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. असे असताना कोणत्याही शाळेविरूद्ध, शिक्षण संस्थेविरूद्ध अन्यायकारक भूमिका घेता कामा नये. संबंधित संस्थेची मान्यता रद्द करण्यात आली असेल तर ती देण्यासंबंधा तातडीने कार्यवाही करावी. महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजने अंतर्गत सन २०१५-१६, सन २०१६-१७ मधील पुरस्कार जाहीर होणे बाकी आहे. सदर पुरस्कार देण्यासंबंधी शासनाने तातडीने पुढाकार घ्यावा अशी समिती शिफारस करीत आहे. तसेच, स्थानिक लोकांना एस.टी.बससेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने लक्ष घालावे. भामरागड येथे एकच राष्ट्रीयकृत बँक आहे. तेथे जास्तीत जास्त राष्ट्रीयकृत बँका झाल्या पाहिजेत. गडचिरोली जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्तरावर किमान दोन ते तीन राष्ट्रीयकृत बँकांची स्थापना झाली पाहिजे. असे केले तरच डिजिटललायझेशन होईल. तेव्हा त्या दृष्टीने प्रशासनाने पुढाकार घ्यावा. येथे मोबाईलचे नेटवर्क देखील मिळत नाही. तेव्हा विभागाने बीएसएनएलशी संपर्क साधून मोबाईल टॉवर्स कसे उभे राहतील या साठी पुढाकार घ्यावा. राजस्व अभियानांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरू आहे. गडचिरोली जिल्हा हा नक्षलग्रस्त आहे. या जिल्ह्यात अतिशय दुर्गम भागात आदिवासी राहतात. या प्रमाणपत्रासाठी रूपये ५० इतके शुल्क द्यावे लागते. ते शुल्क आदिवासींसाठी माफ करावे अशी शिफारस समिती राज्य शासनाला करेल. जे इयत्ता ९ वी, १० वी मधील विद्यार्थी आहेत ते भविष्यात अकरावी मध्ये प्रवेश घेणार आहेत हे गृहित घेऊन त्यांना जात वैधता प्रमाणपत्र दिले पाहिजे. जे आदिवासी विद्यार्थी आश्रमशाळेमध्ये राहतात त्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी अपर आयुक्त, आदिवासी यांनी पुढाकार घ्यावा. यासाठी त्यांनी विशेष मोहीम हाती घेतली पाहिजे असे समितीने निर्देश दिले.

श्री. शंकर सिताराम कोरवटवार, सहायक लेखाधिकारी, पंचायत समिती धानोरा यांची सखोल चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा. अनुसूचित जमाती कल्याण समितीने जवळ जवळ १३ ते १७ विभागांचा आढावा घेतला आहे. मौजा वेलतूर तुकुंब, भामरागड येथील विद्यार्थीनीबाबत काय घडले आहे त्याबाबत समितीला अवगत करण्यात यावे. यात त्या मुलीचा, कोणत्याही महिलेचा अनादर होणार नाही याची काळजी घेऊन समितीला उत्तर द्यावे असे समितीने निर्देश दिले.

यावर प्रकल्प अधिकारी यांनी विदित केले की, ती विद्यार्थीनी इयत्ता दहावीच्या वर्गात होती. ती गरोदर होती. हा अत्याचाराचा प्रकार नव्हता. सर्वकाही संमतीने झाले होते. ज्या शाळेत हा प्रकार घडला ती शाळा अनुदानित होती. त्या शाळेने प्रकल्प कार्यालयास यासंबंधात रिपोर्ट केला नाही.

समितीने यात गांभीर्य नक्की आहे. महिला सक्षमीकरणासाठी केंद्र शासनापासून राज्य शासन धोरण आखतो ती मुलगी त्या शाळेत शिक्षण घेत आहे. असे असताना त्या शाळेत तो प्रकार घडलेला आहे. प्रकल्प कार्यालयाने शाळेतील मुख्याध्यापक, अधीक्षक इत्यादी सर्वांना नियमावली करून दिलेली आहे. त्याचा पाठपुरावा येथे झालेला नाही असे दिसते. संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, महिला अधीक्षक यांनी वेळच्या वेळी दक्षता न घेतल्यामुळे हा प्रकार घडला असावा. हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. तेव्हा या प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, त्या शाळेचे मुख्याध्यापक, पुरूष अधीक्षक, महिला अधीक्षक यांना निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणी विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. तसेच या संस्थेला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

काल समितीने सरस्वती विद्याप्रसारक मंडळ यांची कुथे-पाटील (देसाईगंज) (वडसा) नामांकित शाळेला भेट दिली. ती शाळा नामांकित असून गोदामामध्ये शाळा भरते. अशाने आदिवासी विद्यार्थ्यांचे फार मोठ्या प्रमाणावर शोषण होत आहे. तेथे प्रसाधनगृहाची व्यवस्था नव्हती. बेडरूमची व्यवस्था नाही. अशा शाळांना नामांकित शाळा कसे म्हणता येईल ज्या अधिकाऱ्याने या शाळेला मान्यता देण्यासाठी शिफारस केली असेल त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ? प्रकल्प अधिकारी स्तरावरून नकारात्मक अहवाल गेला असताना देखील गोदामामध्ये नामांकित शाळा घेण्याचा निर्णय झाला असेल तर त्यासंबंधात चौकशी करण्यात येईल काय ? ही अतिशय गंभीर बाब आहे. ज्यावेळी समितीने या शाळेला भेट दिली तेव्हा अपर आयुक्त, आदिवासी, प्रकल्प अधिकारी हे स्वतः उपस्थित होते. सर्व वरिष्ठ अधिकारी भेटीच्या वेळी उपस्थित होते त्यामुळे त्यांच्या नजरेखालून वस्तुस्थिती गेलेली आहे.

या नामांकित शाळेला प्रती विद्यार्थी किती अनुदान देण्यात आले आहे, ही शाळा कोणत्या वर्गवारीमध्ये मोडते ? आदिवासी विद्यार्थ्यांच्या नावाखाली जवळपास सव्वादोन कोटी रूपये मिळतात. त्या रकमेची उचल घेण्यात आली आहे. तीन वर्षात तेथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, मानसिक शोषण झाले असणार. तेव्हा या पैशाची भरपाई त्या संस्थेकडून वसुल करून घेण्यात येणार आहे काय अशी समितीने विचारणा केली असता प्रकल्प अधिकारी यांनी विदित केले की, त्या शाळेला १०० पैकी ३० गुण देण्यात आले होते. तरी देखील शाळेला मान्यता देण्यात आलेली

आहे. त्यामुळे ती शाळा पात्रता यादीमध्ये नव्हती. त्यानंतर राज्य शासनाकडून यादी आली. त्या यादीमध्ये ही शाळा पात्र होऊन आली.

राज्य शासनाकडून नामांकित शाळा म्हणून मंजुरी मिळाल्यानंतर विद्यार्थी देण्याची जबाबदारी कोणावर आहे असे समितीने विचारले असता या शाळेला वरून मान्यता मिळालेली आहे. प्रकल्प कार्यालय स्तरावरून विद्यार्थी देण्यात येतात असे प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले.

या नामांकित शाळेला ३० गुण देण्यात आले आहेत, ही शाळा पात्रता यादीमध्ये नाही हे प्रकल्प अधिकारी कार्यालयाला माहीत होते. असे असताना प्रकल्प कार्यालयाने या शाळेसाठी विद्यार्थी का दिले आहेत असा समितीने प्रश्न केला असता या शाळेस मान्यता देऊ नये असा प्रकल्प कार्यालयाचा रिपोर्ट असताना देखील शासन निर्णय निर्गमित झाला आहे असे प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले.

शासनस्तरावरून मान्यता कशी मिळाली याच्याशी समितीचे काहीच देणे-घेणे नाही. ही शाळा प्रकल्प कार्यालयाने अपात्र यादीत समाविष्ट केली होती. परंतु, या शाळेचे नाव पात्रता यादीत शासनस्तरावरून आले. असे असताना सर्वच नामांकित शाळेला विद्यार्थी देतो अशातली देखील गोष्ट नाही. अशा शाळांना अ, ब, क,ड वर्गवारी देण्याचे अधिकार कोणाला आहेत अशी समितीने विचारणा केली असता, अशा शाळांची वर्गवारी ठरविण्याचे अधिकारी अपर आदिवासी आयुक्त यांना आहेत असे प्रकल्प अधिकारी यांनी स्पष्ट केले.

या शाळेचे नाव नामांकित यादीच्या पात्रतेमध्ये आल्यानंतर त्यांना विद्यार्थी कसे काय देण्यात आले आहेत ? हे चुकीचे आहे किंवा कसे ? ही शाळा मूल्यांकनामध्ये बसत नाही. या शाळेला ३० गुण देण्यात आले होते. खालच्या स्तरावर सगळी माहिती असते. मात्र, शासन स्तरावर सगळीच माहिती असते असे नाही. तेथे चुकीची माहिती जाऊ शकते. त्या शाळेला गुणांकन मिळालेले नाही, तेथे कोणतीही व्यवस्था नाही हे स्थानिक पातळीवर माहिती असताना प्रकल्प अधिकारी स्तरावरून त्या शाळेसाठी विद्यार्थी का देण्यात आलेले आहेत अशी समितीने विचारणा केली असता जिल्हा परिषदेला अहवाल देण्यात आलेला होता. त्यानंतर पुन्हा राज्य शासनाकडून पत्र मिळाले होते असे प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले.

मुलांना शाळेमध्ये प्रवेश देण्यासंबंधीचे शासनाकडून मिळालेले पत्र आणि प्रकल्प कार्यालयाने मुल्यांकन केलेले पत्र समितीला सादर करावे. सदरहू शाळेला समितीने भेटी दिली होती. सदरहू शाळेसंबंधी अनेक वेळा तक्रार येत होती, असे असताना देखील विभागाने त्या ठिकाणी मुलांना शाळेमध्ये पाठविले. त्यामुळे ही सर्व परिस्थिती पाहत असताना सदरहू शाळेचे अनुदान विभागामार्फत थांबविण्यात येईल काय ? अशा प्रकारे जर चुकीचे प्रकार त्या शाळेमध्ये होत असतील तर त्या

शाळेचे अनुदान थांबविण्यात यावे. सदरहू शाळेला किती अनुदान मिळत असते अशी समितीने विचारणा केली असता प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की, ४० हजार प्रति विद्यार्थी अनुदान मिळत असते.

नामांकित शाळांची नोंदणी करण्यात येत असते. परंतु त्या ठिकाणी नियुक्त केलेले शिक्षक हे गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊ शकत नाहीत. कारण तेथील शिक्षकांची चांगल्या दर्जाचे शिक्षण देण्याची पात्रता नसते. इंग्लिश माध्यमाच्या अशा प्रकारच्या नामांकित शाळेमध्ये मराठी माध्यमाचे शिक्षक नियुक्त केले जातात. अशा प्रकारची शासनाची दिशाभूल करणाऱ्या या शाळांवर कारवाई करुन त्यांचे अनुदान तात्काळ थांबविण्यात येणार काय ? काल समितीने त्या शाळेला भेट दिली होती. त्या ठिकाणी असलेल्या सर्व सुविधा पाहिल्या आहेत. त्या अनुषंगाने सदरहू शाळेचे अनुदान तात्काळ थांबविण्यात यावे. कुथे-पाटील ही नामांकित शाळा आहे. प्रकल्प कार्यालयाने सदरहू नामांकित शाळा रद्द करण्याची शिफारस केली होती. परंतु पुन्हा ती शाळा सुरु झालेली आहे. त्यामुळे सदरहू शाळेचे अनुदान बंद करुन त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा असे समितीने निर्देश दिले.

समितीने नामांकित शाळा किती आहेत अशी विचारणा केली असता गडचिरोली जिल्ह्यामध्ये दोन नामांकित शाळा आहेत असे प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले.

सदरहू शाळांची सद्यःस्थिती काय आहे ? समितीने एका नामांकित शाळेला भेट दिल्यानंतर तेथील सर्व प्रकार उघडकीस आलेले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील इतर शाळांची तपासणी करुन त्या सर्व शाळांचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा. त्याच प्रमाणे मागील तीन वर्षात अशा प्रकारच्या शाळांमध्ये किती विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे, आणि त्यांच्यावर किती रुपये खर्च करण्यात आलेला आहे ? याची माहिती देण्यात यावी असे समितीने निर्देश दिले असता, सदर विषयाबाबतची माहिती समितीला सादर करण्यात येईल असे प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले.

मागील तीन वर्षामध्ये प्रत्येक प्रकल्प कार्यालयास किती निधी प्राप्त झाला ? त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला ? प्राप्त निधीपैकी किती निधी अखर्चित राहिला आहे ? तसेच निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत ? या सर्वांची माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने निर्देश दिले.

काही शासकीय आदिवासी महाविद्यालये आणि त्यांचे वसतीगृह यामधील अंतर जवळपास पाच किलो मीटरपर्यंतचे आहे. त्यामुळे काल समिती जिल्ह्यामध्ये विविध आदिवासी आश्रमशाळा, वसतीगृहे यांना भेट देत असताना असे आढळून आले की, काही ठिकाणच्या शाळा, महाविद्यालये आणि वसतीगृह यामधील अंतर जास्त असल्यामुळे त्या ठिकाणचे विद्यार्थी शाळेत अथवा

महाविद्यालयामध्ये जात नाहीत. त्यामुळे प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून अशा प्रकारे ज्या महाविद्यालयाचे आणि वसतीगृहाचे अंतर जास्त आहे, तेथील विद्यार्थांना सायकल देण्याच्या दृष्टीने किंवा पर्यायी व्यवस्था करण्याच्या दृष्टीने योग्य ते प्रयत्न करावेत. दिवसेंदिवस वसतीगृहामध्ये प्रवेश घेण्याची विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. त्याअनुषंगाने एक कि.मी. पेक्षा अधिक अतंर असलेल्या शाळा, महाविद्यालये आणि वसतीगृह अशा ठिकाणच्या विद्यार्थ्यांना न्युक्लिअस बजेटच्या माध्यमातून पुढील काळामध्ये सायकल देण्याची व्यवस्था प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून करण्यात यावी असे समितीने निर्देश दिले.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये ज्या ज्या अनुदानित आश्रम शाळा आहेत त्या सर्व आश्रमशाळांची बिंदुनामावली प्रमाणित केल्याशिवाय आश्रमशाळांना संच मान्यता, शिक्षण मान्यता देऊ नये. अपर आदिवासी आयुक्त, नागपूर यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व नामांकित शाळांची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा असे समितीने निर्देश दिले.

काल समितीने प्रिती आदिवासी आश्रमशाळा, आरमोरी येथे भेट दिली होती. सदरहू आश्रमशाळा अनुदानित असून त्या ठिकाणी मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कोणत्याही प्रकारची व्यवस्था करण्यात आल्याचे दिसून आले नाही. त्या ठिकाणी मुले आणि मुली या एकत्र राहत असल्याचे आढळुन आले. तेथे कोणत्याही प्रकारची संरक्षण भिंत मुले आणि मुलींच्यामध्ये बांधलेली नाही. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत. याबाबत आदिवासी आयुक्त यांनी योग्य ती काळजी घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी असलेल्या विद्यार्थ्यांना मागील तीन वर्षापासून शिष्यवृत्ती मिळालेली नाही. विद्यार्थ्यांना डी.बी.टी.च्या माध्यमातून सात दिवसांच्या आत विद्यार्थ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले पाहिजेत असे समितीने निर्देश दिले असता प्रकल्प अधिकारी यांनी सदरहू बाबत नोंद घेण्यात आली असून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले.

राष्ट्र पुरुष शहीद वीर बाबुरावजी शेडमाके यांची जन्मभुमी गडचिरोली जिल्ह्यामध्ये आहे. या अनुषंगाने दिनांक २१ ऑक्टोबर रोजी असणाऱ्या शहीद दिनाला जिल्ह्यातील शहीद झालेल्या वीर पुरुषांना जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, आणि राज्य शासनाची कार्यालये यांनी अशा थोर पुरुषांचाही शहीद दिन या निमित्ताने साजरा करावा. सन १८५८ मध्ये पहिला उठाव करणारे शहिद वीर बाबुरावजी शेडमाके होते. परंतु त्यांची आतापर्यंत कोणीही दखल घेतलेली नाही. त्यामुळे समितीने व्यक्त केलेली अपेक्षा रास्त असल्यामुळे याबाबत योग्य ती कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाने आणि इतर सर्व विभागांनी करावी असे समितीने निर्देश दिले.

शासकीय आदिवासी आश्रमशाळा किंवा वसतीगृहामध्ये राहणारा आदिवासी विद्यार्थी जर मृत पावला तर राज्य शासनाकडून त्या विद्यार्थ्यांसाठी ७५ हजार रुपये मिळत असतात. परंतु

नामांकित शाळामध्ये जर विद्यार्थी मृत्युमूखी पडला तर राज्य शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदान मिळत नाही. यासाठी राज्य शासनाने कोणतेही नियम तयार केलेले नाहीत. शासकीय आदिवासी आश्रमशाळा किंवा वसतीगृहामध्ये राहणारा आदिवासी विद्यार्थी जर मृत पावला तर राज्य शासनाकडून त्या विद्यार्थ्यांसाठी ७५ हजार रुपये मिळत असतात. परंतु नामांकित शाळेमध्ये मृत पावलेल्या विद्यार्थ्यांसाठीही मदत मिळण्याच्या दृष्टीने अनुसूचित जमाती कल्याण समितीतर्फे राज्य शासनाला शिफारस करण्यात यावी.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २० ते २२ एप्रिल, २०१८ रोजी गडचिरोली जिल्हयास भेट दिली होती. त्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्यावेळी समितीने, खालील बाबींवर चर्चा केली.

वडसा येथील सरस्वती विदया प्रसारक मंडळ, कुथे पाटील या नामांकित शाळेची मान्यता रद्द करावी व अनुदान थांबवावे असे समितीने निदेश दिले होते. तसेच इतरही काही बाबतीत त्रुटी आहेत अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी सांगितले की, तेथे विद्यार्थ्यांना येण्याजाण्यास त्रास होतो म्हणून त्यांना सायकली दिल्या पाहिजेत हा पहिला विषय होता. सन २०१८-२०१९ मध्ये न्युक्लीअस बजेट योजनेद्वारे येथे ४१ विद्यार्थ्यांना सायकली खरेदी करुन देण्यात आलेल्या आहेत. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे पैसे जमा झाले पाहिजेत हा दुसरा विषय होता. सर्व २०८८ विद्यार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्यात आलेले आहेत. तेथे माननीय राष्ट्रपती व माननीय पंतप्रधान यांचे फोटो लावण्यात आलेले नव्हते, ते देखील आता लावण्यात आलेले आहे.

वडसा येथील सरस्वती (कुथे पाटील) या नामांकित शाळेची मान्यता रद्द करावी व अनुदान थांबवावे असे समितीने निर्देश दिले होते. कारण येथे गिझर, शयनकक्ष विभाजन इत्यादी नव्हते. त्यांना यावर्षी विद्यार्थी दिलेले नाहीत. आता या शाळेची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.

या शाळेतील विद्यार्थ्यांना कोठे प्रवेश दिला आहे अशी समितीने विचारणा केली असता अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी विदित केले की, येथील १० विद्यार्थीनी गर्ल्स हायस्कूल नागपूर येथे दिले आहेत. दत्त विद्यामंदीर बुटीबोरी येथे ३७ विद्यार्थी, फेअरीलाईन स्कूल भद्रावतीला ५० विद्यार्थी, गोंडवाना सैनिकी विद्यालयास गडचिरोली येथे १५ विद्यार्थी, एकलव्य तुमारगुंडाला २८ विद्यार्थी, एकलव्य स्कूल राजुरा येथे ६ विद्यार्थी, एकलव्य स्कूल रामटेक येथे ८, एकलव्य स्कूल बोरगावला २८, इंग्रजी माध्यमिक आश्रमशाळेला ८ विद्यार्थी दिलेले आहेत. अशा प्रकारे १९० विद्यार्थ्यांचे समायोजन केलेले आहे.

अनुदानित प्राथमिक आश्रमशाळा अडीयाळ बाबत कोणती कार्यवाही केली आहे अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी विदित केले की, अडीयाळ येथे समितीने भेट दिली होती, या वसतिगृहात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमित शिष्यवृत्ती, भोजन इत्यादी धोरणानुसार देण्यात यावे असे समितीने सुचविले होते. निधी वितरणाचे अधिकार प्रकल्प अधिकाऱ्यांना देण्याबाबतचा विषय होता. त्या ठिकाणी अपर आयुक्त, आदिवासी विकास किंवा प्रकल्प अधिकारी व संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी भेट देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार प्रकल्प अधिकारी यांनी भेट देऊन त्याबाबतचा आहवाल सादर केलेला आहे. तसेच अनुदानित आश्रमशाळा अड्याळ, ता. चार्मोशी, जि. गडचिरोली या संस्थेच्या मालकीच्या पक्या इमारती असून त्या ठिकाणी १० वर्ग खोल्या आहेत. तसेच त्या ठिकाणी मुलां-मुलींसाठी निवासाची, शौचालय व स्नानगृहाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली आहे. उक्त संस्थेमध्ये एकूण २८ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २६ पदे भरलेली आहेत. उर्वरित २ पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

पुढील विषय शासकीय माध्यमिक आश्रमशाळा मार्कंडादेव, ता. चार्मोशी हा आहे. मार्कंडादेव येथील आश्रमशाळेबाबत समितीने अनेक तक्रारी केल्या होत्या. सदर सर्व तक्रारींची पूर्तता करण्यात आली आहे. त्याबाबत थोडक्यात माहिती अशी आहे की, समितीने भेट दिली तेव्हा शासकीय आश्रमशाळा मार्कंडादेव येथे काही सुविधा नसल्याचे समितीला आढळून आले होते. परंतु आता शासकीय आश्रमशाळा मार्कंडादेव येथे नवीन शालेय इमारत उभारण्यात आली असून सदर इमारतीत संपूर्ण सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच समितीने भेट दिली तेव्हा मुलां-मुलींच्या वसतीगृहामध्ये व शालेय इमारतीतील स्वच्छतागृहामध्ये पाण्याची मुबलक सुविधा नसल्याचे आढळून आले होते. परंतु आता त्या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. या शाळेतील सोलार सिस्टीम समितीला नादुरुस्त अवस्थेत असल्याचे आढळून आले होते. महोदय, तेथील सोलार सिस्टीम आता देखील बंद आहे. परंतु सोलार सिस्टीमऐवजी गिझरची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

नवीन शालेय इमारतीमध्ये सुविचार, म्हणी, राष्ट्रगीत व इतर माहिती लेखनाचे काम सुरु होते, त्यावेळीच समितीने भेट दिली होती. त्यामुळे पेन्टरला त्यांचे लेखनात अनावधानाने राहिलेल्या त्रुटी पूर्ण करण्याची संधीच मिळाली नाही. त्यानंतर मात्र त्या त्रुटी दुरुस्त करण्यात आलेल्या आहेत. समितीने भेट दिली तेव्हा १७ विद्यार्थ्यांचे बँक खाते नसल्याचे आढळून आले होते. विद्यार्थ्यांचे बँक खाते काढण्यासाठी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड तसेच त्यांच्या पालकाचे आधार कार्ड आवश्यक असल्यामुळे सदर कागदपत्रे शाळेमध्ये उपलब्ध नव्हती. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे बँक खाते उघडता आली नाहीत. परंतु त्यानंतर उर्वरित १७ विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्याची सर्व प्रक्रिया शाळेमार्फत पूर्ण करण्यात आली आहे व त्यांची डीबीटी रक्कम जमा करण्यात आली आहे.

समितीने भेट दिली तेव्हा मुख्याध्यापकांना स्वतंत्र कार्यालय नसल्याचे आढळून आले होते. मुख्याध्यापकांचे कार्यालय तात्पुरते एका खोलीमध्ये तयार करण्यात आले होते. वास्तविक ती वर्ग खोली होती. परंतु आता त्या ठिकाणी नवीन इमारत बांधून सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. समितीने मार्कंडादेव येथील धान्य कोठारास भेट दिली तेव्हा संबंधित अधीक्षक समितीची पूर्व परवानगी न घेता समितीच्या भेटी दरम्यान अनुपस्थित होते असे समितीने निदर्शनास आणले असता सचिवांनी विदित केले की, संबंधित अधीक्षक यांना एका कार्यशाळेला उपस्थित राहण्यासाठी प्रकल्प अधिकारी यांनी कार्यमुक्त केले होते. त्या अधीक्षकांचा प्रभार नियमानुसार तेथील महिला अधीक्षक यांच्याकडे सोपविण्यात आला होता. दुसरा अन्नधान्य खरेदीबाबतचा विषय आहे. सद्यःस्थितीमध्ये स्थानिक स्तरावर अन्नधान्याची खरेदी करण्यात येत आहे. आता अन्न धान्याच्या दर्जामध्ये देखील सुधारणा झालेली आहे. आता अन्नधान्याबाबत पालकांची किंवा अन्य कोणाचीही तक्रार नाही. समितीने आता भेट दिली तर तेथे अशा प्रकारच्या सुधारणा दिसून येतील.

पुढील विषय हा इयत्ता दहावीतील विद्यार्थींनी गरोदर झाल्याबाबतचा आहे. राजे धर्मराव अनुदानित आश्रमशाळा वेलगूर ता. अहेरी येथे हा प्रकार घडला होता. संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, अधीक्षक यांनी वेळीच लक्ष न घातल्यामुळे हा प्रकार घडल्याचे दिसून आल्यामुळे संस्थेने शाळेचे मुख्याध्यापक व अधीक्षक यांना तत्काळ निलंबित केले. तसेच संस्थेने चौकशी समिती स्थापन करुन सदर घटनेची सखोल चौकशी केली. त्यानंतर मुख्याध्यापक यांची दोन वेतनवाढ व अधीक्षक यांची एक वेतनवाढ थांबविण्यात आली आहे. सदर मुलगी ज्या विद्यार्थ्यांकडून गरोदर राहिली होती, त्याच मुलासोबत त्यामुलीचे लग्न लावून देण्यात आले आहे.

पुढील विषय हा सरस्वती विद्या प्रसारक मंडळ, कुथे पाटील यांचा आहे. समितीने भेट दिली तेव्हा समितीने काही निरीक्षण नोंदविले होते. नामांकित शाळांची वर्गवारी ठरविण्याचे अधिकार कोणाला आहेत, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. नामांकित शाळांची वर्गवारी ठरविण्याचे अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना आहेत. सदर शाळेचे नाव नामांकित यादीच्या पात्रतेमध्ये आल्यानंतर त्यांना विद्यार्थी कसे काय देण्यात आले आहेत, हे चुकीचे आहे किंवा कसे, ही शाळा मुल्यांकनामध्ये बसत नाही, या शाळेला ३० गुण देण्यात आलेले होते. खालच्यास्तरावर सर्व माहिती असते असे नाही, मात्र शासनस्तरावर सर्व माहिती असते अशा प्रकारचे समितीने काही निरीक्षण नोंदविले होते. विभागाने सदर शाळेची मान्यता रद्द केलेली आहे.

आदिवासी विकास महामंडळाच्या अनुषंगाने दोन मुद्दे आहेत. त्यापैकी पहिला मुद्दा असा आहे की, दिनांक ९ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार पंतप्रधान वनधन योजना सुरु

करण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत अंदाजे ४५० केंद्र सुरु करण्यात आलेले आहेत. परंतु या केद्रांना आदिवासी विकास महामंडळ निधी उपलब्ध करुन देत नाही. प्रथम विभागाने त्या केंद्रांना पाच लाख रुपये दिले. त्यानंतर त्यांनी त्या पैशातून जमीन घेतली असेल. आदिवासी विभागासाठी हा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. पंतप्रधान वनधन योजनेच्या माध्यमातून आदिवासी लोकांना रोजगार उपलब्ध होतो. सदर केंद्रांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विभागाने १०० टक्के पुढाकार घ्यावा, अशी समितीची सूचना आहे.

आदिवासी समाजातील लोकांकडे वनहक्क / वनपट्टे आणि जमिनी आहेत. त्यांना शेतात किंवा माळावर ये-जा करण्यासाठी रस्ता नाही. त्यामुळे त्यांना रस्ता उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच आदिवासी विभाग व वन विभागाने दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी एकत्र घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करुन वनहक्क/वनपट्टे व जमिनीवर केलेले अतिक्रम नियमित करण्यात यावे, अशी समितीची सूचना आहे. हा विषय अतिशय महत्त्वाचा असल्यामुळे उक्त प्रकरणी प्राधान्याचे कार्यवाही करावी अशी समितीने सुचना केली असता त्यास सचिवांनी सहमती दर्शविली व आवश्यक कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले.

आदिवासी विभागाच्या माध्यमातून वेगवेगळ्या विभागाला निधी वितरीत केला जातो. परंतु सदर निधी खर्च करण्यामध्ये आदिवासी विभागाचा कोणताही सहभाग राहत नाही. आदिवासी विभाग फक्त पोस्टमॅन म्हणून काम करीत आहे. आदिवासी विभागाच्या माध्यमातून जिल्हा परिषदेला निधी दिला जातो. त्यानंतर संबंधित जिल्हा परिषद लाभार्थ्यांची निवड करते की नाही किंवा तो निधी परस्पर कशासाठी खर्च करीत आहे, याबाबत आदिवासी विभागाला काहीही माहिती राहत नाही. त्यामुळे सचिव महोदयांनी देखील याबाबतची नोंद घ्यावी. जनजाती सल्लागार परिषदेमध्ये हा विषय घेण्यात येईल. पंचायत समितीच्या माध्यमातून आदिवासी महिलांना शिलाई मशीन दिली जाते. ती मशीन सुरु आहे की बंद आहे, हे कोणीही पाहत नाही. समितीला कोणावरही आरोप करावयाचे नाहीत. परंतु सदर निधी आदिवासी विकास विभागाचा असल्यामुळे या सर्व प्रक्रियेवर विभागाचे नियत्रंण राहणे आवश्यक आहे, असे समितीने मत व्यक्त केले.

जेव्हा जनजाती सल्लागार परिषदेची बैठक होईल, तेव्हा हा विषय मांडण्यात यावा. आदिवासी विभागाचा निधी खर्च होतो. परंतु त्याबाबतची माहिती प्रकल्प अधिकारी किंवा अपर आयुक्त यांना देखील माहिती राहत नाही. त्यामुळे उक्त प्ररकणी आवश्यक कार्यवाही करावी. याबाबतची नोंद घेण्यात यावी. तसेच प्रकल्प समितीमध्ये देखील याबाबतचा आढावा घेण्यात येईल. यापूर्वी अनेक वेळा अवकाळी पाऊस पडलेला आहे. आता देखील अवकाळी पाऊस पडेल असे हवामान खात्याने सांगितले आहे. अवकाळी पाऊस पडण्याअगोदर ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील भात

खरेदी केंद्रासह महाराष्ट्रातील सर्व भात खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात याव्यात, अशी समितीने सुचना केली असता त्यास सचिवांनी सहमती दर्शविली.

आश्रमशाळेवर संगणक, कला, क्रीडा शिक्षक कंत्राटी कामगार नेमण्यात आले होते, त्यांना नियमित करणे अपेक्षीत आहे अशी समितीने सुचना केली असता सचिवांनी सांगितले की, सामान्य प्रशासन विभागाकडून आकृतीबंध करण्याची प्रक्रिया सुरु आहे. मंजूरीसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधात याबाबत समावेश करण्यात आलेला आहे. काही प्रकल्प कार्यालयांनी या शिक्षकांना घेतले आहे काही ठिकाणी राहिले आहे. महाराष्ट्राकरीता एकच निर्णय झाला पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले असता सचिवांनी सांगितले की, ज्या शाळेत आवश्यकता आहे तेथे प्रकल्प अधिकाऱ्यांनी या शिक्षक व कर्मचाऱ्यांना घेतले आहे.

तासिका तत्वावर इतर अनुषंगाने विभागात सन २०१९ मध्ये शिक्षक भरतीमध्ये अनुशेष राहिला व चुकीची पध्दत वापरली. यामध्ये आदिवासी बांधवांना सुध्दा त्रास झाला, १० ते १५ वर्षे त्यांचे आयुष्य वाया गेले. त्यांना सेवेत समाविष्ट करणार आहात का ? असे समितीने विचारणा केली असता सचिवांनी विदित केले की, हा विषय क्लिष्ट आहे. या प्रकरणी बरीच न्यायालयीन प्रकरणे दाखल झाली होती. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे त्या अनुषंगाने विभाग नस्ती सादर करीत आहे. कदाचित कॅबिनेटची याकरीता मंजूरी घ्यावी लागेल.

समितीने ही रिक्त पदे पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरणार आहात की स्वतंत्रपणे भरणार आहात असे विचारले असता सध्या आदिवासी विकास विभागाकडून स्वतंत्रपणे ही पदे भरत आहोत असे सचिवांनी सांगितले. प्राधान्याने ही रिक्त पदे भरावीत अशी समितीची रास्त अपेक्षा आहे. यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी, अशी समितीने सुचना केली.

बऱ्याच प्रकल्प कार्यालयात प्रतिनियुक्तीवर इंग्रजी व गणिताचे शिक्षक कार्यरत आहेत. काही शाळेतील इंग्रजी व गणिताचे सर्व शिक्षक प्रकल्प कार्यालयात कार्यरत आहेत. चार वर्षापासून तेथे दोन्ही विषय शिकविण्यास कोणी नाही, असे असेल तर आदिवासी मुलांचे कधीही कल्याण होणार नाही. बोरध ता.तळोदा येथील आश्रमशाळेची नोंद घ्यावी, याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी माहिती दिली आहे. तेथील इंग्रजी शिक्षिका मुख्याध्यापिका असून त्या प्रकल्प अधिकारी कार्यालयात कार्यरत आहेत. त्यामुळे त्या शाळेत चार वर्षापासून इंग्रजी विषयाचे शिक्षक नाही. समिती व सचिवांनी आदेश द्यावेत की, ताबडतोब या शिक्षिकेस प्रकल्प कार्यालयातून कार्यमुक्त करावे व शाळेवर पाठवावे.

महाराष्ट्रात जेथे आदिवासी एकात्मिक प्रकल्प कार्यालयात शिक्षक व शिक्षिका प्रतिनियुक्तीवर असतील तर त्यांना पूर्ववत पदावर आणून अध्ययन व अद्यापन करण्यासाठी शाळेवर पाठविण्याचा

धोरणात्मक निर्णय विभाग घेणार का अशी समितीने विचारणा केली असता, सचिवांनी विदित केले की, हे शिक्षक शाळेमध्येच असले पाहिजेत. प्रकल्प कार्यालयही चालले पाहिजे. स्थानिक परिस्थिती पाहून निर्णय घेतला जातो. पण या शिक्षकांनी शाळेवर असले पाहिजे याकरीता कार्यवाही केली जाईल. सुमारे ४० टक्के शिक्षक प्रकल्प कार्यालयात प्रतिनियुक्तीवर आहेत, त्यांना अध्ययनाचे काम करण्यास सांगण्यात यावे, अशी समितीने सुचना केली त्यास सचिवांनी सहमती दर्शविली.

अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी आदिवासी शेतकऱ्यांना देय व दिलेल्या वनपट्टेबाबतची माहिती लेखी स्वरुपात समितीला द्यावी असे समितीने निर्देश दिले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

(१) शासकीय आदिवासी आश्रमशाळेत/अनुदानित आश्रमशाळेत व नामांकित शाळेतील अनुसूचित जमातीच्या विदयार्थी/विद्यार्थीनींचा शिक्षण घेत असताना त्याचा/तिचा नैसर्गिक आपत्ती वा अपघाती वा आटोक्याबाहेरील कारणांमुळे मृत्यू झाल्यास मृत विदयार्थी/विद्यार्थीनींच्या पालकास रु. २,००,०००/- (रुपये दोन लक्ष फक्त) इतके सानुग्रह अनुदान देण्याबाबत आदिवासी विकास विभागाच्या दिनांक १९ जून, २०१८ च्या शासन निर्णयान्वये तरतूद आहे. **सदर सानुग्रह अनुदानाच्या रकमेत सुधारणा होऊन सुमारे ७ वर्षांचा कालावधी लोटला आहे. त्यामुळे सदर सानुग्रहाची रक्कम आजची परिस्थिती पाहता कमी आहे. त्यामुळे सदर सानुग्रह अनुदानाची रकमेत वाढ करुन रु. ५,००,०००/- (रुपये पाच लक्ष फक्त) इतकी करावी. याबाबत विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करित आहे.**

(२) आदिवासी विभागाकडून जिल्हापातळीवर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून जिल्हयातील वेगवेगळया विभागीय यत्रंणांना आदिवासींच्या विकासासाठी योजना राबविण्याकरिता निधी वितरित केला जातो. परंतू सदर योजना राबवितांना योजनेच्या प्रक्रियेत तसेच आदिवासी लाभार्थी निवडण्याच्या प्रक्रियेत आदिवासी विभागाच्या अंतर्गत असलेल्या प्रकल्प कार्यालयास सहभागी करण्यात येत नाही. त्यामुळे राबविण्यात येणाऱ्या सदरहू योजनांमध्ये आदिवासी विकास विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश नसल्याने या योजनांवर आदिवासी विकास विभागाचे नियंत्रण राहत नाही. त्यामुळे योजनेची गुणवत्ता व दर्जा खालावत जात असल्याचे समितीस दौऱ्याच्या वेळेस निदर्शनास आले. **जिल्हयातील विविध यंत्रणेद्वारे राबविण्यात**

(शा.म.मु.) एचबी १५७९–८ (४५०–३-२०२६)

**येणाऱ्या आदिवासी विकासाच्या योजनांची स्थिती सुधारण्याकरिता तसेच या योजनांद्वारे आदिवासी भागातील विकासाचे लक्ष पुर्ण करण्याकरिता या योजना राबविण्याच्या प्रक्रियेत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या सहभागाशिवाय वैयक्तिक लाभार्थी योजनेस मंजूरी देण्यात येऊ नये असा निर्णय विभागाने घ्यावा व याबाबत आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करित आहे.**

(३) आदिवासी आश्रमशाळेतील गणित व इंग्रजी या विषयाचे शिक्षक व शिक्षिका ह्या त्या भागातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात प्रतिनियुक्तीवर असल्यामुळे या शाळेतील आदिवासी विदयार्थ्यांना या विषयांचे शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे आदिवासी विदयार्थी इंग्रजी व गणित विषयाच्या ज्ञांनापासून वंचित राहत आहेत आधीच आश्रम शाळेतील शिक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे त्याचा परिणाम आदिवासी विदयार्थ्यांवर होत असतांना इंग्रजी व गणित विषयांच्या शिक्षकांना प्रकल्प कार्यालयात प्रतिनियुक्तीवर न घेता त्यांना त्यांचे अध्ययनाचे काम करण्याकरिता त्यांना प्रकल्प कार्यालयाकडून कार्यमुक्त करण्यात यावे. **तसेच या पुढे आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षकांना प्रकल्प कार्यालयात प्रतिनियुक्तीवर न घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करित आहे.**

(४) राज्यात आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या अधिपत्याखाली ३० एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय कार्यरत असून त्यापैकी ११ अत्यंत संवेदनशील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात भारतीय प्रशासकीय सेवेतील आय.ए.एस. दर्जाचे अधिकारी यांची प्रकल्प अधिकारी पदांवर नेमणूक करण्यात आली आहे. सदर सनदी अधिकाऱ्यांना महसूल विभागाच्या (सहायक जिल्हाधिकारी) कामाचा अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प कार्यालयाच्या कामकाजास संपूर्ण वेळ देता येत नाही. वास्तविक पाहता एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे जिल्हास्तरावर आदिवासींसाठी राबवावयाच्या कल्याणकारी योजना व त्या योजनेद्वारे आदिवासी लोकांचे विकास व त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्थापन झाले आहेत. ही प्रकल्प कार्यालय म्हणजे आदिवासींच्या जिव्हाळ्याचा भाग असून समितीने वारंवार पूर्ण वेळ प्रकल्प अधिकारी पदांवर आय.ए.एस. दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. तरी देखील शासनामार्फत अद्याप कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. **सबब, आय.ए.एस. दर्जाच्या अधिकाऱ्यांना सहायक जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार न देता राज्यातील या ११ अत्यंत संवेदनशील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात आय.ए.एस. दर्जाच्या अधिकाऱ्यांची पूर्ण वेळ नेमणूक करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

(५) अर्थसंकल्पातील आदिवासी विभागाच्या ९.२७ टक्के हा पूर्ण निधी हा आदिवासीच्या विकास विभागासाठी दिला जातो. सदरहू निधी हा आदिवासींच्या विकासासाठी व आदिवासी विकास विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्चासाठी खर्च करण्यात येतो. अर्थसंकल्पातील आदिवासी विकास विभागाचा ९.२७ टक्के हा पूर्ण निधी आदिवासींच्या विकासासाठी व त्याकरिता विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी खर्च करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात यावा व **इतर विभागाप्रमाणे आदिवासी विकास विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या खर्चासाठी सामान्य प्रशासन व वित्त विभागाकडून स्वतंत्र निधी उपलब्ध करुन देण्यात यावा व त्यातूनच कर्मचाऱ्यांचा वेतनाचा खर्च करण्यात यावा. याबाबत आवश्यक कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(६) राज्यातील बऱ्याच एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयात प्रकल्प आढावा समित्या स्थापन करण्यात आल्या नाहीत. प्रत्येक प्रकल्प कार्यालयात प्रकल्प आढावा समिती स्थापन करुन सदरहू समितीवर स्थानिक **आदिवासी लोकप्रतिनिधींना तसेच त्या मतदार संघातील विधीमंडळाच्या सदस्यांना समितीत स्थान देण्यात यावे, याबाबत विभागाकडून सर्व एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयास सुचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

# (समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

## पहिली बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :-

**उपस्थिती :**

(१) डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**समिती सदस्य :**

(२) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(३) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(४) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.

(५) श्री. अमित घोडा, वि.स.स.

(६) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

(७) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(८) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(९) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(१०) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. राजेश तारवी, उप सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

**जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली**

(१) श्री. शेखर सिंह, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली

(२) श्री. सुरेश प्र. वानखेडे, सह आयुक्त अनुसूचित जमाती पडताळणी समिती, गडचिरोली

(३) श्री. दिनेश तिडके, उपसंचालक अनुसूचित जमाती पडताळणी समिती, गडचिरोली

(४) श्री. अ. ना. पोटे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, गडचिरोली

(५) डॉ. शशिकांत शंभरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी, गडचिरोली

(६) श्री. शिंदे, जिल्हा क्रिडा अधिकारी, गडचिरोली

(७) श्री. सुजाता गावंडे, कक्ष अधिकारी, मागासवर्ग कक्ष, नागपूर

(८) श्री. वेमुलकोंडा, अधिक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर

(९) श्री. अ. अ. मेश्राम, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, गडचिरोली

(१०) श्री. एस.पी.कुंभार, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, गडचिरोली

(११) डॉ. प्रमोद खंदाटे, जिल्हा शल्य चिकित्सक, गडचिरोली.

**नगरपरिषद/नगरपंचायत/नगरपालिका**

(१) श्री. कृष्णा निपाणे, मुख्याधिकारी, नगरपरिषद गडचिरोली.

(२) श्री. आशिष चौहान, मुख्याधिकारी, कोरची, नगरपंचायत.

(३) डॉ. कुलभुषण रामटेके, मुख्याधिकारी, अहेरी, नगरपंचायत.

(४) श्री. तैमूर मुलाणी, मुख्यधिकारी, देसाईगंज, नगरपंचायत.

(५) श्री. आशिष बा. चव्हाण, मुख्याधिकारी, चामोर्शी, नगरपंचायत.

(६) श्री.सतिश के. चौधरी, मुख्याधिकारी, आरमोरी, नगरपंचायत.

**वन विभाग**

(१) श्री. डब्ल्यु. आर. यटबॉन, मुख्य वनसंरक्षक

(२) श्री. सी.आर तांबे, उपवनसंरक्षक, गडचिरोली

(३) श्री. फुले, उप वनसंरक्षक, गडचिरोली

**पोलीस अधीक्षक**

(१) डॉ. अभिनव देशमुख, पोलीस अधिक्षक, गडचिरोली

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, लि. गडचिरोली**

(१) श्री. राजेंद्र पांडे, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. गडचिरोली

(२) श्री. गो. क. सावसाकडे, व्यवस्थापक महावितरण, गडचिरोली.

(३) श्री. अशोक ल. म्हस्के, अधिक्षक अभियंता, महावितरण, गडचिरोली

**जिल्हा परिषद कार्यालय, गडचिरोली**

(१) श्री. शान्तनु गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी, गडचिरोली

(२) श्री. राजीव जवळेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. विकास सावंत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्री. अनिल लामतुरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(५) श्री. अब्दुल जावेद, कार्यकारी अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग

(६) श्री. आर. एल.पुराम, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(७) श्री. फरेन्द्र आर. कुतिरकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(८) श्री. संजय सुर्यवंशी, कृषि विकास अधिकारी

(९) डॉ. प्रशांत बुरले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१०) श्री. ओमप्रकाश गुढे, शिक्षणाधिकारी (प्रा.)

(११) श्री. नानाजी आश्राम, शिक्षणाधिकारी (प्रा.)

(१२) श्री. सुरेश पेंदाम, जिल्हा समाज कल्याण अधिकारी

(१३) श्री. के. आर. घोडमारे, कार्यकारी अभियंता

(१४) श्री. एल.आर.धनकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(१५) श्री. आर. आर. चांदुरकर, जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोली अहेरी व भामरागड**

(१) श्री. ह्षीकेश मोडक, अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर

(२) श्री. दिपक हेडाऊ, सहाय्यक आयुक्त आदिवासी विकास, नागपूर

(३) श्री. सचिन ओम्बासे, प्रकल्प अधिकारी, गडचिरोली

(४) श्री. निरज मोरे, प्रकल्प अधिकारी, भामरागड

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली, जिल्हा परिषद, कार्यालय गडचिरोली, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गडचिरोली, पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोली, अहेरी व भामरागड या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

## दुसरी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २२ एप्रिल, २०१८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :-

**उपस्थिती:**

(१) डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**समिती सदस्य :**

(२) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(३) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(४) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.

(५) श्री. अमित घोडा, वि.स.स.

(६) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

(७) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(८) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(९) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(१०) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. राजेश तारवी, उप सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. शेखर सिंह, जिल्हाधिकारी, गडचिरोली

(२) श्री. शान्तनु गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी, गडचिरोली

(३) डॉ. अभिनव देशमुख, पोलीस अधीक्षक, गडचिरोली

(४) श्री. हृषीकेश मोडक, अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर

(५) श्री. सचिन ओम्बासे, प्रकल्प अधिकारी, गडचिरोली

(६) श्री. दिनेश तिडके, उपसंचालक अनुसूचित जमाती पडताळणी समिती, गडचिरोली

(७) श्री. आनंद मेथे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, भामरागड

(८) श्री. फरेन्द्र आर. कुतिरकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जि.प. गडचिरोली.

(९) श्री. क. सु. वेमुलकोंडा, च. प्रा. प्र. मंडळ, चंद्रपूर

(१०) डॉ. प्रमोद खंदाते, जिल्हा शल्य चिकित्सक, गडचिरोली

(११) श्री. आर. आर. चांदुरकर, जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली

(१२) श्री. अब्दुल जावेद, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, गडचिरोली

(१३) श्री. व्ही. टी. गव्हाळे, विभाग नियंत्रक, रा.प. गडचिरोली

(१४) श्री. ओमप्रकाश गुंडे, शिक्षणाधिकारी, (प्रां)

(१५) डॉ. शशिकांत शंभरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी, गडचिरोली

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली, वन विभाग, गडचिरोली, जिल्हा परिषद, कार्यालय गडचिरोली, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गडचिरोली, पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोली, अहेरी व भामरागड या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती,बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांअंतर्गत केलेल्या कामांना दिलेल्या भेटीच्यावेळी आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात आढावा बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

## तिसरी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :-

**उपस्थिती :**

(१) श्री. दौलत दरोडा, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**समिती सदस्य :**

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.
(३) श्री. शिरीष चौधरी, वि.स.स.
(४) डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(५) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.
(६) श्री. राजेश पाडवी, वि.स.स.
(७) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.
(८) श्री. किरण सरनाईक, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(२) श्री. मोहन काकड, अवर सचिव
(३) श्री. मनोज येसनसुरे, कक्ष अधिकारी

**मंत्रालयीन अधिकारी :**

(१) श्री. आनंद लिमये, अपर मुख्य सचिव, गृह विभाग
(२) श्री. राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग
(३) श्री. बी. वेणुगोपाल रेड्डी, प्रधान सचिव, वन विभाग
(४) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, उर्जा विभाग
(५) श्री. सुमंत भांगे, सचिव, सामान्य प्रशासन विभाग
(६) श्री. अनुप यादव, सचिव, आदिवासी विकास विभाग
(७) श्री. सतीश मोघे, उप सचिव, नगरविकास विभाग

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. कुमार आशिर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी, गडचिरोली
(२) श्री. राजेंद्र भारुड, आयुक्त, आदिवासी प्रशिक्षण व संशोधन संस्था, पुणे
(३) श्री. हिरालाल सोनावणे, आयुक्त आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
(४) श्री. किरण कुलकणी, आयुक्त तथा संचालक, नगर प्रशासन
(५) श्री. र. ह. ठाकरे, अपर आयुक्त आदिवासी विकास विभाग, नागपूर
(६) श्री. संजीव कुमार सिंगल, अतिरिक्त महानिदेशक, गडचिरोली
(७) श्री. धनाजी पाटील, उप जिल्हाधिकारी, गडचिरोली
(८) श्री. प्रविण डांगे, निवासी पोलीस उप अधीक्षक, गडचिरोली
(९) श्री. अंकित, प्रकल्प अधिकारी, अहेरी
(१०) श्री. जितेन्द्र चौधरी, सह आयुक्त जातपडताळणी समिती, गडचिरोली
(११) श्री. भालचंद्र खडाईत, संचालक, एच. आर. महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी
(१२) श्री. विजय सिंघल, CMD महावितरण
(१३) श्री. उमेश गायकवाड, मुख्य लेखाधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली
(१४) श्री. किशोर मानकर, मुख्य वनसंरक्षक, गडचिरोली

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातंर्गत असलेल्या यंत्रणा विशेषतः जिल्हा परिषद, गडचिरोली, पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गडचिरोली, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, गडचिरोली या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी / कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित विभागीय सचिवांबरोबर चर्चा केली.

## चौथी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. दौलत दरोडा, वि.स.स तथा समिती प्रमुख

**समिती सदस्य :**

(२) श्री. हरिशचंद्र भोये, वि.स.स

(३) श्री. केवलराम काळे, वि.स.स.

(४) श्रीमती मंजुळा गावित, वि.स.स.

(५) श्री. रामदास मसराम, वि.स.स.

(६) श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. शिवदर्शन साठ्ये, सचिव ४

(२) श्री. राजेश तारवी, सह सचिव (समिती) तथा वि.का.अ.

(३) श्री. दामोदर गायकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. मनोज येसनसुरे, कक्ष अधिकारी

**समितीने या बैठकीत प्रारूप अहवालावर विचार केला व तो आवश्यक त्या सुधारणासह संमत केला.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई